# माणूस

शनिवार । ४ सप्टेंबर १९७६ । साठ पैसे



युवक संघटनांनी
ग्रामीण भागाचे
हे आव्हान
स्वीकारले तर....

एक भटकंती

## साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक चौदावा

४ सप्टेंबर १९७६

मूल्य : साठ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤


एक भटकंती

# ....तर ते दिवस दूर नाहीत

पुरे. किती करावे स्वप्नरंजन ! नव्या युगाची पहाट झाली आहे. तिची प्रकाशकिरणे दुर्बल घटकांपर्यंत पोहोचविण्याची तळमळ आणि ती किती प्रमाणात पोहोचली ह्याचा मागोवा घेण्याच्या उद्देशाने दलित युवक संघटनेच्या सात-आठ कार्यकर्त्यांनी सातारारोड परिसरात भ्रमंती केली. त्या भटकंतीमधील अनुभव-कथनाचा हा प्रपंच !

दिवस कलू लागला होता. अंधारून येत होतं. आम्ही दलित युवक संघटनेचे सात-आठ कार्यकर्ते सातारारोडपासून तीन मैलांवर असलेल्या खेडच्या दिशेने चालू लागतो. गप्पांच्या ओघात खेड आल्याचेही कळले नाही.

'हाल्या, हाल्या. ऽ' शब्दाने आम्ही भानावर आलो. एक म्हातारा म्हशी राखत होता. आम्ही जवळ गेलो.

"बाबा, आम्हांला माहिती घ्यायचीय.'

'घ्या की.'

'चला, झाडाखाली बसून निवांतपणे सांगा.'

'नायं नाय ! मला काय बी कळायचं न्हाय ! गुरं राखता राखता म्हातारा झालू; मला काय कळतंय.' तिरीमिरी आल्यासारखे हातवारे करून म्हातारा बोलला. समाजावणीच्या सुरात सरकारच्या वेठबिगार निर्मूलनाची माहिती सांगण्याचा मी प्रयत्न केला, पण तो कोरा तो कोराच ! आम्ही नाइलाजाने तो प्रयत्न सोडून दिला.

शेतमजुरांना भेटावे म्हणून पुढे चाललो. एक फाटका माणूस भेटला शशिकांत माने त्यास विचारतो, 'तुम्ही शेतावर काम करता की दुसरीकडे कुठे ?'

'चाकरी हाय. पाणक्या बी ! गुरंढोरं, शेणमूत सम्दं करतू.'

'कामाचा रोज महिन्याला देतात की वर्षाला ?'

'रोज ! रोजबिज काय न्हाय. खाऊपिऊ घालत्याती. पाच वर्षांमागं लगीन करून दिलंय. आणखी काय पाहिजे." आम्ही आवाक् होतो.

त्याच गावात काही वेठबिगार मात्र महिना तीस-तीस रुपयांवर राबताना आढळले.

दुसऱ्या एका ठिकाणी तर त्यापेक्षा विलक्षण अनुभव–एक कळाहीन मजूर. वय पस्तिशीचं असावं. जयवंत भिसे त्यास विचारतो,

'तुझं नाव काय ?'

'शिरप्या.'

'संपूर्ण नाव काय ?'

'सम्पूर्ण ! काय सम्पूर्ण ?'

'तुझ्या वडिलांचं नाव काय ? आडनाव काय ?'

'मला फकस्त शिरप्या म्हनत्याती.'

'कधीपासून चाकरी करतोयस ?'

'न्हाय बा ! ध्यानात येत नाही.'

'मालक किती पैसे देतात ?'

'काय बी न्हाय.'

'बरं लग्न झालंय का ?'

लग्न शब्द ऐकताच तो खुलला. लाजतच म्हणाला,

' नाही. मालक, नवरी बघायलाच गेल्याती. '

चौकशीअंती कळते–त्याचा मालक बडा कॉंग्रेसी पुढारी आहे आणि लग्न करून देतो अशी त्याची अद्याप भलावणच चालू आहे.

शेतमजूर महिन्यातून आठ-दहा दिवस घरीच असतात. सारख्या कामाला सारखा दाम हे तत्त्व अजूनही अस्तित्वात आलेले नाही आणि स्त्रियांना किमान वेतनही मिळत नाही.

जगन्नाथ वाघमारे एका व्यापाऱ्यास विचारतो ' आणीबाणीनंतर गावात काही बदल जाणवतोय का ? ' 'होय. अन्नधान्य स्वस्त दरात मिळू लागलेय. ' हाच प्रश्न एका शेतकऱ्यास केला. तेव्हा तो उफाळून म्हणाला, ' साफ बुडालोय, बाबांनो ! आम्हाला कोण पुसतो ? हिकडं लुच्च्या आणि टग्याच्या हातून खतं आन बेणं आमच्यापातूर येईल तवा ! आम्ही आपलं हाय तिथंच हाय. आमच्या नशिबातच न्हाय म्हणायचं. सरकारनं आमच्या शेतमालाचा भाव पाडून दिलाय. आणि आम्ही मात्र युरिया, सुफला महाग दरानं घेतोय. आम्हीच पिकविलेल्या उसाची साखर महाग दराने घेतोय. गावाशिवाला जावं तर एस्. टी.चं भाडं वाढलंय. औषधपाणी महागलय. घासलेट महागलय. शेताची अवजारं घ्यावी, इंजिन घ्यावं, त्याला पेट्रोल घ्याव, का विजेचा पंप बसवावा ? सारंच महागलय. धान्य मात्र स्वस्त झालय ! शेतात धड सुधारणा करता इना की, हे फाटकंपन जायना. तुम्हा-नोकरदार मानसांचं बरंय. महिन्याच्या महिन्याला पगार. शिवाय धान्यधुन्य स्वस्त हायचं. '

गावात चैतन्य यावं याकरिता तरुण मंडळी बेचैन आहेत. पण त्याकरिता नेमकं काय करावं हे त्यांना कळत नाही. दिशाहीनत्वामुळे तरुण अगतिक झालाय. सत्कार आणि निवडणुका ह्याव्यतिरिक्त सभा होत नाहीत. ह्याची त्यांना बोचणी आहे.

परंपरेचे, हुंड्याचे भूत मात्र ग्रामीण भागात जोरात थैमान घालत आहे. त्यातून कोणीच सुटत नाही. आम्ही मैदानावरच तरुणांच्या घोळक्यात शिरतो. पोरांना खाली बसवतो. प्रदीप बल्लाळ एका तरुणाला विचारतो, ' हुंडा घेणार का ?' तो ठासून सांगतो, ' घेणार तर !'

'का ?'

' आमच्यात तशी चालच आहे. हुंड्याशिवाय लग्नच होत नाही. '

तरुणांच्या कोंडाळ्यातून एक वेगळा सूर येतो.

' मी नाही हुंडा घेतला. '

समाधान आणि कौतुकमिश्रित नजरेनं मी त्याच्याकडे पाहिलं. तसं तो पुढं म्हणाला,

' मामाची पोरगी म्हणून न्हाय घेतला, पण मामाला तसा सोडला नाही. पार धुतलाय. '

२० + ४ कलमी आर्थिक कार्यक्रम तसा जाणीवपूर्वक कोणीच राबविलेला आढळला नाही. त्याकरिता प्रचार आणि लोकजागृती-सभाही झाल्या नाहीत. नाही म्हणायला २० कलमी कार्यक्रमाला पाठिंबा देणारे फक्त मेळावे झाल्याचे कळले. बेघरांना घरे, भूमिहिनांना जमिनी, कर्जमुक्ती कशाचाही मागमूस ह्या ग्रामीण भागात दिसत नाही.

एका ग्रामपंचायतीत विचारपूस केली. सरपंचांना मी विचारले,

' २० कलमी कार्यक्रम राबविण्यासाठी काही करण्यात आलेय का?'

त्यांनी होकारार्थी मान हलविली अन् भिंतीकडे बोट दाखविले. मी तिकडे पाहिले. भिंतीवर एक कामगार, शेतकरी, लिफ्ट, पाणी, पीक; हे सुखी जीवनाचे भव्य स्वप्नचित्र रंगविले आहे.

सरपंच म्हणाले, ' बस्, एवढंच केलं !'

त्यावर मी म्हणालो, ' हेही नसे थोडके !'

माझा दुसरा प्रश्न–' कर्जमुक्ती मिळाली का ?'

सरपंच विचारात पडतात. पण लगेच सावधपणे म्हणतात, ' होय म्हणता येत नाही, आणि नाही म्हणावे तर, याचा अर्थ कर्जप्रकरणेच नाहीत किंवा असली तरी, ती मुक्त करण्याचा प्रयत्न झाला नाही, असा होतो. काही प्रकरणे माझ्या माहितीची आहेत, पण अशी प्रकरणे आमच्याकडे आलीच नाहीत.'

लघुउद्योग करण्याची गरज आणि इच्छा असूनही शेतकरी, मजूर, युवक आणि व्यापाऱ्यांनाही प्राथमिक पैशाची पूर्तता करता येत नसल्याने लघुउद्योजक पुढे येण्यास धजावत नाहीत.

लोकशिक्षणाच्या कार्यास प्रभावीपणे चालना मिळण्यासाठी शासनाच्या ग्रामीण दूरचित्रक्षेपण विभागातर्फे पाचव्या योजनेच्या कालावधीत महाराष्ट्र राज्यात अंदाजे एक हजार सामूहिक दूरचित्रवाणी सेट्स् बसविण्याचे उद्दिष्ट जाहीर झाले असून, सातारा जिल्ह्यात ६३ सेट्स् बसविल्याचे वृत्त आहे. तसेच रेडिओच्या किंमतीदेखील कमी करण्याचा विचार चालू आहे.

अशा तऱ्हेने आज माहिती आणि प्रसिद्धी खाते, आकाशवाणी, वर्तमानपत्रे प्रभावीपणे राबत असूनही ग्रामीण भागात २० कलमांचा मागमूसही सापडत नाही. तरुणांपुढे लोकशिक्षण प्रभावी करण्याचे हे आव्हान आहे.

आज देशभर युवक कॉंग्रेस बांधणीचे जोरदार प्रयत्न चालू आहेत. युवक कॉंग्रेस आणि इतर युवक संघटनांनी ग्रामीण भागाचे हे आव्हान स्वीकारले तर सोनियाचे दिवस दूर नाहीत असे म्हणावयास काहीच हरकत नाही. □

## ग्रामीण विकास पाहणी दृष्टिक्षेप

### मौजे-खेड, ता. कोरेगाव, जि. सातारा.

१. एकूण लोकसंख्या : २०७०

२. अल्पसंख्य कुटुंबे : १२

| | |
|---|---|
| १. बौद्ध–५५ | ४. मुस्लीम–४ |
| २. मातंग–२ | ५. रामोशी–४ |
| ३. चांभार–४ | ६. ब्राह्मण–२ |

३. दलितांची वस्ती वेगळी.

४. नदीमुळे पाणवठ्याचा प्रश्न नाही.

५. शिक्षण : शाळा–१ :– इ. १ ली ते ७ वी.
मुले–२३५, मुली १७७, एकूण मुले ४१२

६. शेती

१. जमिनीचे क्षेत्र ; एकूण–११०३ हेक्टर ४३ आर.
खरीप– ६६३ „ ४५ „
दुपिकी– ४०० „ ०० „
वरकस– ३९ „ ९८ „

२. पिके : मुख्य–हायब्रीड ज्वारी, रब्बी ज्वारी, भुईमूग.
इतर–ऊस, आले, कडधान्ये.

७. शेतमजुरी–पुरुष ४ रुपये.
स्त्रिया २ रुपये.

८. कर्जमुक्ती–नाही.

९. वेठबिगार निर्मूलन–नाही.

१०. भूमिहिनांना जमीन मिळाली नाही.

११. हुंडा–हुंड्याचे प्रमाण रु. १ हजार ते २० हजार.
दलितांमध्ये रु. ५०० पर्यंत.

१२. वीस कलमी कार्यक्रमाचा प्रचार–नाही. □

पुणे येथील फ्रान्स मित्र मंडळाच्यावतीने लेखक दीड–दोन महिन्यांच्या वास्तव्यासाठी फ्रान्सला गेले होते. या वास्तव्यात त्यांना भेटलेल्या फ्रेंच माणसांची, त्यांनी पाहिलेल्या फ्रेंच जीवनाची ही ओळख ओळखीतला दुसरा लेख २८ ऑगस्टच्या अंकात प्रसिद्ध झाला होता. हा तिसरा.

# पॅरिस, आय लव्ह यू

## फादर डलरी एक वारकरी

शांताराम पारपिल्लेवार

अलेक्झांडर ड्यूमाच्या कादंबऱ्यांतील पार्श्वभूमीची आठवण करून देणारा भक्कम वाडा. कॅसल. आत जायला कमानीचं दार. दाराच्या कमानीत तो वाडा मोठा रम्य दिसतो. वाड्याच्या माडीच्या खिडक्या कमानीच्या. गोलाकार पुढं आलेल्या. दारं कमानीची. कितीतरी. वाटावं, हा वाडा नाही. ही तर वस्ती आहे. आत जायचं मुख्यदार वर आहे. तिथवर जायला पायऱ्या. निवांत पायऱ्यांवरच मी बसतो. वाड्याच्या पुढं नजर पोचते तिथवर जमिनीचा चढ-उतार. गर्द हिरव्या दुलईत पहुडलेला.व्राजूला उंच उंच झाडं. झाडांच्या काठानं इवलासा ओढा. त्या संपूर्ण गर्द हिरव्या वनराईत एकटा एक तो वाडा कोंदणात बसवलेल्या हिऱ्यासारखा सूर्याच्या मुलायम उन्हात उठून दिसत आहे.

शुभांगी खालच्या पायरीवर बसते. पुढे पाहत थिजल्यासारखी. शुभांगी मनमोकळी अशी हसतच नाही. वाटतं, ती एका गूढ सावटाखाली वावरते आहे अन् अशा जगापासून तुटल्या वातावरणात ती काहीतरी शोधते आहे. 'काय बघतेस, शुभा ? उन की सावली ?'

'उन्हात सावल्या कशा स्वयंभू वाटतात नाही ?'

मला डॉम मोराएसच्या ओळी आठवतात—

If still she felt the shadows
They had now another name

मला चूप पाहून म्हणते—कवितेच्या ओळी सुचतात का ?

'नाही. आठवतात. डॉमच्या.'

डॉम तिचा कुणीच लागत नाही. ती मुंबईत विज्ञानशाखेत महाविद्यालयात आहे. मात्र माझ्यासोबत फ्रान्सला आलेल्यांत अगदी वेगळी.पडते. वाटायचं, हिला कवितेचं वेड असायला हवं होतं असते कशी चूपचूप हरवल्यासारखी ! [illegible]ते कशी उपऱ्यासारखी ? कवितेला [illegible]नवेल अशी प्रवृत्ती.

एक वेल वाड्याच्या भिंतीवर थेट वर छतापर्यंत–कौलांपर्यंत पोचली असते. फक्त खिडक्या तेवढ्या वेलीनं सोडल्यात. घोरपडीसारखी ती भिंतीला चिकटलीय. वाटतं, वाड्यानं घट्ट हिरवं जॅकेट घातलंय.

'एवढ्या मोठ्या वाड्यात फादर डलरी एकटे राहतात का ?' ती विचारते. आतापर्यंत इतर मंडळीही पायऱ्यावर येऊन बसतात. फादर डलरी स्वतः दोन हातानं दोन फोल्डिंग चेअर्स आणत आहेत. मी त्यांना मदत करतो.

फादर डलरी एकानंतर एक शॉक देताहेत.

पहिल्या भेटीत चक्क दोन हात जोडून त्यांनी नमस्कार केला. स्पष्ट मराठीत म्हणाले, 'नमस्ते. प्रवास सुखाचा झाला ना?'

आम्ही एक श्रीमंत खेडं बघायला आलो होतो. 'विलिड्यू ल चॅटो.' पॅरिसपासून शंभरेक किलोमीटर असावं. गावात आमचं स्वागत गावचे मेयर, श्री. लुई जूझॉनी केलं. सोबत त्यांच्या सौभाग्यवती, गावातल्या शाळेची मुख्याध्यापिका, निवडून आलेले सभासद आणि काही सन्मान्य नागरिक हजर होते. पत्रकार होते. तिथेच फादर डलरी होते. मेयरच्या फ्रेंच भाषणाचं ते मराठीत भाषांतर करून सांगत होते. हे गाव वाईनसाठी प्रसिद्ध. पाहावं तिकडे वाईनयार्डस् (द्राक्षमळे) दिसतील. अगत्य वाईनच्या शिशा उघडून केलं जातं. बारीक गळ्याच्या लयदार काचेच्या पेल्यात मद्य हेलकावतं. प्रत्येकाची विचारपूस केली जाते. म्हातारी बायामाणसंसुद्धा, दहा हजार किलोमीटरहून आपला देश बघायला पुरातन सभ्यतेचा वारसा असणारी तरुण रक्ताची पिढी आहे तरी कशी, हे बघायला आलीत. ग्रूपमधल्या बायांचं खूप कौतुक होतं. त्यांतल्या काहींच्या हातांत वाईनचा पेला बघून त्यांना आश्चर्य वाटतं. आनंदही होतो. त्यांनी परंपरागत विश्वास जोपासला असतो. भारतात स्त्रियांना स्वातंत्र्य नाही, शिक्षण नाही, चूल आणि मूल एवढंच तिचं कार्यक्षेत्र. ती बंधनात बांधली आहे. त्यांच्या विश्वासाला तडा जातो. शीलाताई विद्वांस, आपटेबाई, देवस्थळीबाई, नवरा, मुलं साऱ्यांना भारतात सोडून एकट्या आल्यात. आंबेकरबाई निष्णात स्त्रीरोगतज्ज्ञ आहेत, सावळेबाई पोस्टग्रॅज्युएट आहेत. शुभांगी कॉलेजला आहे. ग्रुपमधली पुरुषमंडळीसुद्धा एकाहून एक सरस. कुणी ॲडव्होकेट, कुणी इजिनीअर, कुणी कारखानदार. खऱ्या अर्थानं भारताचं प्रतिनिधित्व केलं जातं. एकेकजण आपला परिचय देताना आपला व्यवसाय सांगत असतो. शेट्टे म्हणतो, *'आय् हॅव वाईन शॉप.'* सगळेच खदखदून हसतात. प्रत्येकाच्या हातात वाईनचा पेला असतो. हात उंचावून 'चिन्‌चिन्' म्हटलं जातं. भारतीय मंडळींचा गौरव होताना पाहून फादर डलरीच्या हसत्या डोळ्यात शभर सूर्यांचं तेज फाकत. त्यांना तो त्यांचाच गौरव वाटतो. मी सारखा त्यांच्याकडे पाहत असतो. कपाळाचा पुढचा भाग टक्कल पडल्यासारखा. मागचे केस रुळणारे. हनुवटी, पुढं आलेला गोलाकार चेहरा. गब्दुल शरीरसंपन्नदेचा धनी. चेहऱ्यावरच्या सुरकुत्या लपत नाहीत; पण डोळ्यांत झाक तरुणाची. अंगात उत्साह तरुणाला लाजवील असा. त्यांचा गोरापान चेहरा

भरलेलं अंग, मोकळे मागचे केस पाहून सारखं वाटत होतं, आपल्या कोकणात तरी असा माणूस दिसेल. फरक एवढाच तो पँट घालणार नाही, चामडी जॅकेट त्याच्या अंगावर नसेल. पण स्वच्छ धोतर त्यानं नेसलं असणार. पुढं आलेल्या पोटावर जानवं चिकटलेलं असणार. कपाळावर गंध राहील. हातात पळीपंचपात्र, तोंडावर शब्द 'ओम नमः शिवाय.' आपल्याकडच्या भटजीसारखा दिसणारा हा माणूस. त्यांच्याविषयी मला बरीच माहिती आधीची मिळालेली असते. त्यांच्या संबंधात देवधरनं फ्रेंच वर्तमानपत्रासाठी एक लेखही लिहिलेला असतो. भारत सोडायच्या आधी त्यांचा पत्ता आम्हाला देण्यात आलेला. पॅरिसमध्ये त्यांच्याच पत्त्यावर आम्ही पत्र मागवतो. अन् ध्यानीमनी नसताना ते अचानक त्या गावच्या लोकांसमवेत असतात. प्रत्येकजण त्यांच्याविषयी चौकस. 'हाऊ यू आर हीयर?' ते चक्क मराठीत सांगतात, 'इथून दहा किलोमीटर अंतरावर माझी इस्टेट आहे, फार्म आहे. साऱ्यांनी दुपारच्या जेवणाला तिथं यायचं.' एवढं बोलून ते निघून जातात. मला गोंधळांत टाकून. मी विचार करायला लागतो, हा प्रीस्ट. चर्चचा पाद्री अन् म्हणतो, इस्टेट आहे. फार्म आहे. सगळं विसंगत वाटतं.

आणि जेव्हा शुभांगी विचारते, 'एवढ्या मोठ्या वाड्यात फादर डलरी एकटे राहतात का?' तेव्हाही काय उत्तर द्यावे कळत नाही. आपल्या इकडच्या एखाद्या छोट्या रियासतीच्या राजकुमाराचा राजवाडा शोभेल अशी ही वास्तू. घोडे बांधायचं अस्तबल वाड्याला लागून आहे. आता तिथे घोडे नाहीत, घोडागाडी नाही, कार आहे.

'कोण कोण असतं इथं?' मी त्यांना विचारतो.

'मी आणि एक नोकर.' अन् परत ते प्यायच्या पाण्याची सोय करायला आत निघून जातात. बाहेर उन्हात बसून आम्ही जेवण आटोपतो. परतायच्या आधी वेळ बराच मोकळा आहे. घोळक्या-घोळक्यानं सारे पांगतात. कुणी झाडाखाली जातात. कुणी हिरव्या गालिच्यावर. कुणी त्यांचा वाडा पाहायला आत जातात. मी आणि शुभांगी त्यांच्या मागे मागे जातो. ते वाड्याच्या दुसऱ्या टोकाला जातात. तिथं जुनी चारेकशे वर्षांची वास्तू वाड्याच्या नवीन बांधणीला नव्या तरुणीला परंपरेनं जखडावं तशी गच्च भिडून असते. वर चढायला जिना असतो. तिथं वाजवीपेक्षा जास्त अंधार. मोठ्या दगडाची एकेक चौकोनी पायरी. प्रत्येक पायरीचा वरचा पृष्ठभाग चालून चालून झिजलेला. जणू चारशे वर्षांतला प्रत्येक दिवस, प्रत्येक घटका, प्रत्येक पळ त्या पायरीवर पाय देऊन पुढं गेलाय्. जिन्याच्या बाजूच्या भिंतींचं जुनं चुन्याचं प्लॅस्टर ठिकठिकाणी उखडलंय्. ती वास्तू आयुष्याच्या जखमाच जशा उराशी बाळगून आहे. उखडल्या प्लॅस्टरच्या खालची एकएक वीट आपल्या ऐश्वर्यसंपन्न दिवसांची कथा सांगणारी. इथलं व्यतीत भूतकाळात जमा नाही. तर थबकलंय्. गोठलंय्. मी विचार करायला लागतो, फादर डलरी खरंच राजपुत्र होते का? कुणा सामंताच्या घरात जन्माला आले का? अन् असं असेल तर प्रीस्ट का झालेत? आपल्या वयाचा स्वप्निल बहर त्यांनी उधळून का टाकला? स्वप्नात मश्गुल व्हायच्या दिवसात त्यांच्या ठायी विरक्ती भिनली. कवितेत स्वतःला हरवायच्या स्थितीत बायबलचा गॉस्पेल त्यांच्या ओठावर रुळला. का? का? का? माझ्या प्रश्नांची मालिका आतल्या आत मारुतीच्या शेपटासारखी लांब होत जाते.

जिना संपतो तिथं डाव्या हाताला भक्कम लाकडी चौकटीचं मोठ्ठं दार. आत एक मोठ्ठा हॉल. वाटतं आपण किती तरी वर्षे मागे गेलोत. इतिहासात पोचलोत. रवींद्रनाथांचं क्षुधित पाषाण आठवतं. वातावरण कसं मिस्टिक्. कोपऱ्यात भिंतीशी जुनं नक्षीकाम केलेली कपाटं आहेत. त्यात पुस्तकं. दुसऱ्या बाजूला जुना सोफा. गतकालीन टेबलं. दुसऱ्या भिंतीशी एक कपाट, त्यात जुनी पुस्तकं, पोथ्या, हस्तलिखितं. जागजागी छताच्या आधाराला दिलेले भक्कम लाकडी खांब. खांबावरच्या मोठ्ठाल्या चौकोनी मयाली. ते म्हणतात, 'हा माझा आश्रम.'

'अन् हा राजवाडा कुणाचा?' माझ्या बोटाचा इशारा बाजूच्या वास्तूकडे असतो.

'बापजाद्यांचा. आता माझ्या अस्तित्वाच्या खुणा फक्त इथं आहेत. ह्या ऐतिहासिक वास्तूत. दॅट इज ओन्ली फॉर गेस्टस्.' आतापावेतो श्री. आणि सौ. जायखेडकर हॉलमध्ये येतात. त्यांचं फादर डलरीशी संभाषण सुरू होतं. लं 'योगा, ल' वेदा, ल' ॲस्ट्रॉलाजी, ल' आर्ट एन् इंडि, ल' कास्ट डॅन ल' इंडि, कृष्णमूर्ती. अरविंदघोष, उपनिषदं, किती किती नावं द्यावीत? फ्रेंच पुस्तकं, इंग्रजी पुस्तकं आणि मराठी पण. एक भारतच्या भारत त्यांच्या त्या कपाटात वसत आहे. अन् त्यांच्या हृदयातही. पंचवीस वर्षे ते भारतात राहिले. आलेत तेव्हा भारलेले होते. येशूच्या उपदेशाने, येशूच्या विश्वासाने. भारत भिकाऱ्यांचा देश, गरिबांचा देश, बिमारीचा देश, विंचूसापांचा देश, अंधविश्वासाचा देश, जादूटोण्याचा देश, भुताटकीचा देश. काय काय कल्पना भारताविषयी होत्या त्यांच्या? येशूचा आवाज जणू त्यांच्या कानात गुंजत होता—'अख्ख्या मानवजातीविषयी अनुकंपा, दीनदुःखी दलित, व्यथित ह्यांच्याविषयी प्रेम. जा जा. तुझ्यासाठी विशाल विश्व वाट पाहत आहे. माझा विश्वास त्या विश्वापर्यंत तुला पोचवायचा आहे. जा.' ख्रिस्त धर्माइतका चांगला, मोठा अन् अख्ख्या मानवजातीला दुःखातून, कष्टातून, ग्लानीतून, अंधारातून आणि अज्ञानातून मुक्त करणारा दुसरा धर्म नाही, असा त्यांचा विश्वास होता. एका खूप सुसंस्कृत, सुशिक्षित अन् सधन देशातून एक पाद्री ह्या देशात खूपशी स्वप्नं घेऊन आला. ही त्याची स्वप्नं नव्हती. ही येशूची स्वप्नं होती. येशूच्या स्वप्नासाठी त्यानं तर त्याच्या स्वप्नांना केव्हाच मूठमाती दिली होती. पुण्यासारखं शहर त्याचं कार्यक्षेत्र होतं. पण त्याला माणसं भेटली ती त्याच्या कल्पनेपेक्षा वेगळी होती, निराळी होती. विद्वान्, सनातनी, हळुवार, सालस, स्वप्नात वावरणारी तर काही वज्रकठोर. ह्या साऱ्यांना त्याला येशूच्या साम्राज्यात न्यायचं होतं. त्यानं इथं दिंडीत देहभान विसरून अख्खं विश्व पायाखाली टाकीत पंढरपूरला विठ्ठलाच्या भेटीसाठी जाणारा वारकरी पाहिला. 'ज्ञानबा-तुकाराम'च्या गजरात देहभान हरवणारा कीर्तनकार पाहिला. इथं त्याची ओळख ज्ञानोबाच्या ओवीशी झाली. तुकोबाच्या अभंगाशी झाली. इथं भिकाऱ्याच्या ओठी जीवनाचं तत्त्वज्ञान त्यानं पाहिलं. त्यानं काही तरी वेगळं पाहिलं. इथला माणूस, त्याची जीवनाकांक्षा, त्याच्या जीवनाचं तत्त्वज्ञान सारं सारं त्याला वेगळं वाटलं. असं कुठं

पाहण्यात आलं नव्हतं. हळूहळू त्याच्याच विश्वासाला तडे जायला लागले. एका धर्माची टिमकी वाजवत आलेल्या धर्मप्रसारकाला त्याच्याच धर्मात अनास्था वाटू लागली. त्यानं मराठीचा अभ्यास केला. तुकोबाचे अभंग आता त्याचे झालेत. त्यानं तुकाराम फ्रेंचमध्ये नेला. Toukaram psaume du Pelecin. पुस्तकाची अर्पणपत्रिका सोनोपंत दांडेकरांच्या नावानं आहे. पुस्तकाच्या प्रती त्या हॉलमध्ये टेबलावर होत्या. आधी मला वाटलं, तुकारामाचं ॲप्रिसिएशन असेल. नाही. तो तुकाराम फ्रेंचमध्ये होता.

'फादर . . .' शुभांगीला काहीतरी विचारायचं आहे. ती पुढे काही विचारायच्या आधीच ते म्हणतात—'आय ॲम नॉट युवर फादर!' मी वळून त्यांच्याकडे पाहायला लागतो. त्यांच्या शब्दात एक कठोरपण होतं. त्यांच्यापासून ते अपेक्षित नव्हतं. त्या उपाधीनं ते व्यथित झाले होते. विद्ध सिंहाचा त्यांचा आवेश होता. माझ्या हातात फ्रेंचमधला तुकाराम आहे अन् त्यांनी शुभांगीला असं विद्ध करू नये असं मला वाटतं. मी हसत त्यांना म्हणतो, 'यू आर नॉट फादर; बट सर्टनली यू आर लाईक हर फादर.' शुभाचं वयच किती? फार तर अठरावीस अन् फादर डलरी बावनचे. लग्न झालं असतं तर बापच काय आजोबाही झाले असते. त्यांनाही वाटतं, आपण असं उखडायला नको पाहिजे होतं. इतक्यात वसुंधराबाई देवस्थळी तिथं पोचतात. हातात त्यांच्याही तुकारामच आहे. 'ह्यात' वनचरे आम्हा सगेसोयरे 'आहे का?' विचारतात.

'मिस्टर डलरी, इज इट इन दी सेम मीटर ॲज दॅट ऑफ अभंगा?' मीही विचारतो.

फादर डलरीचा असा क्षणातच मिस्टर डलरी होतो. ते हसतात. आय लाईक इट म्हणतात. पुढे सांगतात, 'हो, ते अभंगाच्याच मीटरमधे आहे. अन् वसुंधरा, (देवस्थळी) तो अभंग आहे की ह्यात! तुला गाता येतं चांगलं असं ऐकलं आहे?'

'येतं थोडं फार.' मग सारेच त्यांना आग्रह करतात. त्या गायला सुरुवात करतात!

मिस्टर डलरी पुस्तकातून ते पान, जिथं अभंगाचं भाषांतर आहे, मला दाखवतात. मी प्रकाशकाचं नाव बघतो. गॅलीमार्ड. हा प्रख्यात प्रकाशक. सार्त्र, सिमोन्द ब्युवा वगैरेंची पुस्तकं त्याच प्रकाशकानं छापलीत. 'किती प्रती खपल्यात? तुकारामाला फ्रान्समधे रिस्पॉन्स कसा आहे?'—मी विचारतो.

'पन्नास हजारांच्या तीन एडिशन्स् निघाल्यात. त्यावरून कल्पना करता यावी. नाही?'

'इंडियासंबंधी आणखी काही पुस्तकं लिहलीत का?'

'एक आणखी लिहिलय्. Renaitre en Inde'

'भारतात केव्हा होता?'

'एकोणपन्नास ते त्र्याहत्तर सालापर्यंत मी तिथं होतो.' त्यांना जणू त्यांचे भारतातले दिवस आठवतात की काय? डोळे फडफडतात. दूर पाहायला लागतात.

'भारताविषयी काय वाटतं?'

'आय ॲम कनेक्टेड वुईथ इंडिया स्पिरिच्युअली.'

'तुमचा पुनर्जन्मावर विश्वास आहे का?'

'नक्की काय ते मलाही सांगता येत नाही. पण मला पुनःपुनः भारतात जावंसं वाटतं.' मला वाटतं, त्यांचं शरीर फ्रान्समधे अन् आत्मा भारतात आहे.

'तुमच्या एखाद्या पूर्वीच्या जन्मात तुम्ही तिथे जन्मला असाल. त्यामुळंच इतकी आत्मीयता तुम्हाला वाटते.' मी माझ्या परीनं जास्तीच बोलतो.

'कुणास ठाऊक? खरंही असावं ते.' बोटं हवेतच हलतात.

शुभांगी माझ्याकडे पाहायला लागते—इंटरव्ह्यूच घेताहात की?

—अं हं! हा संवाद आहे. तेवढ्यासाठी तर एवढ्या लांब आलोय मी.

'तुम्ही प्रीस्टहूड का सोडली?'

हाताची बोटं वळवीत ते म्हणाले, 'आय् डिफर्ड इन् आयडियॉलाजी.'

भारतीय वातावरणात, वारकऱ्यांच्या दिंडीत, देहू-आळंदीच्या जत्रेत, तुकारामाच्या अभंगात, ज्ञानेशांच्या ओवीत ह्यांना माणसाचा एक वेगळाच धर्म दिसला. हा धर्म कुणीही त्यांच्यावर लादला नव्हता. त्यांच्या आत्म्यानं तो स्वीकारला.

'पुढचं प्रोजेक्ट काय?'

'कॅम्पॅरेटिव्ह रिलीजनसंबंधी माझं चिंतन सुरू आहे. काही लेखनही झालं आहे. ओल्ड इनहॅबिटंट ऑफ फ्रान्स बिफोर टू थाऊजन्ड इयर्स असा एक संशोधनपर प्रबंध लिहायचा मानस आहे.'

'त्याला प्रेरणा कुठून मिळाली?'

'इथं ह्या मातीत. आज सकाळी गाव पाहिलं ना? तिथं अजूनही काही अवशेष सापडतात. पुरातन मानवाचे. तेव्हाचे त्यांचे व्यवहार, नीतिनियम, कुटुंबपद्धती, आचार ह्यांच्यासंबंधी खूप मटेरियल मिळत आहे. अन् माझ्या संशोधनात मी एक पाहिलं; आदिम युगात माणूस हा माणसापासून आज जितका दूर आहे तितका नव्हता. इथली त्या काळची माणसं आर्य किंवा त्याच्याच वंशातली होती. माणसामाणसांत मला असा एक युनिव्हर्सल बॉन्ड दिसतो. आज तितका दिसत नाही.'

'म्हणूनच तुम्ही पर्स्पेक्टिव्ह एशिएन् स्थापन केलंत का?'

मोठं विकल हसू त्यांच्या ओठावर आहे. एरव्ही ते मनमोकळे हसतात. कदाचित ह्या सगळ्या स्थापनेचं उत्तरदायित्व त्यांना नको असावं. आज त्यांच्या ह्या संस्थेमुळं खरं माणसामाणसातलं अंतर कमी होत आहे. भारत हा भिकाऱ्यांचा देश. भारत हा साधूंचा देश म्हणणाऱ्या माणसांच्या थोपटात त्यांनी एक वाक्य उतरवलं—भारत हा माणसांचा देश. आपल्यासारखा माणूस तिथंही आहे. आपल्यासारखी मध्यमवर्गीय विवंचना त्यांचीही आहे.

धर्माच्या नावावर घेतलेली संन्यस्त बिरुदं झुगारली असली तरी मिस्टर डलरी


पूर्णिया

अनिल अवचट

किंमत : सहा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

एखाद्या योग्यासारखे आहेत. माणसाचा शोध हे आता त्यांचं कार्य आहे.

ते म्हणतात, 'ह्यूमन बॉन्ड हा महत्त्वाचा, तो फॉर्म झाला की धर्माच्या, मोठेपणाच्या उच्चनीचतेच्या, लहानमोठेपणाच्या साऱ्या भीती आपोआपच कोलमडून पडतात.'

'ज्ञानेश्वरीविषयी काही बोलला नाहीत तुम्ही ?

शेल्फवर त्या ग्रंथाकडे बोट दाखवीत ते म्हणतात, 'ज्ञानेश्वर मला फ्रेंचमधे आणायचा आहे. पण ते इतकं सोपं नाही. माझी ती महत्त्वाकांक्षा आहेच. इवल्या आयुष्यात खूप काही करायचे संकल्प आहेत. बघू, सिद्धीस किती जातात.'

त्यांची साधना तपस्व्याची आहे. त्यांच्यामुळे, त्यांच्या वृत्तिप्रवृत्तीमुळं खरंच आता वाटायला लागलं आहे की, आपण आश्रमात आलोय. ह्या सगळ्या ऐश्वर्याचा, इस्टेटीचा हा धनी नाही. हा तर साधू आहे. हा तर ज्ञानपिपासू आहे. हा ज्ञानगंगेत चिंब बुडालाय.

ते पुढे सांगतात, तुमच्यापैकी कुणाजवळ खरंच एखादं प्रोजेक्ट असेल, काही संशोधन करायचं असेल, ग्रंथ लिहायचा असेल त्यानं माझ्या आश्रमात येऊन राहावं. त्याची सगळी सोय इथं होईल. ही शूड बी डेडिकेटेड टू हिज वर्क.'

'मी कधीतरी येईन ...' मी म्हणतो.

'तो राजवाडा तर पाहायचा राहूनच गेलाय.' शुभा म्हणते.


'ह्या योग्याच्या साम्राज्यापुढे तो राजवाडा शून्य आहे.'

कारमधे बसतो. कमानीतून कार जाते. मी मागे वळून पाहतो; एखाद्या भक्कम पुतळ्यासारखे ते उभे आहेत. समाधानी हास्य त्यांच्या ओठावर आहे. त्यांचा हात आसमंतात हलत आहे अन् वाडा माझ्या डोळ्यात विरळ होत आहे. वास्तू दूर जातेय. व्यक्ती तर मी माझ्यासोबत आणलीय. अगदी अंतरातल्या पालखीत बसवून. [क्रमशः]

---


# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | शतपावली | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १५ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १६ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १७ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १८ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १९ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| २० | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| २१ | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० – ०० |



शाळा कॉलेजात गप्प ऐकून घेणारी
शयनगृहात कान टवकारलेली
इतर रंगसंगतीत सूर मिळवणारी, अलिशान हॉटेलातली
सोसायटीच्या बांधकामात रेंगाळलेली
भाऊबंदकीच्या समाईकपणांत कोर्ट कचेऱ्यांत जाऊन आलेली
हॉस्पिटलची, वेदनांनी भारलेली
ज्ञानदेवाने कधीकाळी चालवलेली
भक्कम प्रकृतीची, ऐतिहासिक
वा आधुनिक, एकविटी अलगद
आडवी उभी
उंच ठेंगणी
मोजमापी विश्वाला अचूक कोंडणारी...
भिंत
आणि तिच्यासाठी फक्त
नेरोलॅक
NEROLAC
SOLDIER

# सोलकढी

## □ मुलाने अवमान केला म्हणून—

मुलांनी आईबापांचे (यांना अशा प्रसंगी 'माता-पिता' म्हणतात.) ऐकावे, की आईबापांनी मुलांचे ऐकावे, हा आमच्या मूलपणी वादाचा आणि परिसंवादाचा विषय नेव्हता. त्या वेळी सगळे आईबाप नाही नाही त्या गोष्टी मुलांना करायला सांगत असत; आणि मुले त्या निमूटनरमाईने करत असत. एखादा तापटतुकडोजी निघायचा. आईबापांवर रागवायचा. घर सोडून निघून जायचा. पुन्हा यायचा नाही. मुबलक मुलांमध्ये त्याबद्दलचे दुःख वाटून टाकले की, ते विरून जायचे. पण एकूण हा प्रकार अपवादात्मक. सगळे आज्ञाधारक अंतूच तर होते. आज्ञाधारकपणा हा ललामभूत (म्हणजे काय कुणास ठाऊक. पण आमच्या शाळेतले साहित्यिक मास्तर 'गुण' म्हणण्यापूर्वी, हा शब्द न चुकता वापरायचे. त्यांचे पाहून मीसुद्धा वापरू लागलो. एकदा तर हा शब्द वापरायच्या मोहाच्या भरात मी तो गुणधर्माच्या आधी योजून रसायनशास्त्राच्या उत्तरात 'मोरचुदाचे ललामभूत गुणधर्म' वर्णिले होते. आज बऱ्याच दिवसांनी हा शब्द वापरायचा योग आला.) गुण मानला जायचा. मुले आज्ञाधारक असल्यामुळे आईबापे आणखीनच आक्रस्ताळेपणा करायची. कर्दनकाळ बाप, कैदाशीण आई, आणि किडुकमिडुक पोरे, असा प्रकार घरोघर दिसायचा.

आता जमाना पालटला आहे. म्हणजे मुलांना मिशा फुटायच्या तेव्हाच फुटतात. पण मते बरीच आधी फुटतात. मने त्याच्याही आधी जागी झालेली असतात. त्यामुळे मुले म्हणून ऐकायची जी भूमिका आम्ही पार पाडली तीच आज आईबाप म्हणून आम्हाला पार पाडावी लागते आहे. मुले सांगतात: आईबापे ऐकतात. आज्ञाधारकपणा हा आजकाल (आईबापांचा) ललामभूत गुण मानला जातो.

आज्ञा करणे आणि आज्ञा पाळणे या दोन्ही गोष्टी स्वतंत्रपणे सवयलाव्या आहेत. आज्ञा करायची सवय एकदा जडली म्हणजे माणूस बेसुमार आज्ञा करत सुटतो. आज्ञा पाळायची सवय एकदा जडली म्हणजे माणूस बेशरम आज्ञा पाळत सुटतो. एखाद्या वेळी हा संकेत विस्कटतो. आज्ञा पाळणारा आज्ञा पाळत नाही. ती आज्ञा नवीनबिवीन नसते; जुनीच असते ती त्याने असंख्य वेळा पाळलेली असते. पण आता ती पाळायला तो नकार देतो. त्याकरता शिक्षा भोगतो. पण खरी प्रखर शिक्षा भोगतो आज्ञा करणारा. त्याला आज्ञा पाळणाऱ्याचे हे नवे, वेगळे वर्तन समजू शकत नाही. तो आपली आज्ञा पाळली जाणार असे लख्ख गृहीत धरतो; आणि ती पाळली जात नाही तेव्हा बिथरतो. स्वतःला शिक्षा करतो.

हे लक्षात घेतले तर, परवा एका सर्कसमध्ये जो प्रकार घडला त्याचा बऱ्यापैकी अन्वयार्थ लावता येईल. ही भारतीय सर्कस इंडोनेशियाच्या दौऱ्यावर होती. वाघांच्या थरारक खेळांमुळे सर्कस लोकप्रिय झाली होती. वाघांचे खेळ करणारे कोणी राव नावाचे रिंगमास्टर होते. एका खेळाच्या वेळी एका वाघाने रावांच्या आज्ञा पाळल्या नाहीत. त्याने आज्ञा पाळाव्या म्हणून रावांनी नाना युक्त्या केल्या. अखेर जबरदस्ती केली. तेव्हा वाघाने नखे काढली. रावांचा असह्य अपमान झाला. वाघावर त्यांची मुलासारखी माया होती. आणि या आज्ञाधारक मुलाने अकल्पितपणे आज्ञाभंग केला होता. पिता-पुत्रामध्ये जुळलेला संकेत विस्कटला होता. म्हणून रावांनी स्वतःला शिक्षा व्हावी यासाठी आत्महत्या केली. □

## □ पैसे मिळवण्यासाठी—

मला पैशाचे फार आहे. पैसे, अधिक पैसे, अधिकाधिक पैसे आपल्याला सारखे मिळत राहावेत असे मला वाटते. याबाबतीत आपल्या महाराष्ट्रीय बांधवांपेक्षा मी वेगळा आहे. महाराष्ट्रीय माणसाला पैशाचे बिलकुल नाही. खाऊनपिऊन सुखी असला की, तुडुंबतृप्तीच्या ढेकरा द्यायला तो मोकळा होतो. माझे तसे थोडेच आहे? खाऊनपिऊनसुखाच्या पलीकडे माझा किर्र अघाशीपणा आ वासून अफाट पडलेला असतो. त्यामुळे नवे पैसे मिळवायसाठी कायकाय–नि–कायकाय करता येईल याचा विचार मी अव्याहत करत असतो. मात्र कायकाय–नि–कायकाय म्हणजे काय वाटेल ते नव्हे. त्याबद्दल माझे काही आग्रह आहेत. पाठीच्या कण्याची मेणबत्ती करणारे काम, पैशासाठीसुद्धा, मला साधणार नाही. बरे, मुळीच कामबिम न करता, पहिले बक्षीस मिळवणारे लॉटरीचे तिकीट घेऊन किंवा एखाददुसरा परीस सापडवून वगैरे ऐश्वर्यवंत होणे माझ्या मानी स्वभावाला रुचणारे नाही. नरजन्माची विटंबना होईल त्याने. मात्र उद्या एखाद्या रसिक पैसेरावाने माझ्या 'सोलकढी'वर फिदा होऊन आपली जायदाद माझ्या ओंजळीत सोडली, तर चालेल मला ते. हात मागे घेणार नाही मी. करंटेपणा होईल तो. गुणाईताचा अपमान होईल त्याने.

हसू नका. पण असे काहीतरी कधीतरी होणार आहे, असा मला बुवा विश्वास वाटतो. ते होईल तेव्हा होवो. आज पैसे मिळवायसाठी एक गोष्ट मला करता येत नाही, याची मला खंत वाटते. तुम्हाला सांगतो, मी कोणी जंगी क्रीडापटू असतो ना, तर सोन्याचा कलप लावून हिंडलो असतो. महंमद अली ऊर्फ कॅशियस क्लेला मुष्टियुद्धाच्या सामन्यात कितीशून्यवाल्या रकमा मिळतात ते पाहता ना? तसाच तो ब्राझीलचा पेले. एकदोनतीनचारदहा टेनिसपटू. साधा आपला अजित लक्ष्मण वाडेकर नावाचा क्रिकेटखेळया घ्या. त्याच्या निवृत्तीची हमी घेतल्यावर झालेल्या गौरवी सामन्यात त्याला म्हणे एवढे पैसे मिळाले की, ते मोजताना त्याचा स्वतःचा, बायकोचा आणि मुलाचा डावा खांदा दमून गेला. नुकताच कुवेतने सौदी अरेबियाचा फूटबॉलमध्ये पराभव केला. आता आपल्या फूटबॉलपटूंना प्रशिक्षण देऊन अजिंक्य बनवण्यासाठी सौदी अरेबियाने कोटी ते दीडदोन कोटी डॉलर्स खर्चाची एक योजना आखली आहे.

सध्या तरी, जंगी क्रीडापटू होणे अमेरिकन सिनेटर्सचे सदेह मनोरंजन करणे, लॉकहीड कंपनीशी व्यवहार असणे, श्रीलंकेच्या भंडारनायके कुटुंबाशी नाते जोडणे, मध्यपूर्वेतल्या अरब अमीरकुळात जन्माला येणे, हिंदी चित्रपटांच्या दुनियेत अमोल पालेकरसारखे न–नायक म्हणवून अवतरणे, यांपैकी एखादी गोष्ट ज्याला जमेल त्याचे पैशाबाबत अगदी छानछुनछुन्नक होईल.

मला यातली कुठलीच गोष्ट जमणार नाही.

म्हणून पैसे मिळवण्यासाठी काटकसरीचा हुकुमी मार्ग पत्करायचे तूर्त मी ठरवले आहे.

—अनंतराव

# खुल्या निवडणुका

## देणग्यांनी येणारे दडपण

वा. दा. रानडे

कंपन्यांनी राजकीय पक्षांना देणग्या देण्यावरील बंदी उठविणारे बिल लोकसभेत नुकतेच मांडण्यात आले. दोन शर्तींवर ही बंदी उठविण्यात येत आहे. पहिली शर्त म्हणजे बंदी फक्त खासगी कंपन्यांपुरती उठणार आहे. दुसऱ्या शर्तीने देणग्यांवर कमाल मर्यादा घातली आहे. कंपन्यांना गेल्या तीन वर्षांतील सरासरी नक्त नफ्याच्या पाच टक्के किंवा पन्नास हजार यांपैकी जास्त असेल ती रक्कम देणगी म्हणून देता येईल.

कोणत्याही प्रकारच्या दडपणाशिवाय खुल्या मतदानाने झालेल्या निवडणुका हा लोकशाहीचा आत्मा आहे. मतदारांवर येणाऱ्या विविध दडपणांत सत्ता, पैसा आणि जात ही तीन प्रमुख दडपणे आहेत. त्यांपैकी पैशाचा प्रभाव सर्वांत जास्त. आपल्याकडे निवडणूक मोहिमेवरील खर्चाचे प्रमाण दर निवडणुकीत वाढतच आहे. हे केवळ आपल्या देशातच घडत आहे, असे नसून पाश्चात्य पद्धतीची लोकशाही स्वीकारलेल्या सर्वच राष्ट्रांत अशीच परिस्थिती आहे. त्यातून अमेरिकेत वॉटरगेट, जपानमध्ये लोकहीड यासारखी प्रकरणे घडत आहेत. 'अमेरिका, जपानच्याच मार्गाने आपण जाणार की, अमाप निवडणूक खर्चाला आळा घालण्यासाठी निर्धारपूर्वक उपाय योजणार,' हा आपल्या लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न आहे. देणग्यांच्या प्रश्नाचा विचार या संदर्भात झाला पाहिजे.

निवडणुकीत जो पक्ष सर्वांत जास्त खर्च करतो तोच निवडून येतो असा सर्वसाधारण अनुभव आहे. मोठ्या प्रमाणावर पैसा बड्या कंपन्याच देऊ शकतात, पण या पैशाच्या मोबदल्यात कंपन्यांना आपले हितसंबंध साधावयाचे असतात, परवाने व सवलती मिळवावयाच्या असतात. तेव्हा जो पक्ष दीर्घकाळ सत्तेवर आहे आणि सत्तेवर येण्याचा संभव आहे अशाच पक्षाला अधिक देणग्या मिळाव्यात हे स्वाभाविक आहे. या देणग्यांचा परिणाम सत्तारूढ पक्षाच्या धोरणावरही होत असतो. ज्यांच्या आर्थिक मदतीमुळे आपण निवडून आलो त्या वर्गास दुखविण्याचे, त्यांच्या हितसंबंधांना बाध येईल असे निर्णय घेण्याचे शक्यतो टाळले जाते. जाहीरनाम्यात आश्वासने दिली असली तरी त्यांची अंमलबजावणी लांबणीवर टाकली जाते.

कंपन्यांकडून मिळणाऱ्या देणग्यांचे हे अनिष्ट परिणाम टाळण्यासाठी देणग्या घ्यावयाच्या नाहीत, अशीच ठाम भूमिका राजकीय पक्षांनी घ्यावयाला हवी. स्वातंत्र्यातील १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळेपासून याबाबत राष्ट्रीय धोरण किंवा संकेत ठरविले जाणे आवश्यक होते. पण तसे काही घडले नाही. देणग्याबंदीचा कायदा नाही तर निदान संकेत रूढ व्हायला हवा होता आणि देशातील सर्वांत मोठा आणि स्वार्थत्यागी, स्वातंत्र्यलढ्याची परंपरा असलेला पक्ष म्हणून काँग्रेसने याबाबतीत पुढाकार घ्यायला हवा होता. कंपन्यांच्या देणग्या आम्ही स्वीकारणार नाही. आम्हाला त्याची आवश्यकता नाही. जनतेचा पाठिंबा हीच आम्हाला मिळालेली सर्वांत मोठी देणगी असून तिच्या बळावर आम्ही निवडणुका जिंकू, अशी आम्हाला खात्री वाटते, असे काँग्रेस नेत्यांनी त्याच वेळी जाहीर करायला हवे होते. तसे घडले असते तर पहिल्या निवडणुकीपासूनच निवडणुकांच्या राजकारणास एक निकोप वळण लागले असते. पण तसे काही घडण्याऐवजी उलट कंपन्यांनी राजकीय पक्षांना देणग्या देण्यास अनुमती देणारे बिल १९५६ साली मांडण्यात आले व ते पास झाले. देणग्या बंदीची मागणी मधूनमधून होत होती. तरीही ही पद्धती तेरा वर्षे चालू होती. दरम्यानच्या काळात १९५७, १९६२ व १९६७ अशा तीन सार्वत्रिक निवडणुका झाल्या. प्रत्येक निवडणुकीत प्रचारमोहिमेवरील खर्च वाढतच गेला. निवडणुकीवर अमाप खर्च करावयाचा आणि तो भरून काढण्यासाठी सत्तेचा गैरवापर करावयाचा, यातून भ्रष्टाचाराची साखळी तयार होत जाते.

देणग्यांना बंदी करून निवडणूक खर्चाला व भ्रष्टाचाराला काही प्रमाणात तरी आळा घालता येईल, या विचाराने १९६९ मध्ये कंपन्यांनी राजकीय पक्षांना देणगी-बंदी करणारे बिल पास झाले. पण अनिष्ट प्रथा केवळ कायद्यांनी बंद होत नाहीत, हा अनुभव या बिलाबाबतही आला. निवडणूकखर्च वाढतच गेला. काळा पैसा निवडणूकनिधीकडे वळविण्यात येत होता, त्याचे कोठे हिशेब नव्हते, नोंद नव्हती. बिलाचा उद्देश साध्य झाला नाही. उलट चोरटेपणा मात्र वाढत गेला. त्याला आळा घालण्यासाठी देणग्यांवरील बंदी उठविण्यात येत आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने वास्तविक दोन वर्षांपूर्वीच हा निर्णय घेतला होता. या बिलाने कोणत्या कंपनीने कोणत्या राजकीय पक्षाला किती रुपयांची देणगी दिली याची नोंद तरी कंपन्यांच्या ताळेबंदात राहील व ही माहिती कोणाला हवी असल्यास मिळविता येईल. निवडणूक खर्चाला यामुळे आळा बसेल असे नाही, उलट देणग्यांना कायदेशीरपणा प्राप्त झाल्यामुळे खर्च वाढण्याचाच अधिक संभव आहे.

देणग्यांच्या प्रश्नावर योग्य भूमिका कोणती ? कायद्याने बंदी असो-नसो, कंपन्यांकडून देणग्या घ्यावयाच्या नाहीत, असे राजकीय पक्षांनीच ठरवायला हवे. सर्व पक्षांनी एकत्र विचारविनिमय करून हा संकेत ठरवायला हवा. देशातील सर्वांत मोठा पक्ष—काँग्रेसने याबाबतीत पुढाकार घेतला पाहिजे. त्या पक्षाने हा निर्णय घेतला तर तो इतर पक्षांनाही तेच धोरण स्वीकारण्याचा विचार करावा लागेल. मुख्य प्रश्न काँग्रेसच्या धोरणाचाच आहे. कारण कंपन्यांच्या सर्वांत जास्त देणग्या काँग्रेसलाच मिळतात असा आतापर्यंतचा अनुभव आहे. काँग्रेसनेते असा निर्णय घेतील काय ? त्यांच्यात तसा विचारप्रवाह असल्याचे एकाही नेत्याच्या भाषणातून सूचित झालेले नाही.

निवडणुकीवर उमेदवाराने किती खर्च करावा याला कायद्याने मर्यादा घातल्या आहेत, पण राजकीय पक्षाने किती खर्च करावा याला काहीही मर्यादा नाहीत. त्या घालण्याची आवश्यकता आहे. तसेच राजकीय पक्षांनी निवडणुकीसाठी किती पैसा जमविला, कसा जमविला, तो कोणत्या पद्धतीने खर्च केला, याची तपशीलवार माहिती सादर करण्याची त्यांच्यावर कायद्याने सक्ती करण्यात यावी, म्हणजे निवडणूक खर्चाला आणि निवडणूक मोहिमेतील भ्रष्टाचाराला काही प्रमाणात तरी आळा बसेल. □

## तिसऱ्या शतकात होऊन गेलेल्या एका जगन्मान्य भारतीय कामसूत्रकाराच्या जीवनावर आधारलेली एक ललितरम्य कादंबरी ( भाग ८ )

# वा त्स्या य न

## दि. बा. मोकाशी

### । कामशास्त्राचे वाचन ।

तिसऱ्या दिवशी सकाळी वात्स्यायनाच्या पत्नीने रोजच्या आयव्ययाची पाटी काढली आणि त्याचा पुढील चार महिन्यांच्या कार्यक्रमाला खरा आरंभ झाला.

ती त्याला मागील सहा महिन्यांचे आयव्यय सांगत असताना त्याचे नीटसे लक्ष नव्हते. जणू आपण निघताना हे असे करावयाचे सर्व ठरले होते व ती आढावा देत होती. पण तसे काही बोलणे झाले नव्हते. त्याला तसे अचानक निघून जावे लागले. सहा महिन्यांचा व्यवहार तिनेच सांभाळला होता. ती द्रव्याचे देणे घेणे सांगत असता, रात्री आपल्या छातीवर डोके टेकून तिने अश्रू ढाळले आणि खोलीत येताच धावत येऊन तिने आलिंगन दिले त्या सर्वांचे तिच्या तोंडावर दिसताय का तो पाहत होता. ते दिसण्याचे काही कारण नाही. कारण एक उद्योग चालू असता दुसऱ्या उद्योगाचे मनात राहत नाही. पण दिसावे असे वाटते. ते कसे दिसावे हे सांगता येत नाही. पण दिसले तर या आयव्ययाच्या रूक्ष कार्यात गोडी येईल.

काल पत्नी पुढे आली तेव्हा तिने पांढरे पातळ नेसले होते, शरीर अलंकारशून्य होते, केस मोकळे होते. आज साजशृंगारामुळे ती किती मनोहर दिसत आहे ! आज केसांची वेणी आहे. त्यात मजिऱ्या आणि फुले खोवली आहेत. वस्त्र केशरी रंगाचे आहे आणि सोन्याच्या अलंकारांनी तिच्या गौर तांबूस वर्णाला लोभसपणा आला आहे. डोळ्यातले काजळ किंचित बाहेर आले आहे आणि हातापायांना लावलेला आळोता, जमिनीवर कर्दळींची फुले शोभावीत तसा शोभत आहे.

त्याचे आपल्याकडचे लक्ष पाहून पत्नीने कृतक कोपाने त्याच्याकडे पाहून, लाजून खाली पाहिले. वात्स्यायनाला विजय मिळाल्याचा आनंद झाला. आपल्या मनात होते ते आपण तिच्या मनात आणले. तो तिला म्हणाला, ' चल आपण उद्यानात जाऊ. '

तिकडे जाण्यापूर्वी तिने त्याला गोठ्यात बघून व्यालेल्या तीन गाईंची वासरे दाखवली. तिने वासरांना गोंजारले. तिला पाहताच गाईंच्या माना वर झाल्या. त्यांच्या मानेखालून तिने हात फिरविला. तेथून जाता जाता तिने कोंबड्या, मेंढे आणि शेळ्या दाखविल्या. हे दाखवताना तिचे डोळे विचारीत होते– पाहा ! सहा महिन्यांपूर्वी होते तसेच ठेवले आहे ना ?

शेतात गेल्यावर नांगरटी सोडून माणसे दोघांभोवती गोळा झाली. आस्थेने आणि मोकळेपणाने तिने त्यांचे कुशल विचारले. धनिणीला पाहून त्यांची तोंडे प्रसन्न झाली होती. तिने त्यांनाच बोलू दिले. त्यातून वात्स्यायनाला जागोजागी काय पेरले आहे आणि पेरणार आहेत हे कळले, एका जागी ऊस लावला होता. दुसरीकडे राई आणि भात लावणार होते. ऐकता ऐकता वात्स्यायनाचे डोळे वेगळेच शोधीत होते. आपण करीत आलो तेच तिने चांगले केले आहे. कांदा, मुळा, भोपळाही लावलेला दिसतोय. याच जागा आपण ठरवल्या होत्या. पण आता आपल्याला वेगळे वाटतेय. दूरदूरच्या शेतातून धान्य पेरावे. मधे एक तळे हवे. त्यात कमळे लावावी. घाट बांधावा. भोवताली फुलझाडे लावावी, लतामंडप करावे, वासतिकेच्या घरासारखे वाटावे.

हे सारे करू—दक्षिणेत जाऊन आल्यावर. या प्रवासानं आपली दृष्टी मोठी केली आहे. घर सोमलासारखे करू. त्याचे चवरंग, त्यावरची आसने. भिंतीवर उत्तम चित्रकलांचे नमुने. आता त्याबद्दल बायकोशी बोलायचे नाही. आपण आलो ह्याच आनंद तिला आज पुरेसा आहे. पावसाळ्याचे हे चार महिने मात्र निरुपयोगी जाणार. नंतरच्या जाण्याचे सारखे मनात राहून आपण इथे नाहीच असेच जवळजवळ होणार. मित्रमंडळीत मन रमणार नाही. शोध घेऊन आल्यावरच आपले आपण होऊ.

त्याला वाटू लागले की शोध अर्धा सोडून आलो ते ठीक केले नाही. परस्पर दक्षिणेत जातो तर बरे होते. पत्नीशी एका रात्रीचे सुख मिळाल्यानंतरचा ह्या विचार आहे हे तो विसरला. आणि आणखी सप्ताहभर राहून येथून निघावे असा विचार करू लागला.

शेतावरून परत येताना पत्नी पुढे चालत होती. मागे मान न करता तिने विचारले,

' रात्री बाहेर जाणार आहात का ?'

' बाहेर ' याचा अर्थ आनंदिकेकडे असा होता. त्याने ते ओळखले. वर्षाऋतू आला आहे. तिच्याकडे त्या ऋतूला धरून काही मनोरंजन असणार. ' बायको माहेरी गेली आहे वाटतं ?' तिचा सूर अजून त्याच्या कानात होता. तो म्हणाला,

' नाही, कुठे जाणार नाही. '

पत्नी म्हणाली,

' मी तेच म्हणणार होते. चार दिवस विश्रांती घ्या, मग मित्र-

मंडळींना बोलवा. सारी वाट पाहत असतील. आनंदिकेचे गायन आणि नृत्य ठेवा. चला ! तुम्हाला गंमत दाखवते.'

मग हाताने धरून घरापर्यंत नेऊन घराच्या मागील परसूत नेले. तिथे एक छोटे घरटे केले होते. घरटयाच्या तोंडाशी बांबूचे दार उभे करून ठेवले होते. ते उचलून बाजूला ठेऊन वाकून त्याचा हात ओढीत आत शिरली. तेथे तेथील जमिनीवरची जात्याची भंगलेली पाळी बाजूला करून, हांथरलेला तट्टया उचलून तिनं बाजूला केला. तट्टया काढताच जमिनीत लांबरुंद खड्डा दिसला. तेथे रांगेने मडकी ठेवली होती.

वात्स्यायनाने खोल श्वास घेतला. आसवांचा मधुर उग्र वास तेथून दरवळत होता. पत्नी म्हणाली,

'मद्याच्या पात्रांसाठी ही जागा केली आहे. पूर्वी उघडयावर होती तेव्हा मडकी चोरीला जात.'

आपण आल्यावर मित्रपरिवार बोलावून गोष्ठीसमवाय होतील यासाठी आधीच हिनं योजना केली. पण त्याचा उपयोग नाही. मित्रांत मन रमणार नाही. आणि एखादा सप्ताहच येथे असू. पण तिला हे कसे सांगणार ?

घरात आल्यावर पत्नी तिच्या उद्योगांना गेल्यावर झोपाळयावर एकटाच बसून वात्स्यायन विचार करीत बसला. आपले नेहमी असे का होते ? येथे पावसाळा काढावयाचा ठरल्यावर तो आनंदात काढायला काय हरकत आहे ? पण आपलें मन मद्य प्यालेला घोडा धावतो तसे धावते. कुठलंही सुख पूर्णपणे घेता येत नाही. कसलाही निर्णय ठाम घेता येत नाही. पत्नी माहेरी गेली तेव्हापासून सारे हुकत गेले. ती माहेरी गेली नसती तर आपण पाठोपाठ अवंतीला गेलो नसतो. तेथे गेलो नसतो तर, अंगरिक्षाला उपदेश केला नसता. त्याला उपदेश केला नसता तर तो वासंतिकेला घेऊन पळून गेला नसता, आणि तो पळाला नसता तर, पाटलीपुत्राची यात्रा करावी लागली नसती.

'पण तू पत्नी माहेरी गेल्यामुळे एवढा अस्वस्थ का व्हावास ?' त्याने स्वतःला विचारले. याच खोलीत तू फेऱ्या घालीत होतास. हे समोरच्या कोनाडयातले ग्रंथ वाचायला काढले असतेस तर बराच शांत झाला असतास. आणि पुढचा व्याप टळला असता. आताही तुला ते करता येईल.'

महेश्वरदत्त दारिद्रयामुळे ग्रंथापासून दूर गेला. आपण सधनतेमुळे दूर गेलो. श्रीमंती आणि गरिबी दोन्ही स्थिती ग्रंथापासून दूर नेतात. सुदैव हे की आपण प्रवासाला गेलो. चर्चा ऐकल्या. प्रवासात जे जे पाहिले, अनुभवले, ऐकले त्याची कालची रात्र परिपाक होती. पत्नीला आपल्यातले स्थित्यंतर जाणवले असेल. एवढयात कामसूत्रे लिहू नका. असे तिने सांगितले तसे पुढे मागे त्याबद्दलही सांगेल, तीही विरहाकुल होती हे विसरता कामा नये. स्त्रीपुरुषाचे रतिसुख एकच असते असे आपण सिद्ध केले.—आपला तेव्हाचा विजय आठवून तो संतोषाने स्वतःशी हसला—आता स्त्रीची विरहाकुलता आणि पुरुषाची विरहाकुलता एकच असते का हेही पहायला हवे.

नकळतच उठून तो कोनाडयाकडे गेला आणि त्याने बाभ्रव्याचा कामशास्त्राचा ग्रंथ चाळावयास घेतला. चाळता चाळता तो त्यात रंगून गेला. अरे ! आचार्य सुवर्णनाभाने असे म्हटलंय !—नां ? आचार्य घोटकमुखानं युक्त ते जाणले आहे.—छे छे ! आचार्य गोणिकापुत्राने असे म्हणावे !—असे उद्गार वाचता वाचता त्याच्या मनात येत होते. विरहाकुलतेचा विषय बाजूला पडला. एकदा पुढचे, एकदा मागचे अशी अधिकरणे चाळीत असता, आपण शिकलो त्यावेळेपेक्षा आपल्याला खूपच कळतंय हे त्याच्या लक्षात आले. आणि इथे हे असे हवे—इथे हे असे नको, असेही त्याच्या मनात येऊ लागले.

असे दोन तीन दिवस बाभ्रव्याचे कामशास्त्र वाचीत राहिल्यावर त्याच्या मनाला स्थिर वाटू लागले. मग तो रोज प्रातःकाळी उठून बाभ्रव्याचे वाचन करू लागल्यावर एक दोनदा पत्नीनं मागे येऊन डोकावून पाहिले. पण त्याच्या वाचनात तिने व्यत्यय आणला नाही. नवरा आल्यापासून अस्वस्थ आहे. हे तिच्या ध्यानात आले होते. जर बाभ्रव्य वाचून त्याच्या मनाला स्वस्थता लाभत असेल तर उत्तमच. नवऱ्याबद्दल तिला वाटू लागलेली चिंता काहीशी दूर होऊ लागली. ◻

## पुन्हा शोधासाठी प्रयाण

चार महिन्यांनंतर दक्षिणेकडे निघताना यावेळी वात्स्यायनाने बाभ्रव्याचा कामशास्त्राचा ग्रंथ बरोबर घेतला नाही. ग्रंथ मागे ठेवण्यामागे सावधगिरी होती, तशीच एक भावनाही होती. वर्षाऋतू संपत आला होता तरी, अजून सर येण्याचे भय होते. त्याला ग्रंथ भिजेल अशी काळजी वाटू लागली होती. या ग्रंथाची अशी चिंता त्याला प्रथमच वाटली होती. ग्रंथ मागे ठेवण्यात भावना होती ती सोबत ठेवण्याची. आपले असे काहीतरी पत्नीला सोबत ठेवल्यासारखे होईल. तसे हे दोन्ही विचार अगदी किरकोळ होते. कामासाठी घराबाहेर पडताना डावे पाऊल प्रथम पुढे पडते, की उजवे हे पहावे इतके ते विचार साधे होते. जाण्याच्या आदल्या रात्री वात्स्यायनाने बाभ्रव्याचा ग्रंथ पत्नीच्या साहाय्यानं नवे रेशमी वस्त्र घेऊन त्यात बांधून ठेवला होता. त्यामुळे आपल्याला या ग्रंथाचे वाटणारे महत्त्व तिला कळेल असे त्याला वाटले होते. आपण परत येईपर्यंत तिने तो वाचून ठेवावा असे तिला सांगावे असे त्याच्या मनात आले पण तो तिला बोलला नाही. तिने आपण होऊन वाचावा.

ग्रंथ घरी ठेवून आपल्यात आणि बाभ्रव्यात काही वेगळे नाते निर्माण झाले आहे हे त्याने नकळत मान्य केले. गेल्या वेळी गुरूने दिलेला ग्रंथ म्हणून शुभाशुभ भावनेने त्याने तो नेला होता. पण पाटलिपुत्राच्या प्रवासाने आणि नंतर तो ग्रंथ पुन्हा वाचल्यावर त्याबद्दल आपुलकी वाटू लागली होती. तो गुरूने दिलाय आणि पुन्हा नवे कामशास्त्र लिहून काढण्याची त्याने आज्ञा केली, इतकी ही भावना परस्थ नव्हती. अंगरिक्षापासून आणि वासंतिकेच्या घरच्या उद्यानापासून आणि विरहानंतरच्या पत्नीच्या एका रात्रीपासून तो या ग्रंथापर्यंत एक बंध निर्माण झाला होता. चाणक्याच्या अर्थशास्त्राचे वेळी तो निर्माण झाला नव्हता. अर्थशास्त्र काय किंवा गृह्यसूत्रे काय, हे नेहमी दुसऱ्याने लिहिलेले ग्रंथ होते. हे ग्रंथ वाचताना, पर्वतावरून खोल दऱ्यांकडे किंवा पडणाऱ्या प्रपातांकडे पहावे तसे आश्चर्य आणि कौतुक होते, पण आपुलकी नव्हती. उलट बाभ्रव्याचा ग्रंथ आपल्या

आयुष्यातले सांगत आहे असे त्याला वाटू लागले होते.

घर सोडणे—पत्नीचा निरोप घेणे हे त्याला यावेळी मागच्याइतकं जड गेलं नाही. त्यावेळची तातडी नव्हती किंवा भयही नव्हते.शिवाय महेश्वरदत्त बरोबर आला तर त्यालाही न्यावे, असे त्याने ठरविले होते. महेश्वरदत्ताला आपला वाडा सोडून क्षिप्रेपलीकडे झोपडी बांधून राहावे लागले आहे, हे ऐकल्यापासून त्याला मित्राची चिंता वाटू लागली होती. त्याला न्यावे. त्याच्या बायकोला आपल्याकडे राहण्यास सांगावे. महेश्वरदत्ताला समवेत नेण्याच्या कल्पनेने वात्स्यायनाच्या पत्नीलाही धीर आला होता. वात्स्यायनाला निरोप देताना तीही इतकी विकल झाली नव्हती.

या चार महिन्यांत तो गावात कुणाकडेही गेला नव्हता. पूर्वीची नाती, गावातले उत्सव, समारंभ, गोष्ठी, वगैरे पुन्हा चार महिन्यांनी अंतरणार असल्याने आपण दूर आहोत असेच समजावे असे त्याने ठरवले. शिवाय मित्रमंडळींत पूर्वी इतके रमू की नाही, हाही संशय मनात होता. पूर्वी मित्र घरी बोलावले, गणिका आनंदिका आली, उत्तर रात्रीपर्यंत मनोविनोद केले की, त्यात सुख वाटत होते. आणि असा समारंभ संपून निमंत्रित घरोघरी गेल्यावर येणारा शीण आणि वाढलेले समाजातील स्थान यात कृतार्थता वाटली होती. पण आता गणिका म्हणजे मन रंजवणारी व मित्र म्हणजे मन आनंदित करणारे आणि समारंभ म्हणजे समाजातील स्थान उंचावणारे एवढ्यावरच आपण थांबणार नाही. प्रत्येक मित्राचा आपण वेगळा विचार करीत राहू. 'जो तो आपले सुख योग्य रीतीने घेतो आहे का?' पाहत बसू, असेही त्याला वाटले होते.

पण आपण किंवा आपले मित्र काही वेळा योग्य वागलो आहोत हे आपण विसरता कामा नये. गेल्या वसंतऋतूत एका मित्राने गोष्ठी समवाय भरवला त्यावेळी गणिका आनंदिकेला आदराने आणि प्रेमाने मांडीवर घेऊन मित्रांसमवेत काही काल विनोद, फलाहार आणि मद्यपान केल्यावर त्याने दासीला हळूच खूण करून तिच्याकडून मित्रांना अत्तर-पाणी देववताच सारे मित्र बाहेर पडले. त्यावेळी मित्राला आणि आनंदिकेला शुभ चिंतून सर्वांत शेवटी आपण बाहेर पडत असता दोघे उठून आत गेल्याचे आपणास हालचालींवरून कळले. मित्राच्या त्या औचित्यपूर्ण वागण्याबद्दल तेव्हा आपणास कौतुक वाटले होते. आजही वाटते आहे.

आनंदिका घरावरून भिजत चालली असता एकदा आपणही असेच औचित्य दाखविले होते. तिला आत बोलावून पत्नीकडून वाळलेली वस्त्रे देववली होती. तिला भिजल्याने थंडी होऊ नये म्हणून मद्य देऊन, पाऊस थांबताच प्रेमाने व आदराने निरोप दिला होता. घरी पावसात भिजत येणाऱ्या स्त्रीला कसे उपचार करावे हे बाभ्रव्याने दिले आहे. ते वाचले असल्याने नकळत आपण ते केले असेल. अर्थात भिजत येणाऱ्या अभिसारिकेविषयी बाभ्रव्याने लिहिले आहे. तो म्हणतो तसे आपण कोरडे वस्त्र दिले. पण तिचे अंग चेपले नाही किंवा स्वहस्ते मद्य दिले नाही. आनंदिका अभिसारिका नव्हती हे निराळे. पण प्रसंग तोच, भिजत येण्याचा होता व आपण यथायोग्य वागलो. पूर्वीच्या अशा काही उचित गोष्टी आठवत असूनही आपण मित्रपरिवारापासून दूर राहिलो. मित्रपरिवारात एकदा मन रमले की, गाव सोडण्यास आपण विलंब करीत राहू, हे भयही त्याला वाटले.

यावेळच्या प्रवासासाठी वात्स्यायन दोन घोडे घेऊन निघाला. दुसरा घोडा महेश्वरदत्तासाठी होता. घोड्यांवरच्या बैठकी, पिशव्या, त्यात न्यावयाच्या आवश्यक वस्तू जमवताना आठ दिवस गेले. पत्नीने आपल्या हाताने प्रत्येक लहान-मोठी वस्तू पिशव्यांतून भरली होती. प्रत्येक वस्तू आणि अन्नपदार्थ दोघांच्या पिशव्यांत सारखे विभागून ठेवले होते.

मागील भेटीपासून वात्स्यायनाचा महेश्वरदत्तावर विश्वास व श्रद्धा बसली होती. अवंतीत या विश्वासाबद्दल अनेक हसले असते. पण महेश्वरदत्त विट झाला हे मान्य केल्यावर, विटांतला तो उत्तम विट आहे हे मान्य करावे लागेल, असे वात्स्यायनाचे मत होते. शिवाय मित्र हा पूर्व सहवासामुळे मित्र असतो. महेश्वराचा पूर्वसहवास मधाहूनही मधुर होता.

'तुमच्याविषयी तिकडे उत्तम ग्रह आहे' असे पत्नीने सांगूनसुद्धा मनात संकोच होता तो सासुरवाडीस जाण्याचा. पत्नीने 'माझ्या आई-वडिलांस भेटल्याशिवाय पुढे जाऊ नका'. असे वारंवार म्हटले होते. शोध अजून चालूच आहे. घरी येणे हा केवळ मधला टप्पा होता असे ती का धरीत नाही? शोध पूर्ण झाल्यावरच तिकडे गेलो, तर सर्वांनाच बरे होणार नाही काय? सासुरवाडीस जाण्यास आपण भीत आहोत, हे त्याला कळत होते. मग मनात येत होते— जावेच लागणार असेल तर जाऊ. तेवढे ओझे कमी. अवंतीतला वास जेवढा आवरता येईल तेवढा आवरू. रात्री महेश्वरदत्ताकडेच झोपू. सकाळी त्याला घेऊनच अवंती सोडताना सासुरवाडीस डोकावू. ◻

## झोपडीला चांदीचा कळस

या वेळी घोड्यावर स्वार असल्यामुळे संध्यासमयाच्या आधी चार घटिका वात्स्यायन अवंतीच्या वेशीत शिरला.

नगरीत वस्तू विकायला किंवा घ्यायला आलेल्या व्यापाऱ्याला नगरी दिसत नाही, केवळ त्या वस्तूचा हाट किंवा पेठ दिसते. तसे वात्स्यायनाच्या व्यग्र मनात महेश्वरदत्ताला गाठून अवंती सोडायची या शिवाय काही विचार नव्हते. महेश्वरदत्ताच्या वाड्यात जाण्यापूर्वी एका पाणवठ्यावर घोड्यांना वैरण देऊन त्याने पाणी पाजले. कातड्यांचा हाट गाठून त्याने पाण्यासाठी दोन कातडी पिशव्या विकत घेतल्या. नंतर परोठे, भजी आणि बर्फी खाऊन त्याने स्वतःला ताजेतवाने केले आणि महेश्वरदत्ताच्या घरी न्यायला बर्फी वगैरे खाद्यपदार्थ बांधून घेऊन त्याने आपली घोडी त्याच्या वाड्याकडे वळवली.

वाड्याशी तो आला तेव्हा त्याने तो ओळखलाच नाही. वाड्याला पांढरा रंग दिला होता. दारे खिडक्यांना तेलपाणी दिले होते. वाड्याचे नवे रूप पाहून तो मनात चरकला. महेश्वरदत्त मागच्या भेटींत बोलला त्याप्रमाणे झाले होते काय? शेवटच्या दोन खोल्याही त्याने कर्जापोटी धनशेटीला देऊन ठरल्याप्रमाणे उज्जयनीबाहेर तो झोपडीत रहायला गेला काय? गेलाच असला पाहिजे. त्याला निश्चितपणे वाटले. एकदम वात्स्यायनाच्या मनात आले—तिथे तरी

त्याच्या पत्नीला सुख लागो.

त्याने वाड्यापासून घोड्याची तोंडे वळवली. महेश्वरदत्त वेसमधे भेटेल आणि भेटला नाही तर तिथली कोणतीही दासी त्याचा ठावठिकाणा सांगेल. वेसकडे जात असता त्याच्या मनात येत होते. तीन पिढ्यांचे वैभव पाहता पाहता ओसरले. तारुण्य हे जाण्यासाठी येते तसे वैभवही जाण्यासाठी येते. त्यात कुणाची चूक असते नसते. श्रेष्ठीकुलात स्वैरवृत्ती घेऊन हा मुलगा जन्माला का यावा? त्याला व्यापारात आनंद न वाटता वेसेत गणिकांच्या सहवासात का आनंद वाटावा ? द्यूत, मद्य, गणिका यात संपत्ती गमावलेला म्हणून लोक त्याला ओळखतील. हळहळतील. पण जसा आहे तसाच तो आपल्याला प्रिय आहे. त्याचे उदार, खेळकर मन कुणी जाणणार नाही. तेच त्याचे वैभव आहे, जे एखाद्यालाच लाभते. त्यासाठीच त्याच्यावर आपण लुब्ध आहोत. आयुष्याचं त्याला किती प्रचंड कळताय हे आपल्याला ठाऊक आहे. अशा कळण्यानंच माणूस स्वतः थोर पदाला जातो. पण ऐश्वर्यानं माणसाला, दुसरे थोरपदावर चढवतात.

वेसेसी जिथं तोंड फिरवून महेश्वरदत्ताने त्याचे स्वागत केले होते तिथे वात्स्यायन आला आणि तो सगळा प्रसंग त्याला आठवला. वेसेशी येताच महेश्वरदत्त जणू बदलून गंधर्व झाला होता. या वेशीपासून पुढे त्याने गंधर्व नगरीच उभी केली होती. इथे कांही कुरूप नव्हते, नखक्षतांनी भरलेली म्हातारी–ती सुंदर होती. कंदूक खेळणारी गणिका, तो कात्रंतिक, आणि त्याची दासी, आणि खांबाआड लपलेली गणिका आणि कावळ्याला पिंड घालणारी विरहिणी–

वेसेत हालचाल सुरू झाली होती. 'त्यावेळी भेटलेली ही सारी आजही भेटतील का?' एखाद्या नगरीत अनेक वर्षांनी आल्यावर परिचित भेटण्याचे भय वाटते व आनंदही वाटतो तसे त्याला झाले. एखादा परिचित धनाढ्य झालेला असतो. एखादा प्रकृतीने ढासळलेला दिसतो. एखादा दारिद्र्याच्या भोवऱ्यात आढळतो. तसे या सहा महिन्यांत ती म्हातारी मेलेली असेल. आणि महेश्वरदत्त दुःखात असेल. कात्रंतिकाला त्याची प्रिया दासी मिळाली असेल आणि कंदुक खेळणाऱ्या गणिकेला धनिक प्रियकर मिळून तिने वेस सोडली असेल. पिंड घालणाऱ्या विरहिणीचा प्रियकर घरी आला असेल. आणि आपल्याप्रमाणेच तिचे 'उपवास' सुटले असतील.

वात्स्यायन स्वतःशी हसला. अनेक वर्षांनी परिचित स्थळी आल्यावर तेथील परिचितांच्या आर्थिक आणि प्रकृतीच्या स्वास्थ्याच्या विचाराआधी त्यांच्या रतिसुखाचे मनात यावे ! कात्रंतिकाला दासी लाभली असली तर सहा महिन्यांत रतिसुखाचा आनंद मिळाला असेल का ? कोणते प्रश्न त्यांना पडले असतील ? सुंदर गणिकेने किती धनिक गाठले असतील आणि तिने सोडलेले रतिसुखाच्या अभावामुळे सोडले असतील की अन्य कारणांनी ? खांबाआड लपलेल्या गणिकेने रतिसुखाचा अतिरेक करून क्षय लावून घेतला असेल का ? त्याचप्रमाणे नागरिक परस्परांना भेटले की मुलाबाळांचे, प्रकृतीचे क्षेम विचारतात त्या ऐवजी आपले रतिसुख क्षेम आहे ना ?'. असेही विचारायला काय हरकत आहे ? वात्स्यायन स्वतःशी हसला. हा अगदी नवा विचार सुचला. सोमलाला सांगितला पाहिजे.

एका घरातून एक दासी बाहेर येऊन वात्स्यायनाकडे पहात थबकली. तिला पहाताच महेश्वरदत्त अंगात संचारावा तसा तो म्हणाला,

'हे सुंदर सेविके ! मी परदेशांतून महेश्वरदत्तास भेटावयास आलो आहे. तो इथं आला आहे काय ?

वात्स्यायनाकडे निरखून पहात ती म्हणाली,

'तो धूर्त विट ! तूही धूर्त दिसतोस. कारण मला सुंदर म्हणतो आहेस. तो तुझा विटमित्र दुपारीच घरी गेला. चार दिवस तो आपल्या पत्नीच्या सोबतीसाठी कुरूप, बहिरी, म्हातारी दासी शोधीत होता. आत्ताच त्याला एक शूर्पणखा मिळाली. तिला घेऊन तो घरी गेला ?

'कुठे आहे त्याचे घर ?'

'क्षिप्रेपलीकडे, शंकराच्या देवळाच्या मागे, रान तोडून त्याने झोपडी बांधली आहे. झोपडीवर एक उंच काठी लावली आहे. काठीच्या टोकाला चांदीचा पत्रा गुंडाळला आहे. तो या तीरावरूनही चमकताना दिसेल.'

महेश्वरदत्ताच्या झोपडीचा चांदीचा कळस क्षिप्रेच्या अलीकडच्या तीरावरूनच वात्स्यायनाला दिसला. दोन्ही घोडी होडीत चढवून पलीकडच्या किनाऱ्याला लागून, किनाऱ्याची चढ चढून वर येताच दुरूनही कळसाची चकाकी डोळ्यात शिरली. अंतर दिसत होते त्याहून अधिक निघाले आणि शंकराच्या देवालयाच्या पुष्कळच मागे होते. किनाऱ्यालगतच्या झाडीतून पुढे आल्यावर काही अंतरापर्यंत झुडुपे होती. अधून मधून बाभळी उभ्या होत्या आणि पुढे आरंभ झालेल्या दाट झाडीशी झोपडी होती. त्या झोपडीशी पोहोचला तेव्हा महेश्वरदत्त झोपडीपुढील अंगणात खाटेवर उताणा पडला होता. बहुधा तो निद्रेत असावा. अगदी जवळ येईपर्यंत त्याला वात्स्यायनाचा पायरवही कळला नाही. वात्स्यायनाला पाहताच उठून बसत तो म्हणाला,

'मित्रा ! तुझे स्वागत असो.'

मग उठून त्याने वात्स्यायनाला मिठी मारली आणि चारपाईकडे आणून बसवीत म्हटले,

'वात्स्यायन ! ही पर्णकुटी तुला कशी सापडली ?'

वात्स्यायनाने हसत झोपडीवरच्या चांदीच्या कळसाकडे बोट केले. महेश्वरदत्त म्हणाला,

'बघ ! या कळसासाठी लोक मला हसले, पण या कळसानेच माझ्या प्रिय मित्राला माझे घर दाखविले. अरे या कळसाची कथा साऱ्या अवंतीभर झाली आहे, ती ऐक. धनकोनं माझा वाडा घेतला. आणि मी उघड्यावर पडलो ही वार्ता वेसेत कळताच साऱ्या गणिका माझे सांत्वन करायला आल्या, एकीने ही जागा मला दिली. काही गणिकांनी झोपडे बांधून दिले. काहींनी माझ्यासाठी व पत्नीसाठी वस्त्रे दिली. काहींनी भांडीकुंडी दिली. आणि सर्वांनी मला चांदीचा कलश घेतला. मित्रा ! सारी उज्जयनी हा देखावा पाहत होती आणि माझ्या डोळ्यातून अश्रू पडत होते. मीच नव्हे, तर अनेकांनी त्या दिवशी अश्रू गाळले. मित्रा ! मला खरेच त्या दिवशी गलबलून आले. आम्ही झोपडीत राहायला आलो. मी त्या चांदीच्या कलशाचा कळस करून घेतला आणि झोपडीवर लावला. वेशेची आणि गणिकांची हा कळस विजयपताकाच आहे. आरामात बस. अवंतीतल्या कोंडलेल्या हवेहून इथे मोकळे वाटते की नाही सांग. तुझी वहिनीसुद्धा प्रसन्न आहे. बरे ! तुझी पत्नी आणि मुलें क्षेम आहेत ना ?

वात्स्यायन म्हणाला, 'हो.'

'अरे, मी हे तुला काय विचारतो आहे ? तू पाटलीपुत्रास गेला होतास ते ध्यानातच नाही.

वात्स्यायन म्हणाला, 'मी पाटलीपुत्राहून नगरला गेलो आणि तेथून इथे आलो.'

'अंगरिक्षा वासंतिका दोघांना घेऊन आलास ?'

'नाही. मी गेलो त्यापूर्वीच दोघे पाटलीपुत्र सोडून दक्षिणेकडे गेले होते. मी परत नगरला येऊन पावसाळ्याचे चार महिने काढले. आता परत दक्षिणेकडे, त्यांच्याच शोधास निघालो आहे."

महेश्वरदत्त म्हणाला, 'तुला एक अशुभ वार्ता देतो. वासंतिकेचे मातापिता तिच्या दुःखानं मृत्यू पावले. तुझ्या सासुरवाडीस मी एकदा जाऊन आलो. तेही दुःखात आहेत. तुझ्याकडून काही कळेल या आशेवर ते आहेत. त्यांना भेटून पुढे जाण्याचा तुझा मानस दिसतो. तो योग्यच आहे.

वात्स्यायन म्हणाला,

'त्यांना भेटणारच. पण तुलाही भेटायला आलो आहे. तुला बरोबर घेऊन जायला.'

'कुठे ?'

'दक्षिणेत. तुझ्या मागे विशेष कार्य नसेल तर चल.'

'खरं सांगायचं म्हणजे काही कार्य नाही. आणि असले तरी अवंती सोडण्याचा मोह आवरत नाही. मल्लनाग ! मी आता वेसेला आणि गणिकांना कंटाळलो आहे. म्हणजे नव्या पिढीतल्या गणिकांना. माझं ज्यांनी कौतुक केलं त्या माझ्याचप्रमाणे म्हाताऱ्या झाल्या वेशेत लवकर म्हातारपण येते. इथे मी सुखात आहे. पत्नीने धान्य पेरले आहे. पर्णकुटीकडील अरण्यात हवी तेवढी फळे आणि कंदमुळे आहेत. खरे सांगू ! नव्या पिढीतल्या गणिका वाईट नाहीत. अवंतीचे लोक बिघडले आहेत. धनिक उच्छृंखल झाले आहेत. एखादी सत्त्वशील गणिका लोकांना पटावी म्हणून जिवाचे रान करावे तर, लोक दुसऱ्या मूर्ख उथळ गणिकेच्या मागे धावतात. जिची सेवा देवाघरी रूजू व्हावी ती सत्त्वशील गणिका दारिद्र्यात राहते. तिची दैन्यावस्था मला पाहवत नाही.'

वात्स्यायनाने म्हटले,

'तू नक्की माझ्याबरोबर येणार ?'

'हो.'

'मग वहिनीला नगरला माझ्याकडे धाडून देऊ.'

'ती येणार नाही. ती हट्टी आहे. इथेच या भूमीत पिकेल ते खाऊन मरेपर्यंत इथंच राहायचं तिनं ठरवलं आहे. शिवाय तिच्या संगतीला वेशेतली एक म्हातारी दासी मी आणली आहे. दोघी राहतील.'

'ठीक. मग दोन घटिकांनी निघू.'

'दोन घटिकांनी ? तुला सासुरवाडी जायचं आहे विसरलास.'

'त्यासाठी घटिका पुरे.'

'तयारीला वेळ लागेल.'

'सगळी तयारी केलेली आहे. दोन घोडी, शिधा, वस्त्रे सर्व घेऊन आलाय.'

जरा स्तब्ध राहून महेश्वरदत्त म्हणाला,

'इतकी घाई करू नको. उद्या सकाळी निघू. तू रात्री सासुरवाडीत रहा. त्यांचे सांत्वन कर. त्यांना बरं वाटेल. उद्या सकाळी निघू. तुझी घोडी वगैरे इथे राहू दे सारं.'

एवढे बोलून, हा शेवटचा निर्णय असे धरून महेश्वरदत्त झोपडीकडे तोंड करून म्हणाला,

'मल्लनाग आलाय. पेये आणि फळे येऊ द्या.'

फलाहारानंतर महेश्वरदत्ताकडेच घोडी आणि इतर साहित्य ठेवून वात्स्यायन सासुरवाडीस निघाला. संध्याकाळचा वारा सुटून क्षिप्रेवर लाटा लहरत होत्या. त्या चंचल प्रवाहाकडे पाहता पाहता वासंतिकेच्या मातापित्यांचे मृत्यूस आपण कारण झालो हे मनात येऊन वात्स्यायन विषण्ण झाला. आणि अंगरिक्षाची मातापिता ! त्या दोन जोडप्यांच्या दुःखापुढे आपला त्यांच्याकडे जाण्याचा संकोच किंवा भय दोन्ही क्षुद्र होते. आपण भीती टाकून सासुरवाडीस, पाटलीपुत्राहून येताच जायला हवे होते.

'रात्री तिथेच रहा.' महेश्वरदत्त म्हणाला. तो अन्य कारणासाठी म्हणाला हे नक्की. कदाचित तो आपला भास असेल. महेश्वरदत्त बदललाय. त्याचे पत्नीकडे लक्ष जाऊ लागले आहे असे वाटतेय. पूर्वीही लक्ष असेल. त्यांना अपत्य नाही म्हणून तो वेसेत रमू लागला असेल. वेसेत तो रमला हे खरेच. तरीही पत्नीवर प्रेम असल्यास प्रत्यवाय नाही. तसे असेल तर आपली आजची निघायची घाई अयोग्य होती. प्रवासाची तयारी करायची आहे तो म्हणाला. ते खरे. आपण करून आणली त्याहून प्रवासाची आणखी एक तयारी असते. ती तितकीच महत्त्वाची. महेश्वरदत्ताने ते जाणूनच आपणास सासुरवाडीस रात्र काढण्यास सांगून एक रात्र मागून घेतली. मित्रा ! आज रात्री तुला पत्नीच्या सहवासात पूर्ण आनंद मिळो. प्रवासात त्या रात्रीच्या स्मृतींचा किती उपयोग असतो हे मी जाणतो. ◻

## दैव काढायला निघालेला प्रेमी

दुसऱ्या दिवशी प्रातःकाळी वात्स्यायन महेश्वरदत्ताकडे आला आणि सूर्योदयाबरोबर दोघांनी अवंती सोडली.

प्रवासाचे त्यांचे पहिले टप्पे द्रुतगतीने झाले. पण विंध्यपर्वताशी आल्यावर, चढउतारामुळे आणि डोंगरात सूर्योदय उशीरा व सूर्यास्त लौकर होत असल्यामुळे, गती मंदावली. तोपर्यंतच्या प्रवासात अशा प्रवासातील नित्यानुभवाचा शीण येण्याशिवाय दुसरा कसला त्रास झाला नाही.

पावसाळा संपला होता. वृक्षराजी टवटवीत होत्या. आकाशानेसुद्धा हिरवट वाटावा इतका गर्द रंग धारण केला होता. शेतांमधून पिके उभी होती. फुलपाखरे आणि चतुर यांचे राज्य सुरू झाले होते. नाना तऱ्हेच्या पक्षांचे थवे एका शेताकडून दुसऱ्या शेताकडे उडत होते त्यामुळे नाना रंगांचे ढगच आकाशातून जात असल्याचा भास होत होता. डोंगरातून जाताना तेथील लहान मोठ्या प्रपातांचे तुषार अंगावर उडून अंग पुलकित करीत होते. पक्षांच्या मंजुळ स्वरांनी वातावरण भरून जात होते. दोघा प्रवाशांच्या वृत्ती उल्हसित होत्या.

पोपटांचा थवा वरून गेला की लहान मुलासारखा महेश्वरदत्त आनंदित होऊन हात वर करून ओरडत होता–' मल्लनाग ! पहा पहा ! सृष्टीचा हा हिरवा शालू पहा. एखाद्या सुंदर गणिकेला हा दिला तर ती जन्माची तुमची होईल. अवंतीत इतकी वर्षे राहून आपण आयुष्य व्यर्थ घालविले. पृथ्वीवर अवती सर्वांत सुंदर असेल. पण तिच्या मधून जाणारे हे राजपथ तेवढच सुंदर आहेत. हा फुलपाखरांचा आणि चतुरांचा रंगीबेरंगी समुदाय उद्यानयात्रेला निघालेल्या नागरिकांसारखा वाटतो. अरे अरसिका ! तुझे हृदय कसे उचंबळून येत नाही ? वात्स्यायना ! तुझ्या भावी ग्रंथाबद्दल मी साशंक होऊ लागलो आहे. तो ग्रंथ तू कोरडा करणार.'

वात्स्यायन मोठ्याने हसून म्हणाला,

'बाबा ! जो ग्रंथ होणार नाही त्याची चिंता कशाला ? शिवाय ध्यानात ठेव. कवितेत काव्य असावे, चित्रांत चित्र असावे, तसे शास्त्रीय ग्रंथात शास्त्रच असावे. नाहीतर ज्ञाते त्याचा कंटाळा करतात. उद्यान कसे असावे, घर कसे ठेवावे, प्रसाधना कशी असावी हे शास्त्र विस्तृतपणे सांगेल. पण तसे केल्यावर आनंद कसा मनात आणावा हे शास्त्राला सांगता येणार नाही. तो ज्याच्या त्याच्या मनाचा भाव आहे. प्रत्येकाचे आनंदाचे विषय आणि आनंदाच्या कक्षा निराळ्या असतात. आयुष्य नगरीत काढल्यानं आपल्याला हा निसर्ग उल्हसित करतो आहे. पण मार्गात आपल्याला जो शेतकरी दिसला त्याला इथे आनंद वाटणार नाही. अवंती त्याला हर्षित करील.' महेश्वरदत्त म्हणाला,–

'सौंदर्यास्वाद शिकवता येत नाही असं तुला वाटतं का ? अरे ! लहान गावातून आलेली गणिका प्रथम अज्ञ असते. मग एका वर्षात ती सौंदर्य वाढविणाऱ्या सर्व वस्तूंचा उपयोग शिकते. कानात फूल कसे ठेवावे आणि कोणती केशभूषा आपल्याला सुंदर दिसेल, कपाळावर, गालांवर आणि हनुवटीवर सौंदर्य वाढेल अशी रांगोळी कशी काढावी हे तिला कळू लागते.'

पहिले काही दिवस अशी निसर्गशोभा पाहत, वाद घेत आणि चर्चा करीत दोघांचा प्रवास झाला. लांबच्या प्रवासात नेहमी होते तसे त्यांचे झाले. पुढे जसजसा प्रवासाचा शीण वाढू लागला तसतसे निसर्गाचे कौतुक मनातून जाऊ लागले आणि वाद आणि चर्चाही मंदावल्या. आता केवळ मार्गाकडे लक्ष राहू लागले. टेकड्या निर्जन होत्या. योजनांवर योजने चालूनही कित्येक दिवस माणसाचे दर्शन नव्हते.

त्यामुळेच एके दिवशी समोरच्या टेकडीवरून एक प्रवासी उतरताना दिसला तेव्हा दोघांना साश्चर्य आनंद झाला. त्यांना पाहताच तो प्रवासी धावत टेकडी उतरू लागला. वात्स्यायन आणि महेश्वरदत्त घोड्यावरून उतरले आणि तो जवळ येण्याची वाट पाहत उभे राहिले.

प्रवासी जवळ जवळ येऊ लागला तसतसे त्यांच्या लक्षात आले की, तो उच्च कुळातला आहे. त्याचा फेटा आणि कमरेभोवती बांधलेले वस्त्र जरीचे होते. मग तो वयाने कोवळा आहे हेही दिसले तेव्हा त्यांना अधिकच आश्चर्य वाटले. याचे वय अंगरिक्षाएवढेच असावे–वात्स्यायनाच्या मनात आले. अंगरिक्षाची स्मृती तीव्र करण्यासाठी दैवाने याला धाडला असावा. महेश्वरदत्तचार पावले पुढे जाऊन उभा राहिला. शेवटचे काही अंतर युवकाने धावण्याचा वेग आणखी वाढवला आणि त्या वेगातच महेश्वरदत्ताशी येऊन त्याच्या गळ्याला मिठी मारत युवक म्हणाला,

'महाराज ! तुम्ही कुणी असा, यक्ष असा, राक्षस असा, विद्याधर असा तुम्ही मनुष्याच्या रूपात आहात याचा मला हर्ष होतोय. कित्येक योजने या टेकड्यांच्या अरण्यात मला मनुष्यदर्शन नाही. या कांतारात मनुष्याशिवाय सारे प्राणी मी पाहिले आणि वाटू लागले पृथ्वीवर मी एकटाच उरलो आहे. महाराज ! या खड्गाने तुम्ही मला मारले तरी तुमच्या भेटीच्या या क्षणासाठी मी आनंदानं मरेन.'

असे अनेक तऱ्हेने बडबडून तो हुंदके देऊन रडू लागला. मग महेश्वरदत्ताभोवतालचे हात काढून तो त्याच्या पायाशी लागला. महेश्वरदत्ताने त्याला वर उचलून छातीशी धरले व त्याच्या पाठीवरून हात फिरवीत, सांत्वनाचे शब्द बोलत त्याला शांत केले. महेश्वरदत्त म्हणाला,

'युवका ! निर्भय हो ! आम्ही दोघे यक्ष, किन्नर वगैरे नसून, मनुष्यच आहोत. आम्हीही तुझ्याप्रमाणेच प्रवासास निघालो आहोत. सायंकाळ उतरत असलेली पाहून आम्ही रात्रीच्या विसाव्यासाठी जागा शोधीत असता तू दिसलास. आता ही रात्र आमच्याबरोबर राहून भोजन कर आणि निश्चितपणे विश्रांती घे.'

मग तेथेच त्यांनी रात्रीच्या विसाव्यासाठी जागा निवडली. घोड्यावरचे सामान उतरवले. वात्स्यायनाने घोड्यांना लांब दोर लावून हिरवळ पाहून दोरांची टोके झाडाच्या बुंध्यांना बांधली व चरावयास सोडले. महेश्वरदत्त पाण्यासाठी निर्झर शोधण्यास गेला आणि युवक स्वयंपाकासाठी अग्नी पेटविण्यास काटक्या गोळा करू लागला. वात्स्यायन विसाव्याची जागा फांदीने स्वच्छ करीत असता महेश्वरदत्ताने चुलीसाठी तीन दगड आणले. मग शुष्कपर्णांची रास करून चकमकीने ठिणगी पाडून तो पाने पेटवू लागला. युवक आश्चर्यानं ती कृती पाहत उभा असता महेश्वरदत्ताने विचारले,

'बाळ ! इतक्या आश्चर्याने का पाहतो आहेस ?'

युवक म्हणाला, 'महाराज ! माझी नगरी सोडल्या दिवसापासून मी अग्नी पाहिला नाही. मला अग्नी तयार करता येत नसल्याने मी रात्री थंडीत कुडकुडत झाडावर बसून काढल्या.'

महेश्वरदत्त म्हणाला,

'ये. तुला चकमकीने अग्नी कसा पेटवावा ते शिकवतो.'

एकीकडे वात्स्यायनाने गाठोड्यातून स्वयंपाकाची साधने काढली आणि पीठ वगैरे पदार्थ काढून दिले. थोड्याच वेळात महेश्वरदत्ताने भाकऱ्या भाजल्या आणि सर्व भोजन करून घेऊन आवराआवरी करून झाडांच्या पानांवर घातलेल्या शैय्यावर आडवे झाले. मग महेश्वरदत्ताने युवकाला विचारले,

'तू कोण कुठला आणि कुठे निघाला आहेस ?'

युवक म्हणाला,

'महाराज ! मी महाराष्ट्रातील एका देशाचा राजपुत्र आहे. माझ्या सापत्नमातेने मला अवमानाने वागवल्यामुळे मी माझा देश सोडून अवंतीला दैव काढण्यास निघालो आहे. माझे नाव नंदक आहे.'

मग आपल्या वयानुरूप भाबडेपणानं तो आपण अवंतीला जाऊन कशी तलवार गाजवू व हळूहळू सेनापतीपद कसे प्राप्त करून घेऊ

वगैरे सांगू लागला. वात्स्यायनाला त्याची अतिशय करुणा आली. अंगरिक्षही असंच कुणाला तरी आपले मनोगत भाबडेपणानं सांगत असेल. ऐकणारा जर सहृदय असला तर ठीक. नाहीतर भाबडेपणाचा फायदा घेऊन अंगरिक्षाला आणखी संकटात न आणो म्हणजे मिळवली.

प्रवासात ठरवलेल्या पद्धतीप्रमाणे महेश्वरदत्ताने मध्यरात्रीपर्यंत जागे राहून दक्षता ठेवली होती. मध्यरात्री त्याने वात्स्यायनास जागे केले व आपण झोपला. वात्स्यायन शेकोटीशेजारी बसून काटक्या टाकीत अग्नी प्रज्वलित करू लागला. गुडघे छातीशी घेऊन झोपलेल्या युवकाकडे त्याने पाहिले. निश्चित झाल्याने आता तो बालकासारखा झोपला आहे. या वेळी तो जागा नाही हे किती बरे आहे ! शेकोटीचा प्रकाश सोडला तर सारे अरण्य अंधारात आहे. चहूबाजूनं वन्यपशूंचे अक्राळविक्राळ भेसूर सूर येत आहेत. मधूनच धपकन पडणारी वाळकी फांदी दचकवीत आहे. शेकोटीच्या हलत्या तांबड्या अर्धप्रकाशात वाटेल ते भास होऊ लागले आहेत. अग्नीजवळ वन्यपशू येत नाहीत हे ठाऊक असल्यानंच त्या भासांचे रूपांतर भयात होत नाही.

उठून शेकोटी भोवताली एक फेरी घेऊन वात्स्यायन छातीवर हात बांधून युवकाकडे पाहत उभा राहिला. वेडा ! तू घर का सोडलेस ठाऊक नाही. तू सांगितलेले कारण खरे असेलही. पळून आला नसतास तर या वेळी तू तुझ्या राजवाड्यात उबदार पांघरुणात असतास. वात्स्यायन असा पाहत उभा असता युवकाने छातीशी नेलेले पाय लांब करून कण्हत कुशी बदलली आणि चुळबुळ सुरू केली. टेकड्यांमधील चढउतारांनी त्याचे पाय ठणकू लागले असावेत थंडीही वाजत असावी. वात्स्यायनाने शेकोटीशी जाऊन पाचोळा नि काटक्या शेकोटीत टाकल्या आणि धूर वाढताच बाजूच्या शिळेवर जाऊन बसला नाही तोच युवक झोपेतच उठून बसला आणि शेगोटीमधून वर जाणाऱ्या धुराकडे दोन्ही हात करून म्हणाला,

'कलावती ! तू इथे कशी आलीस ? हे भीषण अरण्य तुझ्यासाठी नव्हे. माझ्या सापत्नमातेने तुला कसे येऊ दिले ? की माझ्याशिवाय न राहवून तू तिला चुकवून आलीस ? ये ! ये—'

मग झोपेतच तो उठला आणि हात पुढे धरून शेगोटीच्या अग्नीकडे जाऊ लागला. तो इतक्या झटकन अग्नीकडे गेला की, निखाऱ्यावर त्याचे पाऊल पडू नये म्हणून वात्स्यायनाला उडी घेऊन मिठी मारून त्याला मागे ओढावे लागले. ओढल्याने खडबडून जागा होत

'मी कुठे आहे ? मी कुठे आहे ? माझी कलावती कुठे आहे ?' तो ओरडला,

वात्स्यायनाने त्याला हळूच खाली बसवले. खाली बसताच गुढघ्यात डोके घालून तो हुंदके देऊन रडू लागला. रडता रडता तो म्हणाला,

'कलावतीचे काय झाले असेल, याची मला चिंता वाटते. माझ्या सापत्नमातेने मी निघून गेलेला पाहून तिला तळघरात टाकली असेल. दुष्टे ! दुष्टे ! तू नरकात जाशील. कलावती दासी आहे—मी राजपुत्र आहे. पण म्हणून काय बिघडलं ? ती आणि मी बालपणापासून एकत्र खेळलो. ती राजकन्येहून सुंदर आहे. केवळ तिच्यामुळेच सापत्नपणाचे दुःख मला सहन करता आले. माझे मन तिच्यावर जडले, तिचे माझ्यावर. तिच्याच संमतीने परदेशांत जाऊन, दैव अनुकूल करून घेऊन, परत येऊन, तिला वरावे या निश्चयाने मी राजवाडा सोडला. मी येईपर्यंत ती कुणाला वरणार नाही अशी शपथ तिने दिली आहे. तशी वेळ आलीच तर, एक धारदार शस्त्र तिच्याजवळ देऊन ठेवले आहे.'

तो पुन्हा रडू लागल्यावर वात्स्यायनाने महेश्वरदत्तास हाक मारली,

'महेश्वरदत्ता !'

महेश्वरदत्त म्हणाला,

'मी जागा आहे. ऐकतो आहे.'

मग तो उठून युवकाजवळ आला. त्याचे डोके मांडीवर घेऊन त्याचे सांत्वन करीत म्हणाला,

'बाळ ! तू आमच्या संगतीने चल. कारण पुढे दुस्तर अरण्य आहे. तुझ्याजवळ वस्त्रे नाहीत, घोडा नाही, अन्न नाही. तू एकट्याने प्रवास करणे म्हणजे आत्महत्या आहे. वनपशू तुला खातील किंवा भिल्ल तुला पकडून नेऊन बळी देतील. तू परत आपल्या नगरीस जा. अवंतीस जाऊन दैव काढणे महाकठीण कर्म आहे. तोपर्यंत अनेक वर्षे जातील. कलावती कंटाळून दुसऱ्याशी विवाह करील.'

युवक आवेशाने उठून खड्ग उगारीत म्हणाला,

'तसे झाले तर मी माझे शरीर कापून ठेवीन.'

त्याच्या हातातले खड्ग काढून घेऊन महेश्वरदत्ताने त्याला पुन्हा अनेक परीने समजावले. तेव्हा युवक म्हणाला,

'मी परत गलो तर, माझी छीः थू होईल. कलावती माझं तोंड पाहणार नाही. आता काही होवो, मी अवंतीस जाऊन दैव काढणार.'

त्याला गोंजारीत महेश्वरदत्ताने कसातरी शांत करून निद्राधीन केला. तो झोपी गेल्यावर महेश्वरदत्त म्हणाला,

'मल्लनाग ! या युवकाचा मला हेवा वाटतो. आपल्या आयुष्यात आपण आता असे प्रेम कधी पाहणार नाही. त्याला प्रियेचा भास झाला, तसा आपणास आता कधी होईल का ? या अरण्यात, कष्टप्रद स्थितीत आपल्याला पत्नीचे स्वप्न पडले तर कसे पडेल पाहा. धूसर देवतेसारखी आपली पत्नी आपणास दिसणार नाही. ती शरीरसंबंधात दिसेल. वात्स्यायन ! काही वेळा मला स्त्री-पुरुष संबंधाचा अतिशय संताप येतो. त्यासंबंधी सांगणाऱ्याचा आणि ग्रंथकारांचा. तुझ्या त्या बाभ्रव्याला काही कळत नाही. चुंबने, आलिंगने यांची मालिका तो वाचतो. त्याचे संभोगासनांचे सांप्रायोगिक अधिकरण तर उगीच गवगवा करून नावाजले आहे. एकदा स्त्री-पुरुषांना परस्परांचे शरीर कळले की काय उरते ? प्रथम परस्परांच्या प्रतिमा पाहत, मग परस्परांची स्वप्ने पाहत, मग परस्परांचे दुरून दर्शन घेत, परस्परांविषयीच्या गोष्टी ऐकत नायक-नायिकेचा जन्म जावा. त्यासारखे सुख नाही. नायक-नायिकांचा एकदा शरीरसंबंध झाला की, हे स्वप्न भंग पावते आणि त्यासारखे दुःखद काही नाही.'

वात्स्यायन हसला आणि म्हणाला,

'अरे स्वप्नाळू मनुष्या ! प्रतिमादर्शन, दुरून दर्शन, स्वप्ने वगैरे सर्व शरीरसंबंधाची पूर्वसिद्धता असते हे मी तुला सांगावयास हवे ? तू जेव्हा एखाद्या पुरुषाला एखाद्या गणिकेचे वर्णन करून सांगतोस तेव्हा तू त्या पुरुषाच्या मनाची मीलनासाठी सिद्धता करीत असतोस.

ही पूर्वसिद्धता जितकी योग्य होईल तेवढा पुढे शरीरसंबंधातला दोघांचा आनंद वाढतो. ही पूर्वसिद्धता अपुरी, अपरिपक्व झाली की, शरीरसंबंधही दुःखाचे होतात.'

महेश्वरदत्त म्हणाला,

'असेल! पण मल्लनाग! मला कोणतीही स्त्री त्या युवकाला दिसली तशी दिसू दे. मी पृथ्वीचे मोल देईन. त्याच्या जीवाला भीती नसती, तर मी त्याला पुढे जायला सांगितले असते. त्याचे स्वप्नसुख मी मोडले नसते.'

त्यानंतर महेश्वरदत्त स्वतःशीच तळमळत पडून राहिला. वात्स्यायनाने पहाटेपर्यंत आपला जागर चालू ठेवला. पहिला पक्षी ओरडताच तोही आपल्या अंथरुणावर येऊन पडला. डोके टेकताक्षणीच त्याला झोप लागली.

सकाळी महेश्वरदत्ताने त्याला घाबऱ्या घाबऱ्या उठवले, तेव्हा तो गडबडून जागा झाला. महेश्वरदत्त म्हणाला,

'युवक गेला.'

वात्स्यायनाने झटकन उठून युवक झोपला होता त्या जागेकडे पाहिले. पानांवर त्याच्या दुमडलेल्या शरीराचा पुसट ठसा भासत होता. उठून दोघांनी त्याच्या पावलांचे ठसे पाहिले. अवंतीच्या दिशेने पावले गेली होती. महेश्वरदत्त म्हणाला,

'मी माझा घोडा तयार करतो. तू सर्व साहित्य आवरून माझी वाट पाहत उभा राहा. मला उशीर झाला तर माध्यान्हीचे भोजन इथेच घेऊ.'

घोडा तयार झाल्यावर त्यावर आरूढ होत महेश्वरदत्त म्हणाला,

'खरे म्हणजे स्वप्नामागे गेलेल्याचे स्वप्न भंग करू नये. पण त्याचे ते कोवळेपण माझ्या डोळ्यांपुढून जात नाही. वेसेत एखाद्या गणिकेचा दास म्हणून त्याचा शेवट होईल. ती कल्पना सहन होत नाही.'

महेश्वरदत्त निघून गेल्यावर प्रवासातील साहित्याची आवराआवर करून वात्स्यायन मित्राची प्रतिक्षा करीत बसला. प्रवासाहून हा शीण अधिक आहे असे त्याला दोन घटिकानंतरच वाटू लागले. त्याला वाटू लागले या युवकासारखीच अंगरिक्ष वासंतिका समोरून येताना दिसावी आणि प्रवासाची समाप्ती व्हावी. गम्मत आहे! दोन युवक सतप्त होतात. पण एक अवंतीकडे जातो. दुसरा अवंती सोडतो. एकाला अवंतीत सुख मिळवायचे आहे. दुसरा अवंतीबाहेर सुख शोधतो आहे. आपण आणि महेश्वरदत्त अधेमधे कुठेकरी राहून स्वप्ने शोधणारांचा शोध घेत आहोत!

कशासाठी? महेश्वरदत्ताला युवक संकटात उडी घेतोय असं वाटतंय. आपल्यालाही अंगरिक्षाबद्दल तेच वाटतंय. त्यांना वाचवण्यास आमची धडपड आहे. तीत यश लाभो! पण ही स्वप्ने कशासाठी? हा पाठलाग कशासाठी? वासंतिकेच्या घरचे ते सुंदर उद्यान कशासाठी? उद्यानयात्रा कशासाठी? आणि त्या सेनापतीचे पराक्रम कशासाठी? चौसष्ट कला कशासाठी, कामतृप्तीसाठी? आणि कामतृप्ती करणारा संभोग कशासाठी? वंशवृद्धीसाठी?

असेल. तसेही असेल. कामशास्त्रात हा विचार येत नाही. तो धर्मशास्त्राच्या कक्षेत येतो. त्या विचारासाठी धर्मशास्त्र वाचावे.

माध्यान्हीला वात्स्यायन उठला आणि स्वयंपाकाला लागला. दोघांसाठी अन्न शिजवले. मग त्याने जेऊन घेतले. महेश्वरदत्त दुपारनंतर परतला. तो एकटाच परतला होता आणि विलक्षण थकला होता. अन्न घेईपर्यंत तो काही बोलला नाही. मग विश्रांतिपूर्वी तो म्हणाला,

'मल्लनाग! युवकाने मला हुकविले. माझ्या घोड्याच्या टापा ऐकताच तो शिळेआड किंवा वृक्षाआड लपला असावा. मला कुठेही तो दिसला नाही. माझ्या मनातून तो कधी जाणार नाही.'

त्या रात्री त्यांनी त्याच अरण्यात निवास केला. दुसऱ्या दिवशी त्यांच्या पुढच्या प्रवासास आरंभ झाला. ◻

## कथ्थक

प्रदेश वत्सगुल्मांचा होता.

वत्सगुल्मांच्या देशात शिरताना वात्स्यायनाचा घोडा तापी नदीला अर्पण होणार होता. त्यांचा मार्ग नदीतून पुढे जात होता. दोन्ही काठांना विलक्षण उतार असलेल्या तीरावरून पात्रात उतरताना हा अपघात होत होता. प्रवाह गळ्यापर्यंत व वेगाचा होता. घोड्याचा पाय निसटला होता. घोड्याचा तोल जाताच वात्स्यायन घोड्यावरून पडला होता. घोडा उतारावरून घसरत प्रवाहात शिरला तेव्हा प्रसंगावधान राखून वात्स्यायनाने उतारावरून शरीर लोटून घोड्याच्या रश्मि पकडल्या होत्या.

त्या आधी विदर्भ देशातून जात असता, तेथील एक विचित्र रीत कळली होती. असे सांगण्यात आले की, तेथील अधिकाऱ्यांच्या स्त्रिया रात्रीच्या वेळी राजवाड्यात जातात. नंतर वत्सगुल्म नगरीत असताना एका तरुणाला, राजवाड्यातील दासी, स्त्रीवेष देऊन राजवाड्याकडे नेताना त्यांनी पाहिल्या. तो तरुण थरथर कापत होता आणि त्या दासी त्याला पुढे पुढे ढकलीत हसत होत्या. त्या देशातून प्रवास करताना ऐकलेल्या या दोन गोष्टीच त्याच्या लक्षात राहिल्या होत्या. आणि विदर्भातील सुंदर स्त्रियांना पंधरा दिवस राजवाड्यात जाऊन रहावे लागते. तिसरी आपल्याला किती विचित्र वाटत असली तरी त्या त्या देशातील लोकांना त्या त्या रीती मानवतात असे म्हटले पाहिजे किंवा ते हतबल असतात.

वत्सगुल्म सोडल्यावर महेश्वरदत्ताने प्रवासाचा मार्ग आखला होता. विदर्भातून, महाराष्ट्राच्या उत्तर भागातून अजिठ्यावरून जाऊन आंध्र गाठावा व तेथून कलिंगातून जावे. पुढे मार्गातील महाकांतार टाळून महाकोसलातून वर परार्जुन करून परत मालव गाठावा असे त्याने ठरवले. पाटलीपुत्रातून दक्षिणेकडे उतरलेले अंगरिक्ष आणि वासंतिका, आंध्र किंवा कलिंग देशात कुठेतरी भेटावीत हा त्यांचा होरा होता.

युवक गेल्यापासून महेश्वरदत्त उदास वाटत होता. त्याचे बोलणे कमी कमी झाले होते. युवकाचे कारण नसलेही, कदाचित त्याला पत्नीची आठवण येत असेल–वात्स्यायनास वाटले. किंवा वेस आठवून तो उदास असेल, खरे म्हणजे त्याने उदास असावे हे एक आश्चर्य होते.

त्यांचा प्रवास नाना अरण्यातून चालला होता. मधनच एखादी

वस्ती लागे. वस्तीच्या बाहेर लोहार झाडे जाळून कोळसे करताना दिसत. रात्री त्या भट्टयांचा लाल प्रकाश चोहीकडे पसरून त्याची सोबत वाटे. मार्गात जागजागी निर्झर अडवून पाणपोया केलेल्या होत्या. कधी अरण्य निर्मनुष्य वाटावे तर अवचित शिकारी भेटत. त्यांच्या पाठीवर बहुधा जाळ्यात सापडलेल्या चिमण्यांचा थवा असे. अधूनमधून कुस गवताची माळराने लागत. आणि रंगीत वस्त्रे नेसलेल्या गावढळ स्त्रिया, रानात वेचलेल्या फळांच्या टोपल्या डोक्यावर घेऊन, खेड्यांकडे गाणी गात जाताना दिसत. अवंती भोवतालच्या सपाट प्रदेशातील देखाव्याहून हे देखावे अधिक चित्रमय वाटत. पण या देखाव्यांनीही महेश्वरदत्ताला बोलके केले नाही.

ते आता अजिठ्याजवळ आले होते. हे त्यांना अजिठ्याकडे निघालेल्या एका प्रवाशाने सांगितले. हा प्रवासी वत्सगुल्माचा रहिवासी होता. मध्यम वयाचा गोष्टी सांगून जनाची करमणूक करणे हा त्याचा व्यवसाय होता. बोलण्याचा व्यवसाय असूनही इतरवेळी त्याला बोलण्याचा कंटाळा दिसला नाही. परिचय होताच तो म्हणाला,

'महाराज ! अजिठा दूर नाही. आता ते खेडे राहिले नाही. गेले काही वर्षे ते मोठे ग्राम झाले आहे. तेथील लेणी खोदण्याचे काम मध्यंतरी थांबले होते. आता काही धनिकांनी द्रव्य दिल्याने पुन्हा खोदण्यास आरंभ झाला आहे. असे ऐकतो की, लेण्यात प्रत्यक्ष कैलास उभा करणार आहेत. कुणी म्हणतात की, कुणा राजाने आपल्या प्रियतम राणीसाठी ही लेणी करावयास सांगितली आहेत. 'काही असो. आज तेथे शेकडो कारागीर आणि हजारो श्रमिक खोदण्याचे काम करीत आहेत. भारतवर्षातील नाना जातीवंशाचे लोक तेथे दिसतील.'

गोष्टी सांगून लोकांचे रंजन करणारा हा कथ्थक लहानसा पण बळकट तट्टावर बसला होता. त्याने तट्टाला कधी घाई केली नाही. दोन्ही बाजूला सोडलेल्या पिशव्यांतून वस्त्रे, अन्नधान्य, भांडीकुंडी भरलेली होती. मुक्कामाला पोहचण्याचीही त्याने कधी घाई दाखवली नाही. उंचीने तो कमी होता. डोळे काळे, हसरे होते. सतत घोड्यावर बसण्यानं त्याच्या पायाच्या शिरा फुगलेल्या होत्या. सतत घोड्यावर बसणाऱ्यांच्या मांड्या फाकलेल्या राहतात. तशाच याच्याही राहत असाव्या. तो पुढे म्हणाला,

'कारागीर आणि श्रमिक आपल्या बायकोमुलांसह तेथे राहतात. मी त्यांचे श्रम हरण करण्यासाठी कथा सांगतो. कुणी मला द्रव्य देतं, कुणी धान्य देतं, कुणी वस्त्र देतं. मी कथा सांगताना तुम्ही ऐकाच. सात पिढ्या आमच्या वंशात हा व्यवसाय आहे. आमचा पूर्वज प्रख्यात कथ्थक गुणाढ्य याचा शिष्य होता. आज पुष्कळ कथ्थक तुम्हाला स्वतःच्या पूर्वजाबद्दल हेच सांगतील. पण ते असत्य माना. कारण मी ते सिद्ध करतो. आमच्या घराण्यात देवघरात एक भूर्जपत्र आहे. ते गुणाढ्याच्या मूळ ग्रंथातले अवशेष पान आहे. गुणाढ्याचा ग्रंथ पैशाची भाषेत आहे म्हणून राजा सातवाहनाने जेव्हा गुणाढ्याचा अपमान केला तेव्हा डोंगरावर जाऊन गुणाढ्याने आपल्या ग्रंथाचे एकेक पान वाऱ्यावर सोडले. ते पाहून पशू पक्षी रडले. माझा पूर्वज तेव्हा गुणाढ्याच्या जवळ होता व गुरूच्या हाती ग्रंथाचे एक एक पर्ण देत होता. त्यावेळी त्याने एक पर्ण वस्त्रांत लपवून घरी आणले. आणि देवघरात ठेवले त्याची आजही आम्ही पूजा करतो. अहो ! मी कथा सांगू लागलो की, सभा निःशब्द होते आणि कथाभागातील रसाप्रमाणे स्त्री पुरुष हसतात, रडतात. वत्सगुल्मात माझ्यासारखा कथ्थक नाही असेच लोक सांगताना ऐकाल. नायक नायिकांची दुःखे सांगतांना मीही रडतो.'

कथ्थकाची आत्मकथा सुरू असता महेश्वरदत्त एकही शब्द बोलला नाही. अजिठा येण्याआधीच्या रात्रीच्या विसाव्यात वात्स्यायनाने त्याला विचारले,

'महेश्वरदत्त ! तुझी प्रकृती ठीक नाही काय ?

महेश्वरदत्त म्हणाला,

'मित्रा ! माझ्या डोळ्यापुढून तो युवक जात नाही. आपण त्याला अरण्यातील व्याघ्रसिंहाच्या तोंडी दिले. आणि जर तो अवंतीत जीवंत पोहोचलाच तर तेथील नरपशूंच्या तोंडी दिले असे होईल.'

वात्स्यायन म्हणाला,

'तू व्यर्थ मनाला क्लेष करून घेतो आहेस. युवक स्वेच्छेने गेला.'

महेश्वरदत्त म्हणाला,

'आपण त्याला वृक्षाला बांधून ठेवायला हवे होते. मल्लनाग ! अरे ! जेव्हा मी त्याला जवळ घेऊन कुरवाळले, त्याचे डोके मांडीवर घेतले, त्याच्या केसांचा स्पर्श माझ्या गालाला झाला तेव्हा मला वाटले. मला पुत्र असता तर त्याला मी असेच आलिंगन दिले असते. तो असा गेल्यानं माझाच पुत्र मी काळाच्या जबड्यात दिला असं वाटताय.'

स्वतःला अपत्य नसल्याचे महेश्वरदत्ताचे दुःख ओळखून वात्स्यायन म्हणाला,

'मित्रा ! तुम्हाला अजूनही अपत्य होईल.'

महेश्वरदत्त निराशेत म्हणाला,

'कुणास ठाऊक ? वेसेत काही गणिका, वेश्या किंवा दासीही भ्रूणहत्या करीत. काहीजणी अपत्यांना दूरदेशी पाठवीत. वेशेत अपत्याची अडचणच वाटे सर्वांना. मी कधीही भ्रूणहत्त्येस साहाय्य केले नाही. पण ज्या क्षणाला त्या युवकाचे गाल माझ्या गालाला


पॅपिलॉन
पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

लागले त्या क्षणाला त्या सर्व भृणहत्त्या आणि अपत्य त्याग मीच केले असे मला वाटू लागले. स्त्रीपुरुष संबंधाचा अपत्य हाच तेवढा शेवट राहतो. मल्लनाग! मी शपथेवर सांगतो, मी वेशमधील एकाही स्त्रीशी संग केलेला नाही. मी मद्य प्यालो, जुगार खेळलो संपत्ती घालविली. माझ्या पत्नीला त्याचे इतके दुःख होते की, मी जवळ जाताच ती थंड होई. आम्हाला त्यामुळेच अपत्य झाले नसावे. मी वेशमध्ये स्वतःला इतके रमवून घेतले की आमची अपत्यहीनता मला कधी बोचली नाही. या युवकामुळे त्याची जाणीव होऊन दुःख झाले असले तरी, दुःख कळणं हाही आनंद असतो. वात्स्यायन! तू मला अवंती बाहेर काढलेस, त्यामुळे हा युवक भेटला. त्यामुळे अपत्यहीनतेचे दुःख एकदम कळून मी स्तंभित झालो आहे.' ◻

## अजिंठ्याची लेणी

अजंठा गाव दिसू लागताच कथ्थक म्हणाला,

'मी उतरतो तिथेच तुम्ही दोघे अतिथी व्हा. दोन दिवस विश्रांती घेऊन पुढे जा. दोन दिवस इथे पुष्कळ पहाण्याजोगे आहे.'

महेश्वरदत्त म्हणाला,

'आम्ही वेगवेगळे देश पाहण्यासाठी बाहेर पडलो नाही. वात्स्यायनांचा मेहुणा देश सोडून गेला त्याला शोधण्यासाठी आम्ही प्रवास करीत आहोत.'

महेश्वरदत्ताने वासंतिका आणि अंगरिक्ष यांच्यावरील प्रसंग थोडक्यात सांगितला. तो ऐकता ऐकता गोष्टी सांगणाऱ्या कथ्थकाचे डोळे चकाकू लागले. तो म्हणाला,

'काही कथ्थक म्हणतात, सांप्रत वर्तमानकालात काही घडत नसते म्हणून मागील युगातील गोष्टी सांगाव्या. मी त्यांना नेहमी सांगतो की, सांप्रत कालातही गोष्टी घडत असतात. पूर्वीच्या कालाप्रमाणे आताही प्रेम, प्रेमभंग, संकटे, साहसे, दैवगती आहे. केवळ त्यांचा आवाका येणे कठिण असल्याने कथ्थक इतिहासात शिरत असतात. पहा! तुम्ही सांगितलेल्या प्रसंगावर किती छान कथा होईल—वासंतिका अंगरिक्ष यांची कथा. लोकहो! अवंती नगरीत,'

इतक्यात बोलणे थांबवून त्याने समोर बोट केले. अजिंठ्याच्या टेकड्यांशी ते आले होते. आणि एका टेकडीच्या उतारावरून तेथे काम करणारे स्त्रीपुरुष ओरडा करीत उतरत होते. टेकड्यांच्या तळात त्यांच्या राहण्याच्या झोपड्या पसरल्या होत्या. कथ्थक म्हणाला.

'चला! माझ्या श्रोत्यांची नगरी आली. कामावरून परत येताचा हा ओरडा आहे. ते पहा डोंगराच्या उतारावरून कसा घसरल्यासारखा त्यांचा समुदाय येत आहे. कुणाच्या हातात हातोडे, कुणाच्या हातात कुदळी—पावडी आहेत. कुणी पहारया घेतल्या आहेत. कुणी छिन्यांचे गाठोडे करून खांद्यावर टेकले आहे. धुळीनं आणि दगडामधून उडणाऱ्या भुकटीनं त्यांचे केस, मिशा आणि दाढ्या धुरकटल्या आहेत. काहींच्या पापण्यांवरसुद्धा तुम्हाला धूळ दिसेल. त्यांना दगडावर कोरीव काम करताना तुम्ही पहाच. किती भरभर लयीत हातोडा छीनीच्या डोक्यावर आपटत असतो आणि खडू ओढावा तशी छिनी, पुढेमागे सरकत दगडावर चित्र कोरीत जाते. यांतील एक एक एकेका कामात कुशल आहे. एक पानेफुले खोदील, एक हव्या त्या आकारांत आणि अविर्भावात हत्ती खोदील. एक स्त्रियांचे स्तन आणि नितंब कोरील. पहाता पहाता निर्जिव दगडाला ते सजीव करतात.

'आता ते आपापल्या झोपड्यांत येतील. हातपाय तोंड धुवून वस्त्रे बदलतील. त्यांच्या स्त्रिया भाकऱ्या भाजू लागतील. मग क्षुधा शांत झाल्यावर, श्रांत शरिरांना विसावा देण्यासाठी ते सारवलेल्या अंगणांतून चटयांवर पडतील. मग मी तेथे जाऊन सुखदुःखमिश्रित चरित्र कथा ऐकवीन. त्या ऐकताना त्यांना केवढे बरे वाटेल! अहो! मी सांगतो ती चरित्रे रसिकांस मनोहरच होतात. कारण ती देवांची नसतात किंवा फक्त मानवांचीही नसतात. देव नेहमी सुखी व मानव नेहमी दुःखी असतात. या कारणानं दोघांचीही चरित्रे श्रोत्यांना मनोहर होत नाहीत. कारण देवांचे चरित्र आरंभापासून शेवटपर्यंत आनंदकारकच असते व माणसांचे चरित्र आरंभापासून शेवटापर्यंत दुःखकारक असते. सुखाच्या किंवा दुःखाच्या एकच एक भावाचा लोक कंटाळा करतात. करिता ज्यांत देवाचे दिव्य व माणसाचे मनुष्य असे दोन्ही गुण असतात अशांच्या कथा विशेष आनंदप्रद होतात. म्हणून दिव्यादिव्य जे विद्याधर त्यांची चरित्रे मी अधून मधून सांगतो.

महेश्वरदत्ताने विचारले.

'हे विद्याधर कोण आहेत?'

'ते लोक नाहीत. ते आम्ही कथ्थकांनी निर्माण केले आहेत. ते कल्पित असले तरी सत्य वाटतात. दिव्यादिव्य असे हे विद्याधर अनेक गुप्तविद्या आणि कला यांनी युक्त आहेत. अनेक मनुष्ये विद्याधराच्या पदवीला पोहोचून विद्याधर होतात. काहीना तर विद्याधरपतींचे स्थान प्राप्त होते. अनेक विद्या येत असल्यानं विद्याधरांची दैवाधिनता कमी होते. तसेच त्यांचे शरीर मानवी असल्याकारणानं मनुष्यास भोगावे लागणारे शाप, सुखदुःखही त्यांना भोगावी लागतात. आणि त्यामुळे त्यांची चरित्रे रसिकांना आनंद देतात.'

या वेळेपर्यंत ते झोपड्यांशी येऊन पोहोचले होते आणि डोंगराच्या उतारावरून उतरणारे लेण्यातले काम करणारे लोक गर्दीनं त्यांच्या अंगावरून जाऊ लागले होते. घोडा थांबवून घोड्यावरूनच दोन्ही हात वर करून कथ्थक ओरडला,

'रसिक जनहो! मी तुमचा प्रिय कथ्थक नव्या नव्या कथा घेऊन आलो आहे. या कथांनी राजा महाराजांचे मनरंजन केले आहे. या कथांचे वर्णन कसे करू? यांत कामविव्हल युवती आहेत. दैव काढण्यास निघोलेले साहसी युवक आहेत. चतुर प्रधान आणि बलाढ्य राजे आहेत. मंत्रप्रभावाने नवऱ्यास घोड्याचे रूप देणारी जारिणी आहे, आणि प्रेमासाठी राज्य सोडून अरण्ये ओलांडणाऱ्या दोन जीवांची अंगरिक्ष आणि वासंतिका यांची नवी प्रभावी कथा—'

लोकांनी चालवलेल्या जयजयकारात आणि दाटीवाटीत त्याचे शेवटचे शब्द विरून गेले. वात्स्यायनाला बरे वाटले.

◻

# अपघात

प्रवासाचा शीण असूनही वात्स्यायनने त्या संध्याकाळी विश्रांति घेतली नाही. कथ्थक उतरला होता तिथेच अतिथी म्हणून तो व महेश्वरदत्त उतरले. महेश्वरदत्तावर घोड्यांच्या दाण्यापाण्याची व्यवस्था सोडून वात्स्यायन, लेण्यांसाठी निर्माण झालेल्या त्या अजिंठ्याच्या झोपड्यांसमोरून हिंडू लागला.

या स्त्रीपुरुष समुदायांत अंगरिक्ष वासंतिका असतील असा संभव त्याला वाटत होता. विविध देशांतून आलेल्या या चित्रपूर्ण स्त्री पुरुषांत दोघे नसले तर, त्यांना पाहिलेले कुणीतरी भेटेल अशी त्याची कल्पना होती. आपण पुन्हा 'शोध' करायला प्रत्यक्ष आरंभ केला याचे त्याला बरे वाटले. ओझे कमी झाल्यासारखा तो स्त्रीपुरुष न्याहाळत गवती झोपड्यासमोरून जाऊ लागला. अरण्य साफ करून झालेल्या वर्तुळाकार भागात झोपड्या विखुरल्या होत्या. प्रत्येक झोपडीच्या समोरचे अंगण चापूनचोपून शेणखळा मारून मऊ केलेले होते. एका कोपऱ्यात तीन दगडांच्या चुली होत्या. दुसऱ्या कोपऱ्यात दगडी उखळे होती. लेण्यांच्या कामात दगडांना कमी नव्हते. बहुतेक चुली पेटलेल्या होत्या व त्यावर कुठे खापराच्या भांड्यात अन्न शिजत होते, कुठे चुलीत भाकरी भाजल्या जात होत्या. धूर वर जात होते. मुले खेळत धावत होती. पुरुष चटया टाकून अंगणांत पडले होते. कुणी मद्य किंवा आसवे घेत होते. कुठे भाकऱ्या थापण्याच्या ध्वनीत बांगड्यांचे ध्वनी मिसळत होते. कुठे लहान लहान खडे घेऊन द्यूत खेळणे चालले होते. पाण्याला निघालेल्या स्त्रिया माथ्यावर तीन तीन मृत्तिकापात्रे तोलीत जात येत होत्या.

ठिकठिकाणी अर्धवट कोरलेले तुटके दगड दिसत होते. ते वरून लेण्यांतून आणलेले असावेत. पाटे, वरवंटे, उखळी बनवण्यासाठी. आता वर्षानंतर या वातावरणांत अंगरिक्ष कसा दिसेल? तो कृष्ण झाला असेल. मिशा आल्या असतील. अवंतीतली वस्त्रे जाऊन या पुरुषांसारखी वस्त्रे त्याच्या अंगावर असतील. वासंतिकेच्या स्वरूपांतही अंतर पडले असेल. तिचा वर्षापूर्वीचा अल्लडपणा राहिला नसेल. तिची पूर्वीची सुंदर वस्त्रे जाऊन या स्त्रियांसारखी जाडीभरडी वस्त्रे तिच्या अंगावर असतील. मग एकदम वात्स्यायनाच्या डोक्यांत आले— सारे बदलेल, पण एक बदलणार नाही—त्याचे बासरीवादन. त्याच्या बासरीचे स्वर कुठेही ओळखू. लेण्यातून काम करून थकून आल्यावर आपल्या बासरी वादनाने स्वतःचा व इतरांचा थकवा घालवीत असेल. त्याची ती बासरी ऐकू यावी—ती बासरी ऐकू यावी.

मग त्याचे डोळे वासंतिका आणि अंगरिक्ष यांच्या वयाच्या युवती युवकांना न्याहाळत चालले. ही युवती वासंतिकेसारखी वाटते का, थोडा उंच असता तर हा अंगरिक्ष असता. ही युवती धान्य कुटते आहे छे! वासंतिका इतकी सुदृढ नाही. कुठे तरी अशी विद्या असावी की त्यामुळे दोघे या समाजात आहेत की नाहीत कळावे. कुठे असतील ते कळावे. आणि तिथे मंत्रविद्येने जाता यावे.

अज्ञाताबद्दल अचानक वाटलेल्या या चुटपुटीचे त्याला नवल वाटले. अज्ञाताबद्दल विचार करण्याचा आपला स्वभावच नाही. जे आहे त्यातच ते कसे असावे एवढेच पाहणे आपल्याला जमते. आता वस्तु हरवली आहे. या पृथ्वीतलावर ती कुठेतरी नक्की आहे. सर्व अज्ञात गोष्टी कळेपर्यंत अज्ञात असतात. अज्ञातत्व तात्कालिक असते असे आपल्याला नेहमी वाटत आले आहे. अंगरिक्ष वासंतिका कुठे आहेत हे सांगेल अशी गूढविद्या नाही. विचार हा आपला स्थायिभाव आहे. अजिंठ्यात दोघे सापडली नाहीत तर पुढे जाऊ. ती सापडली नाहीत तर आपली असमर्थता सिद्ध होईल, इतकेच आणि गुप्तविद्येने दोघे कळली तर, ती कथ्थकाची कथा होईल. तसे व्हावे. एकदा तरी आयुष्यात आपल्याला चमत्कार दिसावा.

चालता चालता तो एका प्रशस्त अंगण असलेल्या झोपडीशी आला. एक मध्यम वयाचा पुरुष त्या सारवलेल्या घट्ट गुळगुळीत अंगणावर कावेच्या तुकड्याने भराभर स्त्री पुरुषाच्या आकृती काढीत होता. आकृत्यात एक पुरुष ढोलके वाजवीत होता. एक स्त्री नर्तनाच्या अभिनिवेषात होती. एक स्त्री पाण्याला चालली होती. एक पुरुषाच्या मांडीवर बसली होती व पुरुष तिला आलिंगन देत असता ती ओठवर करून चुंबनाची अपेक्षा करीत होती. प्रत्येक आकृती, रेखीव, बांधीव, जीवंत वाटत होती.

वात्स्यायन निरखून पाहू लागला. यांतली एखादी युवती तो वासंतिकेसारखी काढील. एखादा बासरी वाजविणारा युवक अंगरिक्षासारखा काढील. पाहिलेल्या स्त्रीपुरुषांवरूनच तो ही चित्रे काढीत असेल.

वात्स्यायनाला स्वतःची कीव येऊ लागली. अंगरिक्ष समोरून यावा वासंतिका धान्य कुटताना दिसावी. योगायोगावर आपण फार भिस्त ठेवीत आहोत. हे योग्य नाही. खरे म्हणजे आपण विचारले पाहिजे. अनेकांशी बोलले पाहिजे. आपण स्वतःशीच विचार करीत राहतो. या चित्रकाराशी बोलले पाहिजे. अशा विचारात वात्स्यायन अभिवादन करून चित्रकाराशेजारी बसत म्हणाला,

महाराज! स्त्रीपुरुषांची ही सुंदर चित्रे आपण कशासाठी काढीत आहात?

चित्र काढताकाढताच चित्रकार म्हणाला,

'वर गुंफेत ही दगडावर कोरायची आहेत. इथे ही काढली की तिथे काढताना मन द्विधा होत नाही. हा इथे रूंद खांब आहे. इथे गाईला चारा घालणारी युवती नीट बसेल. ती पलीकडची आनंदोत्सवाची चित्रे भिंतीवर काढावयाची आहेत. इथे मोर कसा वाटेल? इथे या युवतीच्या खांद्यावर पोपट बसवला तर?'

चित्रकार मोर, पोपट आणि युवती काढीत असता वात्स्यायन आश्चर्य करीत पाहत राहिला. अर्थशास्त्र वगैरे ग्रंथ लिहिणाऱ्या पूर्वीच्या ग्रंथकाराबद्दल जी असूया त्याला वाटे तशीच आता वाटू लागली. आपणास तसा ग्रंथ लिहिणे जमणार नाही. तसेच कावेच्या तुकड्यांनी अशी रेखीव चित्रे काढणे जमणार नाही. आणि आपण जो शोध घ्यावयास निघालो आहोत तोही जमणार नाही. तो चित्रकाराला म्हणाला,

'महाराज! आपली चित्रकला पाहून मला हेवा वाटू लागला आहे. मी अवंतीचा नागरिक आहे. त्या नगरीतही अशी कला मी पाहिली नाही. आपल्या चित्रांनी मला अतिशय सुखविले आहे.'

चित्रकार म्हणाला,

'आपण माझ्या चित्रांत घेतलेला रस पाहून मला आनंद होत

आहे. रसिक अल्प असतात.

वात्स्यायन म्हणाला,

'महाराज ! आपल्या कामात मी व्यत्यय आणतो आहे याबद्दल क्षमा करा. मी येथे कशासाठी आलो ते सांगतो. माझा मेहुणा आपल्या पत्नीसह देशांतराला गेला त्याचा शोध मी घेत आहे. मी दोघांचे वर्णन करतो. तसे जोडपे आपण इथे पाहिले असल्यास सांगावे.'

मग वात्स्यायनानं अंगरिक्ष व वासंतिका यांचे जेवढे बारीक वर्णन करता येईल तेवढे केले. आणि म्हणाला,

'मला चित्रकला येत नाही याचे आता मला दुःख होत आहे. येत असती तर दोघांच्या प्रतिमा मी जवळ ठेवल्या असत्या. असो. अशा दोघांना आपण पाहिले आहे काय ?'

चित्रकार म्हणाला,

'नाही. असे जोडपे या लोकांत नाही. मला येथील सर्व स्त्रीपुरुष पाठ आहेत. यांच्यामधूनच मी माझ्या कोरावयाच्या आकृती काढतो. कित्येकदा मी एखादी युवती अगर युवक इथे समोर बसवून घेतो. त्यांना मला हवे ते अविर्भाव घेण्यास सांगतो."

चित्रकाराशी बोलून परत येत असता वात्स्यायनाचे अंतःकरण जड उदास होते. हा शोध आपल्या हातून तडीस जाणार नाही असे पुन्हा त्याला वाटू लागले. उद्याच आपण हे ठिकाण सोडावे. आपल्या मनाच्या चंचलतेचा त्याला संताप आला. कोणते कार्य हाती घेऊन आपण पूर्ण केलाय ? पिता जाताच शिक्षण थांबवले. आपल्या मातेला आपण सुख दिले नाही. महेश्वरदत्त आला नसता तर त्यावेळी आपला विवाहही झाला नसता. वडिलार्जित संपत्ती असूनही आपणास आपले घर, उद्यान सौंदर्यपूर्ण ठेवता आले नाही. अर्धवट ग्रथज्ञानाने आपण अंगरिक्षास उपदेश दिला. त्याचे कटु फल–ही शोधाची धडपड.

कथ्थकाच्या झोपडीशी आपण येऊन पोहोचलो याचे भान तेथून आलेल्या मोठ्या गलक्यानं वात्स्यायनाला करून दिले. सर्व गलबत्यावर महेश्वरदत्ताचा चढता सूर येत होता. त्यावरून तो मद्य पिऊन बरळत आहे हे वात्स्यायनाच्या ध्यानात आले. वात्स्यायनं घाईनं पुढे झाला.

चारचौघांनी महेश्वरदत्ताला धरून ठेवले होते आणि तो ओरडत होता,

'वात्स्यायन ! अरे मल्लनाग ! धाव !'

वात्स्यायनाला पाहताच महेश्वरदत्तानं त्याला मिठी मारली. रडव्या सुरात तो ओरडला,

'मल्लनाग ! या दुष्टांच्या हातून मला वाचीव. मला यांनी द्यूतात नागवले आणि मला दारूड्या म्हणून हिणवत आहेत. मला येथून दूर घेऊन चल. अरे ! दुष्टांत राहण्यापेक्षा अरण्यवास पत्करला.'

वात्स्यायनानं त्याला दोन्ही हातानं धरून, त्याचा झोक सावरीत, झोपड्यांमधून चालवीत मोकळ्या हवेत नेले. हवेत गारठा होता. वरून शुभ्र चांदणे पडले होते. एका बाजूला अजिंठ्याचा डोंगर भिंतीसारखा उभा होता. दुसऱ्या हातास रान होते. अजिंठ्यातला कोलाहल मागे राहिला होता. आणि कपारीवरून पडणाऱ्या निर्झराचा ध्वनी कानावर येत होता. समोर लेण्यांकडे जाणारा चढणीचा मार्ग होता. चांदण्यात येताच महेश्वरदत्त म्हणाला,

'मल्लनाग ! चल. माझा घोडा आण ! त्या युवकाला मला परत आणू दे ! पहा ! तो वाघाच्या जबड्यात जातोय, अरे त्याच्या केसांचे अवग्रहण करताच मी त्याचा पिता झालो. किती कोवळा पोर आहे तो ! घोडा घेऊन ये ! त्याची प्रिया त्याला क्षणात मिळवून देतो. वेसमध्ये मी आयुष्य व्यर्थ काढले नाही. मल्लनाग ! तो माझाच पुत्र आहे. गतजन्मीचा. मला धरून ठेऊन तू आमची ताटातूट करतो आहेस.'

वात्स्यायनाला जोरानं दूर लोटीत महेश्वरदत्त चढणीकडे धावू लागला. त्याचे झोक जात होते. तो मोठमोठ्याने ओरडत होता. काही पावले तो धावला. मग दोन्ही हात जमिनीवर टेकून चतुःष्पादाप्रमाणे चढण चढू लागला. वात्स्यायन त्याला धरण्यास पुढे झाला. चढणीचा काही टप्पा चढून महेश्वरदत्त उभा राहिला. त्याच्या डाव्या हातास दरड होती. दरडीतील झाडीकडे बोट करून तो ओरडू लागला,

'तो पहा–तो पहा युवक'

असे म्हणत दरडीच्या कडेकडे, घुटमळणारी पावले टाकू लागला. 'थांब ! थांब !' ओरडत वात्स्यायन त्याच्याकडे येत असता महेश्वरदत्ताचे पुढचे पाऊल पायवाट ओलांडून दरडीत पडले. एक क्षण तो दरडीच्या टोकावर तरंगताना दिसला. दुसऱ्या क्षणी खाली पंधरा हात खोल दरडीत कोसळला.

पायवाटेच्या बाजूने दरडीत उतरून वात्स्यायन त्याच्याशी पोहोचला. महेश्वरदत्त अस्ताव्यस्त पडला होता. त्याची शुद्ध गेलेली होती.

[ क्रमशः ]


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

पुस्तके

# रमलखुणा

'प्रवासी' व 'इस्किलार' या दोन प्रदीर्घ कथा असलेले जी. ए. कुलकर्णी यांचे 'रमलखुणा' हे पुस्तक, कथाकार या नात्याने जी. ए. कुलकर्णी यांचा झालेला विकास दर्शविणारे निश्चित आहे. स्वत्वाचा व मानवी जीवनातील मूलभूत गोष्टींचा शोध घेणारी अंतर्मुखी दृष्टी लाभलेला हा कलाकार लोकप्रियतेकडे न वळता कलाविकास व जीवनार्थ शोध या दोनच गोष्टींचा विचार करताना दिसतो.

ज्ञान म्हणजे काय? सुखप्राप्तीचा अर्थ काय? स्वातंत्र्य कशास मानता येईल? मानवी जीवनाचे अंतिम श्रेय कोणते? नीती व दैव यांचा मानवी जीवनात निश्चित कितीसा भाग आहे? या अफाट विश्वात व अमर्याद कालात सर्वार्थाने लहान असलेल्या माणसाचे स्थान कोणते? असे गहन तात्त्विक प्रश्न कथाविषय म्हणून त्यांनी निवडले आहेत. आत्मविश्वास व कलामाध्यमावरील जबरदस्त पकड यामुळे जी. एं. नी आपल्या कथांतून इतके गंभीर व तात्त्विक विषय हाताळले आहेत. याचबरोबर कथेला रूपककथा, नीतिकथा व लघुकथा या अनेकविध पातळ्या प्राप्त करून देण्याचे त्यांचे सामर्थ्यही लक्षणीय आहे.

रमल म्हणजे जुगार खेळायचे फासे किंवा भविष्य. दान पडल्यावर उमटलेल्या फाशांप्रमाणे जेशा खेळी होतात तसेच आयुष्याचे आहे. रमलात ज्याप्रमाणे आकस्मिकता व अनपेक्षितता महत्त्वाची असते तसेच आयुष्याचे असते. आयुष्य आणि जुगार यांचे साधर्म्य व साहचर्यही 'रमलखुणा' या शीर्षकातून स्पष्ट होते.

'प्रवासी' ही कथा, कथा म्हणून विकसत असताना रूपककथा म्हणूनही फुलत जाते. सबंध कथेत एक ताण व सस्पेन्स ठेवून अखेरीस एका शांत व अगतिक क्षणापाशी ती वाचकाला सोडते. कथेला एका वर्तुळातून फिरवून अखेरीस जी. एं.नी तिला एका निर्णायक क्षणापाशी आणून सोडले आहे. या कथेचा नायक अनामिक प्रवासी असून जी. एं.च्या अन्य नायकांप्रमाणे तो आयुष्याचा सातत्याने प्रवास करणाऱ्या प्रत्येक मनुष्याचे प्रातिनिधिक रूपही आहे. अष्टभुजेच्या मूर्तीतील देदीप्यमान हिरवे रत्न मिळवण्यासाठी नावेतून तो येतो व मूर्तीवर प्रहार करून ते रत्न मिळवतो. त्या रत्नपोकळीतून निघालेल्या सुवर्णकांती सापालाही तो मारतो. त्याचे हे कृत्य त्याच्या आयुष्याला भोवळ आणणारी गती व दिशा देते. प्रवाशाच्या या भीषण कृत्यानंतर वीज पडून ते मंदिर भग्न होते. कथेचा पहिला टप्पा इथे संपतो. प्रवाशाच्या या अपराधाबद्दल एक धिप्पाड दंडदूत येऊन त्याला पकडतो. तोच दंडदूत नंतर न्यायदाता बनून प्रवाशाला देहान्ताची शिक्षा फर्मावतो. मग वधक बनून ती शिक्षा अंमलात आणायला सज्ज होतो. इतक्यात अपराधी प्रवाशीच त्या दंडदूताला फरशीने मारतो. कथेचा हा दुसरा टप्पा.

प्रवासाच्या पुढल्या टप्प्यात त्याला सर्वसंग परित्याग केलेला नग्न बैरागी भेटतो. पाच नीतिकथा सांगून तो प्रवाशाची आयुष्याविषयीची आसक्ती नष्ट करण्याचा प्रयत्न करतो. सत्य, सद्‌गुण इत्यादी मानवी मूल्ये स्थल–काल–परिस्थितीसापेक्ष आहेत असे तो बैरागी प्रवाशास दाखवून देतो.

यापुढील प्रवासात त्याला सर्वांगाला डोळे असणारा प्रतिभावंत गीतकार भेटतो. त्याच्या गीतांची दाहकता व गीतांमधून त्याने दर्शविलेली सत्ये सहन न होऊन इतर माणसांनी त्याला आडरानात टाकलेले असते. प्रतिभावान कलाकाराचे दुःख व जीवनच जी. ए. या गीतकाराद्वारे मांडतात.

नंतर प्रवाशाला एक अंध शिकारी भेटतो. थकलेल्या, भुकेलेल्या वाटसरूंना आसरा देण्याचे व उत्तमोत्तम अन्न देऊ करण्याचे आमिष दाखवून त्यांना तो आपल्या अजब आरसेमहालाच्या सापळ्यात अडकवीत असतो व सुऱ्याने त्यांची शिकार करीत असतो. कृतिपाठीमागे सतत धावणाऱ्या पण अन्य गोष्टींचा विचार न करणाऱ्या माणसाचे तो शिकारी हे प्रातिनिधीक रूप मानता येईल.

शिकाऱ्याच्या तावडीतून सुटून प्रवासी एका शापित नगरात येतो. परकीयांना आश्रय वा अन्न देण्याची तेथल्या रहिवाशांना सक्त मनाई असते. त्या नगरातल्या निर्मनुष्य रस्त्यावर त्याला एक वृद्ध भेटतो. कोणत्याही परकीयाला त्या नगरीतून बाहेर पडता येत नाही, उलट सूर्योदयापूर्वी त्याचा वध करण्यात येतो हे तो वृद्ध प्रवाशाला सांगतो. त्याच्याजवळील रत्न तो वृद्धाला दाखवत असताना त्या रत्नाची प्रभा सर्वत्र पसरते, जवळच्याच एका घराचे दार उघडते. जीवनाशा व वासना यांची आसक्ती असलेले एक कुटुंब प्रवाशाला भेटते. प्रवाशाला आसरा दिल्याबद्दल मृत्युदंडाची शिक्षा कोणी भोगायची या प्रश्नावर त्या अज्ञानी माणसांची कसोटी लागते. त्या कुटुंबातील वृद्ध बाप, त्याचे मुलगे, सून हे सारेजण किती असत्य आयुष्य जगत होते व त्यांचे ऋणानुबंध किती ठिसूळ होते ते या निर्णायक क्षणी स्पष्ट होते. आपल्या स्वतःच्या जीवनाविषयी पूर्णपणे निरिच्छ बनून सुटका होण्याचे एकमेव साधन ठरण्याची शक्यता असलेले ते दिव्य रत्न त्या कुटुंबातील थोरल्या मुलाच्या हातावर ठेवून प्रवासी शांतपणे महाकालाची व आपल्या अंतिम क्षणाची निर्भयपणे वाट पाहू लागतो. हाच त्याचा निवडीचा व स्वातंत्र्याचा क्षण मानता येईल. मृत्युला न घाबरता त्याला सामोरे जाण्याची प्रवाशाची निवड त्याला स्वतंत्र माणूस म्हणून स्थान मिळवून देते. लाल वस्त्रातील भव्य ज्योतीप्रमाणे भासणारा महाकाल जेव्हा तिथे येतो तेव्हा त्याची शांतपणे वाट पाहणाऱ्या प्रवाशाला पाहून तो विस्मयचकित होतो. नंतर प्रवाशाला तो सांगतो की, त्याला भेटलेले नाविक, दंडदूत, न्यायदाता, आणि वधक हे सारे तोच होता. हे ऐकून प्रवाशाला आपण कळसूत्री बाहुल्याप्रमाणे नाचवलो गेलो हे उमजते. आपणदेखील नियतीचे एक साधन आहोत हे महाकाल स्पष्ट करतो. नियतीचा हा खेळ उमजून प्रवासी निर्भ्रम व पूर्ण ज्ञानी बनतो. त्याला कुठलीही जीवनाशा वा आसक्ती उरत नाही. आणि त्याला वाटते, इतरांचे प्रवास संपतात, रस्ता राहतो, पण आपला मात्र आता रस्ता संपून गेला आणि प्रवास मात्र चालूच राहणार आहे.'

कथेचा हा शेवट परिणामकारक, अपरिहार्य वाटतो. आपली सारी जिद्द, आस व शक्ती पणाला लावून असल्याच्या मागे सतत

धावणाऱ्या प्रवाशाला जेव्हा आयुष्याच्या सत्य स्वरूपाचे ज्ञान होते, तेव्हा त्याला अगदी अटळपणे कृतिहीनता व शून्यता येणे भागच होते. सारे आयुष्यच आभासात्मक आहे हे ज्ञान प्राप्त झाले की, वस्तुस्थितीवर नजर टाकण्याची शक्ती प्राप्त होऊन माणसाला समजते की, आपल्याद्वारे नियती मानवी मूल्यांची शाश्वतता पारखण्याचा व माणसाला निर्भय बनवण्याचा खेळच खेळत होती. प्रवाशाच्या साऱ्या धडपडीचे हे अंतिम सूत्र लक्षात आले की, कथा वर्तुळाकार गतीने कशी विकसित होत आली हे स्पष्ट होते.

'रमलखुणां'तील दुसरी दीर्घकथा 'इस्किलार' ही जी. ए. च्या उत्कृष्ट कथांपैकी एक आहे. 'इस्किलार'चा अनामिक नायक आपले भीषण भविष्य समजून घेण्याच्या व आपली नियती स्पष्ट स्वरूपात जाणण्याच्या मृगजळामागे धावतो व अखेरीस त्याला उमगते की, नियती सर्व शक्तिमान असून ती जाणण्याचे मानवाचे सारे प्रयत्न व्यर्थ आहेत, कारण ज्या क्षणी नियतीचे स्पष्ट ज्ञान होते त्यापूर्वीच नियतीने आपले काम साधलेले असते.

हे कथाबीज आठ टप्प्यांतून उलगडून दाखवताना जी. ए. जे रचनाकौशल्य दाखवतात ते पाहून वाचक स्तिमित होतो. त्याची कल्पनाशक्ती ज्या कौशल्याने कथाबीज फुलवते व प्रतिभा वापरते, ते पाहून आपल्याला एक अविस्मरणीय अनुभव मिळतो.

कथेची सुरुवात एका काव्यमय, नाटयमय क्षणी होते. आपले भविष्य जाणून घ्यायच्या जिद्दीने एक अनामिक प्रवासी नावेच्या तांडेलाला घाईने चलण्यास सांगतो. कारण सूर्यास्तापूर्वी त्या मंदिरात तो पोहोचला नसता, तर स्वत:चे भविष्य जाणण्यासाठी त्याला आणखी तीन वर्षे मंदिराचे दरवाजे खुले झाले नसते. अनेक प्रवाशांना आपल्या नावेतून सतत चाळीस वर्षे पैलतीरी नेणारा तांडेल 'घाई करण्यात काहीच अर्थ नाही' असे प्रवाशाला सांगताना म्हणतो की, आपण कोण आहो हे कधीच समजत नाही; कोणत्या वेळी काय होणार आहे हेही समजत नाही. अखेरीस सूर्यास्ताला थोडाच वेळ असताना प्रवासी मंदिरात पोहोचतो व तेथली सेविका 'सेरिपी, इस्कहार, एली' असे त्याचे भविष्य सांगते. या कूट भविष्याचा अर्थ त्याला तिथे सांगितला जात नाही. त्याच्या पुढील आयुष्यातून तो अर्थ आपोआपच गवसत जातो.

सामान्यत: जी. एं. ची कथा एका वर्तुळातून फिरते व जिथून ती सुरू झालेली असते त्याच ठिकाणच्या आसपास ती येऊन थांबते. जी. ए. घटनांना दुय्यम महत्त्व देत असल्याने त्यांच्या कथेचा विकास नायकाच्या जाणिवेच्या विकासाच्या अंगाने होतो. म्हणून त्यांचे बरेचसे नायक अज्ञाताकडून ज्ञाताकडे, अप्राप्याकडून प्राप्याकडे जात असतात. या विकासातून प्रत्यक्षात त्यांना काहीही लाभ होत नसला तरी, त्यांच्या जाणिवेचा निश्चित विकास होत असतो हे मान्य करायला हवे. या पात्रविकासाच्या अंगाने जी. ए. आपली कथा रचीत असतात. सामान्यत: त्यांच्या कथांचे दोन भाग पडतात. नायकाने केलेला ज्ञानाचा शोध हा त्यांच्या कथांचा पहिला भाग, तर अटळ कृतीकडे व नियतीभागाकडे त्याचे खेचले जाणे हा दुसरा भाग. जी. ए. आपल्या कथेतील व्यक्तिरेखा, स्थळे व प्रसंग यांचा क्रम या दोन टप्प्यांच्या अनुरोधाने ठरवतात. उदाहरणादाखल घटनास्थळांकडे व त्यांच्या मांडणीकडे पाहिले की, आपल्याला दिसते की, बऱ्याच कथांची सुरुवात व शेवट मंदिरापाशी होतो. त्यांच्या बऱ्याच कथांच्या आरंभी समुद्र असतो. मध्ये हरतऱ्हेचे रस्ते व हमरस्ते असतात. ह्या स्थळांचा आपला असा प्रतिकात्मक अर्थ असतोच, पण त्याच जोडीला रचनातत्त्वाचा आविष्कार म्हणूनही ही स्थळे वाचकांसमोर येतात.

रमल म्हणजे भविष्य किंवा जुगाराचे फासे. जीवनात भविष्यातील गूढता व जुगारातील बेभरवसा आहे. तिथे तर्क चालत नाही. जसे रमलाचे फासे उमटतील तसे भविष्यकथन होते. ते तसेच का हा प्रश्नच निरर्थक असतो. म्हणूनच माणसाचा स्वत्व व नियती जाणण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे. हे जी. ए. आपल्या कथेतील व्यक्तिरेखांच्या साहाय्याने कथन करतात.

कथा उलगडून दाखवताना जी. ए. मुख्यत: आख्यायिका, उपरोध, उपकथानके या साऱ्या पारंपारिक कथेतील तंत्रांचा कौशल्याने वापर करतात. पंचतंत्र, अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक कथा या पारंपारिक कथांप्रमाणे ते आपल्या कथेला एकाच वेळी लौकिकाच्या व अद्भुताच्या पातळ्यांवर ठेवू शकतात. उपकथानकांचा वापर जी. ए. मुख्य कथानकाला उठाव देण्यासाठी किती कौशल्याने करतात हे 'प्रवासी' मधील गीतकार, 'इस्किलार' मधील गारुडी, याकीर व अलियया यांच्या कथानकांवरून स्पष्ट होते. रूपककथा व नीतिकथा यांचा मूळ कथानकाला बळकटी आणणारा वापर जी ए. कसा करतात हे 'प्रवासी' मधील बैराग्याने सांगितलेल्या कथांवरून स्पष्ट होते.

कथानकांसाठी जी. ए. ठराविक विषयच निवडतात असा एक आक्षेप संभवतो. स्वत्व, नियती, मृत्यू इ. विषयांचा जी. ए. पाठपुरावा करतात. म्हणून हा आक्षेप येण्याची शक्यता आहे. परंतु त्याचे उत्तर म्हणजे एकतर कथानकांसाठी जी. एं. नी निवडलेले विषय इतके मूलभूत आहेत की, त्यांची पुनरावृत्ती अटळ आहे. दुसरे म्हणजे हे ठराविक विषयच अनेकांगांनी पाहण्याची व शोधण्याची क्षमता जी. एं. मध्ये असल्याने त्या विषयाची अनेक अज्ञात रूपे विविधांगांनी आपल्यासमोर येतात व प्रत्येक कथेला नवा विषय असल्याचा भास निर्माण होतो.

जी. एं. च्या कथांकडे दृष्टिक्षेप टाकला असता असे दिसते की, त्या विविध थरांतील व्यक्तींच्या सर्वसामान्य सुखदु:खांचा लोकविलक्षण प्रत्यय आणून देणाऱ्या आहेत. शहरी वातावरण, वर्तमानपत्रे, सामाजिक-राजकीय घडामोडी, सभा-संमेलने, सामूहिक जीवन यांचे संदर्भ त्यांच्या कथांत आढळत नाहीत. त्या कथांत कुणाच्या दारिद्र्याविषयी कणव नसते, कुणाच्या व्यथांची बोच नसते, कुणाच्या सुखाची बेहोशी नसते, कुणाच्या वासनांचे आंधळेपण नसते. एक विलक्षण शहारे आणणारी अलिप्तता, तटस्थता असते. भय, कुटिलता, राग, द्वेष, मोह, वासना, जिद्द इ. भावनांची पिसाट अनुभूती आणून देण्याचे सामर्थ्य या कथेच्या अंगी आहे. मानवाचा ललाटलेख लिहिणाऱ्या नियतीची छाया त्यांच्या सगळ्या कथांत फुलून राहिलेली दिसते.

मराठीतील कथावाङ्मयावर नजर टाकता जी. एं. ची कथा आजच्या मराठीवाङ्मयातील शिखरावरची कथा म्हणावी लागेल.

—लता किणीकर

**रमलखुणा**
लेखक—जी. ए. कुलकर्णी
कॉंटिनेंटल प्रकाशन
पृष्ठे १६०, किंमत—रु. ७–५०

**AFTERMATH**
by Ladislas Fargo
(Avon Books,
pages 550, Dollers 1.95).

लॅडीस्लाझ फॅरेगोनी या पुस्तकाखेरीज इतरही पुस्तके लिहिली आहेत. त्यांतली बरीच पुस्तके युद्धावर किंवा हेरगिरीवर आहेत. फॅरेगोची इतर काही प्रख्यात पुस्तके म्हणजे 'पॅटन', व 'गेम ऑफ दी फॉक्सेस.' 'टॉरा, टॉरा, टॉरा' हा सिनेमाही त्यांच्याच एका पुस्तकावर आधारित आहे.

फॅरेगोची पुस्तके बेस्ट–सेलर्सच्या यादीवर असतात. या परीक्षणाखाली आलेले पुस्तक 'लिटररी गील्ड'नी निवडलेले आहे.

हे ५५० पानी पुस्तक (Aftermath) मार्टीन बॉरमन याच्यावर आहे. बॉरमन हा नाझी पार्टी चेन्सरीचा प्रमुख व हिटलरचा सेक्रेटरी होता. हिटलरच्या मृत्यूनंतर तो अर्जेंटिनामध्ये पेरोन सरकारच्या मदतीने पळाला. तेव्हापासून तो भूमिगतच आहे. बॉरमनशिवाय बरेच नाझी दक्षिण अमेरिकेत पळाले. त्यांतली काही प्रमुख नावे अशी आहेत. बोलिव्हियामधील क्लाऊस बार्बी, अर्जेंटिनातील हॅन्रीक मुलर, पेरुग्वेमधील जोसेफ मॅंजेल, चीलीमधील वॉल्टर रॉफ व पेरुमधील फ्रेड्रीक श्वेंड.

सीमन वायझेन्थॉल याच्याकडे नाझी युद्ध-गुन्हेगारांची एक खाजगी यादी आहे. त्यात २२,००० नावे आहेत. त्याचे म्हणणे असे की, त्यांतले १६,००० युद्ध-गुन्हेगार अजून जिवंत आहेत. आणि त्या १६,००० नावांत मार्टीन बॉरमनचे नाव पहिल्या क्रमांकाचे आहे!

फॅरेगोने बॉरमनला शोधायला अतोनात कष्ट घेतले व बरेच पैसेही खर्च केले. फॅरेगो स्वतःच्या खर्चाने विमानाने फ्रॅंकफुर्टला गेला. लॅटीन अमेरिका त्याने अक्षरशः पालथी घातली. एकदा तर बॉरमनला भेटण्यासाठी फॅरेगो १०,००० डॉलर देण्यासाठी तयार झाला पण एका दक्षिण अमेरिकन ड्रायव्हरने त्याला चेतावणी दिली की, बॉरमन त्याला दिसणार नाही, पण त्याचे पैसे मात्र लुबाडले जातील!

फॅरेगोने बॉरमनला शोधण्यासाठी वेगवेगळे प्रदेश तर पायाखाली तुडवलेच; पण त्याशिवाय असंख्य कागदपत्रेही चाळली. त्यांतील काही महत्त्वाची कागदपत्रे या पुस्तकात त्यांनी दिली आहेत. बॉरमनचे बरेच फोटोही दिले आहेत. एका लेखकाने एवढा वेळ आणि पैसे खर्चून एका फरारी नाझी युद्ध-गुन्हेगाराचा शोध लावावा याला मात्र कुठेच तोड नाही. मार्टीन बॉरमनवर फॅरेगो-खेरीज इतर २२–२३ लोकांनी पुस्तके लिहिली आहेत. त्यांतील बहुतेक जर्मन भाषेमधील आहेत.

बऱ्याच लोकांना असे वाटते की, नाझी युद्ध-गुन्हेगारांना आता शिक्षा होऊ नये व त्यांच्याबाबतीत forget and forgive हे धोरण ठेवावे; कारण युद्धानंतर बराच काळ लोटला आहे. त्यामुळे सर्व युद्ध-गुन्हेगार म्हातारे झाले असणार! फॅरेगोलाही असेच काहीतरी वाटत होते. पण त्याला एकदा पेरुमध्ये फ्रान्सचा वकील भेटला व तो त्याला म्हणाला, 'ख्रिस्ताला जवळजवळ २००० वर्षांपूर्वी रोमन लोकांनी 'क्रुशीफाय' केले. इतक्या वर्षांनंतरसुद्धा ज्यू लोकांना ख्रिस्ताच्या खुनाबद्दल जबाबदार धरले जाते. त्यामुळे ज्यू लोकांचा छळ वेळोवेळी चालूच आहे. तर मग या नाझी युद्ध-गुन्हेगारांना का शिक्षा करू नये? त्यांच्यापासून सबंध मानवजातीला भय आहे.' या फ्रेंच वकिलाचे म्हणणे फॅरेगोला पटले व त्याच्या विचारात युद्ध-गुन्हेगारांविषयी बदल घडून आला.

अधूनमधून मार्टीन बॉरमनविषयी बऱ्याच बातम्या वर्तमानपत्रांत व नियतकालिकात प्रसिद्ध झाल्या. कमीतकमी १४ वेळा या प्रकारच्या बातम्या आल्या. कधी कधी तर मार्टीन बॉरमनची खोपडी मिळाली व त्यातील दातावरून हीच मार्टीन बॉरमनची कवटी आहे असे सिद्ध करण्याचे प्रयत्न केले गेले. या खोट्या बातम्या पसरवण्यात बॉरमनचा मित्र फ्रेडी श्वेंड याचा हात बऱ्याच वेळा असे. सहसा खऱ्या मार्टीन बॉरमनपासून हजारो मैल लांब (श्वेंड) असल्या अफवा उठवत असे.

सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे जगातील कोणत्याच सरकारने लेखकाला त्याच्या प्रयत्नात फारशी मदत केली नाही. (निदान या पुस्तकात फॅरेगोनी तरी तसे म्हटले आहे!) इस्रायलमध्ये 'यद वाशेम' नावाची प्रचंड संस्था आहे. दुसऱ्या महायुद्धात ज्या ज्यू लोकांची कत्तल झाली होती त्यांचे हे 'मेमोरिअल' तर आहेच, पण नाझी मंडळींनी जे गुन्हे केले त्याचे प्रचंड रेकॉर्डही 'यद वाशेम' या संस्थेजवळ आहे. एकेकाळी या संस्थेच्या मदतीने बरीच तरुण ज्यू मंडळी पलायन झालेल्या नाझींच्या शोधात फिरत होती. तेव्हा या ज्यू मंडळीची नाझींना इतकी दहशत बसली होती की, त्यांची सावली जरी पडली तरी, नाझी अक्षरशः हादरून जायचे! पण या 'यद वाशेम'ने-सुद्धा मार्टीन बॉरमनला शोधण्यासाठी फारसे प्रयत्न केले नाहीत. इस्रायली सीक्रेट सर्व्हिस-मध्ये नाझींना पकडण्यासाठी भरपूर 'कमांडो टीम्स' होत्या. पण आइकमेनला धरले तेव्हा-पासून या 'कमांडो टीम्स'मध्ये शिथिलपणा आला आणि दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे इस्रायल–अरबमध्ये सातत्याने चाललेले युद्ध. या युद्धामुळे इस्रायलची सर्व शक्ती तिकडेच divert झाली असेल.

एकदा तर फॅरेगोला अशी माहिती मिळाली की, बॉरमन हा 'एल डोरेडो' नावाच्या बेटावर तळ ठोकून बसला आहे. ते बेट पेरुग्वेच्या दक्षिणेस आहे. त्याला आणखी असेही कळले की, त्या बेटाभोवती कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे व कुणी जर आत जाण्याचा प्रयत्न केला, तर त्याला तिथले SS गार्डस् त्याला कोणताही प्रश्न न विचारता ठार मारीत. पण इतर अनेक बातम्यांप्रमाणे ही बातमीही खोटी ठरली.

तीनदा फॅरेगो ब्राझीलला गेल्यानंतर तो एकदा गुप्त रीतीने पेरुग्वेला जाऊन आला. एवढा सर्व खटाटोप केल्यानंतर त्याला इतर नाझी 'रोंडोन' या गावात दिसले. या गावात तर नाझींनी चौथी 'राइक'च प्रस्था-पित केली आहे! गावच्या रहिवाशांवर नाझींची जबरदस्त पकड होती. तिकडच्या नाझींची सर्व सूत्रे हर्बर्ट व्हॉन गाझा याच्या हातात आहेत. रोंडोनमध्ये गाझाचं चपम्याचं एक दुकान आहे. पण ते आहे फक्त नावा-पुरतंच. त्याच्या हातात अमाप पैसा आहे. तो त्याच्याकडे कुठून येतो हे मात्र कुणालाच माहिती नाही. गाझा नाझी युद्धगुन्हेगारांना हवी ती मदत देतो. गाझाला निनावी देणग्या मिळतात अशा अफवाही त्या भागात प्रचलित आहेत. हर्बर्ट व्हॉन गाझा हा एक अत्यंत

धोकादायक नाझी आहे. परंतु त्याचे नाव युद्धगुन्हेगाराच्या यादीत कुठेच नाही.

दक्षिण अमेरिकेत तर नाझींची चौथी 'राईक' कधी कधी एक 'ब्युटी क्वीन' निवडते. १९६८ मधील 'ब्युटी क्वीन'चा फोटोही या पुस्तकात दिला आहे. तिला 'मिस नाझी' म्हणून लेबल लावले गेले होते.

FBI ने बॉरमनविषयी बरीच माहिती गोळा केली आहे. बॉरमनवर इतकी तपशील-वार माहिती दुसऱ्या कोणत्याच संस्थेकडे किंवा सरकारकडे नाही.

दि. १२ सप्टेंबर १९७२ रोजी एका हेराने फॅरेगोला 'आर्जेंटाईन आर्काईव्ह' मधून एका रात्रीसाठी बॉरमनविषयी महत्त्वाची बातमी असलेला एक गुलाबी लिफाफा आणून दिला. दुसऱ्या दिवशी उजाडण्याआधी त्याच हेराने तो होता तिकडे ठेवून दिला!

बॉरमन हा हिटलरच्या ६७ राईक स्लाईटर (मिनिस्टर्सपैकी) एक होता. परंतु तोच हिटलरच्या अगदी जवळ होता. काही लोकांच्या मते बॉरमनचा थोरला मुलगा हा हिटलरकडून झाला होता. याच कारणामुळे दोघांत इतकी जवळीक होती असे अल्बर्ट स्पीअर व इतर लोक म्हणत होते. हिटलरने बॉरमनला त्याचा कारभार चालविण्यासाठी बरीच मुभा दिली होती. त्यामुळे बॉरमन सर्वांवर 'बॉसिंग' करत असे. कधी कधी तर बॉरमनला असे वाटे की, अमक्या एका परिस्थितीत हिटलरने आपल्यासारखेच 'ऑर्डर' दिले असते! या सर्व कारणांमुळे बॉरमन हिटलरचा 'alter ego' झाला होता. त्यामुळे हिटलरच्या खालच्या बऱ्याच लोकांनी काही बाबतीत हिटलरला दोषी न धरता बॉरमनलाच जबाबदार धरले!

बॉरमनचे वडील आर्मीमध्ये बँडवाले होते. तिथे ते रिटायर झाल्यांवर पोस्टात कारकुनी करायला लागले. बॉरमन हा अगदी भोगवादी होता. स्त्रियांबद्दल त्याला जबरदस्त आकर्षक होते. त्याचे वाचन अगदीच हीणकस प्रकारचे होते.

एकदा हिटलरनी एका जनरल विरुद्ध तीव्र नापसंती व्यक्त केली होती, कारण तो जनरल युद्धात हरला होता व नंतर त्याने (जनरलनी) आत्महत्त्या केली. हिटलरने जेव्हा आत्महत्या केली तेव्हा बॉरमनलाही हिटलरविषयी वाटणारा आदर नष्ट झाला. हिटलरच्या तोंडातून जे काही शब्द निघत त्याला बॉरमन 'gospel' मानत होता. हिटलरच्या आत्महत्त्येमुळे त्याने आपला विश्वासघात केला असे बॉरमनला वाटले.

सन १९७१ मध्ये जनरल गेहलेनने अशी घोषणा केली की, त्याचे आठवणीवजा आत्मचरित्र प्रसिद्ध होणार आहे व त्यात गेहलेन असे लिहीणार आहे की, बॉरमन हा सुरवातीपासूनच रशियन हेर होता व तो सरळ सरळ हिटलरच्या 'हेडक्वार्टर्समधून' क्रेमलिनला वायरलेसने माहिती पाठवायचा! जेव्हा बॉरमनच्या कानावर ही गोष्ट आली तेव्हा तो खूप चिडला. पण करणार काय बिचारा? त्याच्या लपलेल्या जागेतून तो बाहेर येऊ शकत नव्हता! त्यामुळे बॉरमन साहेबांनी सर्व चीड आपल्या पोटावर काढली व पोटदुखीच्या विकाराने त्यांनी अंथरुण धरले! बॉरमनची काम करण्याची शक्ती अफाटच होती. हिटलरच्या कारकीर्दीत त्याला भरपूर काम मिळाले. परंतु दक्षिण अमेरिकेत पळून आल्यावर त्याला कोणत्याच प्रकारचे फारसे काम मिळाले नाही व स्वत: काही छंदही लावून घेतला नाही त्यामुळे तो सारखा आजारी असे.

पेरुग्वेमधील एका डॉक्टरने सूचना केली की, बॉरमनने डॉ. सीयानसाग्लानीचा सल्ला घ्यावा. हा डॉ. सीयानसाग्लानी म्हणजे प्रख्यात जर्मन-स्वीस डॉ. नायहान्स यांचा शिष्य. वृद्ध लोकांना नवचैतन्य देण्यासाठी डॉ. नायहान्स प्रसिद्ध होता. त्याचा दवाखाना म्हणजे वृद्ध लोकांचा Mecca च बनला होता. त्याच्याकडे ट्रीटमेंटसाठी सॉमरसेट मॉम, डॉ. अॅडनॉवर, १२ वा पोप पायस व ड्युक ऑफ विन्डसर अशी मंडळी यायची. बॉरमनही आता म्हातारा झाला होता. त्याच्या 'सेक्स लाईफ' बद्दल त्याला फार काळजी वाटायला लागली. डॉ. सीयानसाग्लानीची १०००० डॉलर फी देऊन त्यानी ट्रीटमेंट घेतली.

नंतर तो काही काळ बरा राहिला. फॅरेगोला तो सापडला तो टच्युपीझाजवळ (दक्षिण बोलिव्हियात) एका लहान हॉस्पिटलमध्ये. फॅरेगोनी एवढा खटाटोप केल्यानंतर फक्त पाच मिनिटेच त्याला बॉरमन 'पाहायला' मिळाला. कारण 'भेटीची' अटच अशी होती की, कोणत्याच प्रकारचे प्रश्न विचारायचे नाहीत व कसल्याही उत्तराची अपेक्षा करायची नाही! बॉरमन इतका अशक्त झाला होता की, त्याला धड बोलतासुद्धा येत नव्हते. स्वत.शीच तो काही तरी पुटपुटत होता. फॅरेगोला फक्त असे ऐकू आले, 'Get out. Why don't you let me die in peace?'

बॉरमन बऱ्याच वेळा आजारी पडत असे. पण त्याचे ते आजारपण psychosomatic असायचे!

फॅरेगोने बॉरमनला शोधायला अक्षरश: एक manhunt केला आणि तोसुद्धा एकटयानेच. त्याच्या पुस्तकातली ५०% माहिती जरी खरी असली तरी, त्याचे प्रयत्न कौतुकास्पद मानले पाहिजेत! आणि पुस्तक वाचून त्यातली निम्म्यापेक्षा जास्त माहिती आपल्यास खरी वाटते.

जे. एन. पोंडा

(फिनिक्स लायब्ररी)


**नवीन दाखल झालेली काही पुस्तके**

1. Bisexual Living (Bestseller–Bisexual, uninhibited, life-Style of hetero and homosexuals.) : Julius Fast, Wells Hal — Rs. 16·45
2. The Promise of Joy (Bestseller-Novel political Thriller) : Allen Drury — Rs. 18·35
3. The Mystery of Atlantis (Bestseller About the lost continent of Atlantis) : Charles Berlitz — Rs. 11·75
4. Hit 29 (Mafia Thriller) : Joey — Rs. 11·75
5. The Green Wolf connection (Thriller) : Nick Carter — Rs. 11·75

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०

मराठी रंगभूमी

# बेबी

मोहिनी वर्दे

'बेबी' हे तेंडुलकरांचे नवे नाटक क्रियाशील, भडक, घटनाप्रधान भावना चेतावणारे असे वरवर भासते. या नाटकाकडे सहिष्णू-वृत्तीने पाहणे कठीण. हिंस्र आणि शोकात्म अनुभवनाट्य 'सखाराम', व 'गिधाडे' याप्रमाणे येथेही निवडले आहे. मात्र नाटक मनाची जबरदस्त पकड घेते ते त्यामुळे नाही. बेबीच्या व्यक्तिमत्त्वातून अशा भीषण जगात राहणारी एखादी व्यक्ती श्रद्धा जपून ठेवू शकते, स्वप्ने फुलवू शकते, लौकिक जीवनात आकंठ बुडालेली असून आत्म्याच्या अमरत्वावर विश्वास ठेवून अलौकिक जीवनात रमून जाऊ शकते, ह्या सर्वांचा प्रत्यय येतो त्यामुळे हे नाटक वेगळे ठरते. ( हे हिंदी प्रयोगातून जाणवते.)

बेबी, राघव, शिवप्पा, कर्वे, या चार पात्रांनी हे नाटक उभे केले आहे. ह्या नाटकातील पात्रे उच्च समजल्या जाणाऱ्या समाजापासून मैलोगणिक दूर आहेत. यातील शिवप्पा, बेबी, राघव, हे नाही म्हटले तरी जगावेगळे आहेत.

बेबी आणि राघव ही अनाथ भावंडे आहेत. सामान्य व दरिद्री माणसांवर जी संकटे येतात ती यांच्यावर येतात. मोहोल्ल्यातला दादा शिवप्पा बेबीच्या ठिकाणी आपली वासनेची भूक भागवतो. राघव संतापाने वेडा होतो. तीन वर्षे मानसिक उपचार करून घेण्यासाठी हॉस्पिटलमध्ये राहतो. त्या अवधीत बेबी शिवप्पाची रखेली बनते. राघव परत येतो. बेबीची, कर्वे नावाच्या सिनेमातील असिस्टंट डायरेक्टरशी ओळख होते, बेबी कर्वेला घरी आणते तेव्हा शिवप्पा येतो व संतापून बेबीला व राघवला घराबाहेर काढतो. अशी या नाटकाची थोडक्यात कथा आहे.

राघव शरीराने व मनाने दुबळा आहे. शिवप्पा आणि त्याच्या बरोबरीचे गुंड यांच्यासमोर राघवचा उपाय चालत नाही. तो मारामारी करतो, खून करण्याची भाषा बोलतो, शेवटी हिस्टेरिकल होतो आणि वेड्यांच्या हॉस्पिटलमध्ये जाऊन राहतो. राघव परत येतो येथून नाटकाची सुरुवात आहे. त्याच्या बोलण्यातून अगोदरच्या घटना प्रेक्षकाना कळतात. राघव वयाने वाढला असला तरी, वृत्तीने भाबडा आहे. हे त्याचे भाबडेपण एखाद्या क्षणी निर्बुद्धपणाकडे झुकते. 'बेबी तू अजून पवित्र राहिलीस. एखादी असती तर दुकान माडून बसली असती,' असे तो म्हणतो तेव्हा गलिच्छ वस्तीमध्ये तीन वर्षे एकटी राहिलेली तरुण, अनाथ, दरिद्री मुलगी पवित्र राहिली असावी अशी अपेक्षा करणाऱ्या राघवच्या बुद्धीची कीव येते. राघव रागावतो, चिडतो, आक्रस्ताळेपणा करतो. हॉस्पिटलमध्ये एकाकी जगल्याने त्याची उमेद खचली आहे. त्याला आता फक्त जगणे आवश्यक आहे. पण जगण्यासाठी त्याच्याकडे भांडवल नाही. मंदबुद्धी आणि अशक्त शरीर फक्त त्याच्यापाशी आहे. एक रक्ताची बहीण एवढी जीवनाची दोरी घट्ट पकडून ठेवण्याखेरीज गत्यंतर नसते. आपली बहीण पोटभर खात नाही म्हणून त्याला दया येते. त्यांचे एकमेकांवरचे प्रेम त्याक्षणी उत्कट होते. आपण आपल्या बहिणीसाठी काहीतरी करावे अशी उदात्त भावना निर्माण होते. पण बेबी सिनेमात एक्स्ट्रॉचे काम करते आहे, हे ऐकून तो पुन्हा अगतिक होतो आपल्या कुळाला बट्टा लागला म्हणून जगावर चिडतो, स्वतःला दोष देतो, सुस्कारे सोडतो तर कधी अतीव समंजसपणे 'तू तरी दुसरे काय करणार आहेस' म्हणून स्वतःचे सांत्वन करतो. पुन्हा पुन्हा जीवनाचा धिक्कार करतो.

बेबी आणि राघव यांचा सुरुवातीचा प्रवेश संकटांच्या होळीत होरपळणाऱ्या जिवांचे एक अस्सल वास्तव उभे करतो. नाटक प्रगत होत जाते तसे हे वास्तव अधिक खोल आणि गहिरे होते, स्वच्छपणाने उभे राहते. ज्या शिवप्पाच्या पायी राघव वेडा होऊन हॉस्पिटलमध्ये गेलेला असतो त्या शिवप्पाची, बेबी रखेली आहे हे समजताच त्याचा भडका उडतो. पण त्याबरोबर राघवची उरलीसुरली शक्ती संपते. ह्या प्रवेशात शब्दांच्या द्वारे आपल्या भावनांचा उद्रेक व्यक्त करणारा राघव पुढे नाटकभर दहा-पंधरा वाक्यांपलीकडे फारसे बोलत नाही. जगण्याकरिता क्रियेची आवश्यकता असते. जगण्यासाठी शब्दांची फार गरज नसते आणि मरणाऱ्याला शब्दांचे प्रयोजन काय? राघव स्वतःला जिवंत प्रेत म्हणून संबोधतो. बेबीच्या घरी राहणे म्हणजे पर्यायाने शिवप्पाच्या दयेवर जगणे, हे कळताच बेबीच्या सांगण्यावरून राघव घराबाहेर पडायला निघतो. पण कोठे जाऊ? हा प्रश्न त्याला भेडसावतो. पोतेऱ्यासारखे जगणे पसंत करतो. ज्यावेळी स्वतःची शक्ती कमी पडते आहे' हे स्वतःला समजते त्यावेळी माणूस इतरांपेक्षा स्वतःच्या नजरेतून उतरतो. स्वतःच्या दुबळेपणाचा तिरस्कार करीत राहतो.

'बेबी' ह्या नाटकाची नायिका आहे. अत्यंत जिवंत व विलक्षण संमिश्र अशी ही व्यक्तिरेखा आहे. बेबीच्या स्वभावात अंतर्विरोध आहेत ते स्पष्टपणे नाटककाराने उभे केले आहेत. जगणे कठीण आहे, अजून सर्व प्रकारची दुःखे भोगून झाली नाहीत याची जाणीव मनाशी ठेवून बेबी सुरुवातीपासून जगत आहे. जीवनाचा धिक्कार केला तरी आखीव नेमून दिलेल्या आयुष्यावरून आपल्याला चालायचे आहे हे ती विसरत नाही. लहान वयात अनुभवजन्य शहाणपण तिने मिळवले आहे. परंतु भावना मारून टाकल्या नाहीत. ती शिवप्पासमोर लाचार कुत्र्यासारखी चार पायांवर चालते, त्याच्यासमोर शक्य तितके अभद्र वागते. पण उरात वेदना जागवत असते. शिवप्पा तिला जबरदस्तीने दारू पाजतो. तिच्या शरीरावर वाटेल तसे अत्याचार करतो. जाणीवपूर्वक ती त्याला प्रतिकार करीत नाही. तिला दुःख पचवावे कसे हे समजले आहे. तिच्यातली परमेश्वरावरची श्रद्धा मेलेली नाही. तिच्या जगण्यातून आत्मिक शक्तीचा एक उग्रमंगल साक्षात्कार होतो. 'मी माझा आत्मा विटाळला नाही' असे ती बोलते तेव्हा ते छापील शब्द नसतात. कारण ज्या क्षणी ती शिवप्पाला लाचार नमस्कार करते त्या क्षणी स्वतंत्र आत्म्याचे चिरकालीन शुभ अस्तित्व मानणारी एक बेबी ताठ उभी असते. केवळ दयाभाव म्हणून नव्हे तर कृतज्ञता म्हणून आपल्या कमाईचे पैसे ती शिवप्पाच्या मरणाच्या पंथाला लागलेल्या बायकोसाठी देते. शिवप्पाने सिनेमात

एक्स्ट्राचे काम तिला लावून दिले असते याची तिला जाण असते. ' शिवप्पा, मी तुला पैशाची मदत करीत आले ' असे सांगणारी बेबी उद्दाम नसते. शिवप्पाला टोचण्यासाठी ती तसे बोललेली नसते. फक्त आपण आपले कर्तव्य बिनतक्रार बजावीत आहोत, बेइमानी करीत नाही आहोत, एवढे ती शिवप्पाला समजावू पाहत असते.

बेबीच्या व्यक्तित्वाची आणखी एक बाजू म्हणजे तिची स्वप्ने. सुंदर जगाचे स्वप्न पाहण्याचा हक्क कोणत्याही माणसाकडून कोणी हिरावून घेऊ शकत नाही. कर्वेसाहेब आणि त्यांचा सहवास हे तिचे स्वप्न आहे. कर्वेसाहेब, ' स्वप्न स्वप्नच राहू द्या. हवे तर मी तुम्हाला सिगरेटसाठी एक रुपाया देईन ' असे ती तळमळीने सांगते. कर्वेसाहेब हा असिस्टंट डायरेक्टर आहे. तो तिच्यासारखा परंतु एका वेगळ्या स्तरावर जीवन जगणारा आहे. कलावंत, संवेदनाक्षम, स्वप्ने रचणारा. पण त्याच्या प्रतिष्ठित जगातील त्याच्या स्वप्नांना हात पोचू शकणारा. कर्वेसाहेबाला सर्वस्व देणे हा तिच्या दृष्टीने आनंदाचा अत्युच्च स्वातंत्र्याचा क्षण आहे. शिवप्पा बायको आजारी म्हणून एक महिना बेबीकडे फिरकला नाही. बेबी जिवंत आहे की नाही याची त्याने खबर घेतली नाही. याचा अर्थ, म्हणजे बेबीच्या दृष्टीने शिवप्पाच्या ठिकाणी असणाऱ्या तिच्या कर्तव्याची सांगता झाली. 'आता मी स्वतंत्र आहे ' असे ती मानते. शिवप्पाचा पहारा सुटला आणि तिचा आत्मा स्वतंत्र झाला. कर्वेसाहेबांना देण्यासाठी तिच्याकडे फक्त तिचे शरीर आहे. ते तिने स्वखुशीने-स्वानंदाने कुणाच्या स्वाधीन केले नव्हते, ते ती कर्वेसाहेबांना देऊ इच्छिते. राघव या वेळी तिला धोक्याची सूचना देतो की, हे शिवप्पाशी उघड उघड वैर पत्करण्यासारखे आहे. परंतु त्या वेळी ' स्वतंत्र ' शब्दाचे ती एक वेगळे तत्त्वज्ञान सांगते व आपण खरेच स्वतंत्र आहोत. शिवप्पाची नाराजी, त्याच्या रागसंतापाशी सामना घ्यायला तयार आहोत, असे ती निर्भयपणे सांगते.

खरे पाहता एका अर्थाने स्वतंत्र कुणी नसते. तसेच एका अर्थी प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र असते. माझे मीपण मलाच रचायचे आहे, ही जाणीव म्हणजे माणसाचे स्वतंत्र असणे, हे बेबी मानीत असावी. कर्वेसाहेबांच्या सहवासात रात्र घालवताना अवेळी शिवप्पा येतो. येथे नाटकाचा उत्कर्षबिंदू होतो. शिवप्पा आपल्या मृत पत्नीच्या नावाने शोक करतो. बेबीच्या सुसंस्कारित मनातील करुणा जागी होते. शिवप्पाच्या डोळ्यातील अश्रू व त्याची हार पाहून बेबीचे हृदय विदीर्ण होते. ती त्या क्षणी कर्वेसाहेबांना विसरते. मला कुणाचे दुःख बघवत नाही, म्हणून शिवप्पा मी तुझ्यासाठी काय करू असे तळमळून विचारते. तिच्या स्वभावातील सारे मार्दव तिच्या स्वभावातून पाझरते. आपल्या अ–लौकिक जीवनावर संपूर्ण श्रद्धा असलेली बेबी लौकिक जिव्हाळ्यातून मोकळी कधीच होऊ शकत नाही. एका प्रसिद्ध लेखकाच्या कादंबऱ्यांच्या जगात जगते–तेव्हा ती बालसुलभ स्वप्नरंजनातही रमते. तिच्या दृष्टीने ते स्वप्नरंजन खरे आहे व आजूबाजूचे वास्तव देखील खरे आहे. ती सदोदित जीवनाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत असते.

शिवप्पा म्हणजे गल्लीतील दादा, क्रूर, दुष्ट, निलाजरा, असंस्कृत, व्यसनी, बेरड आणि कमालीचा स्वार्थी. त्याच्या उक्ती आणि कृती स्वभावाशी एकरूप झालेल्या आहेत. अशीच जीवनावर पूर्ण विश्वास असलेला तो माणूस राघवला बेबीच्या घरात राहायला देतो आणि मृत पत्नीच्या नावाने पश्चात्तापदग्ध होऊन शोक करतो, यात त्याचा स्वार्थ कुठला हा प्रश्न पडतो. अर्थात 'माणूसपण ' हा माणसाचा धर्म आहे. तो प्रत्येक माणसाच्या भावविश्वाचा एक भाग असतो. जेथून परत फिरणे शक्य नाही अशा परिस्थितीच्या एखाद्या वळणावर, माणसातील हा भाव उफाळून वर येतो. शिवप्पाच्या आयुष्यात असा प्रसंग येतो तेव्हा शिवप्पाच्या व्यक्तिमत्त्वातली ही बाजू प्रकट होते. परंतु त्यामुळे त्याचे संपूर्ण परिवर्तन होते अशी अपेक्षा बाळगणे गैरवाजवी आहे. बेबी आपल्याशी बेइमान झाली, एवढे समजताच त्याच्या द्वेषभावनेचा स्फोट होतो व बेबीला आणि राघवला तो घराबाहेर काढतो. येथे नाटक संपते.

नाटकाची सुरुवात बेबी आणि राघव यांच्या एकत्र येण्याने झाली व शेवट त्यांच्या एकत्र जाण्याने झाला. हे नाटक बेबीचे आहे आणि राघवचा त्यात वाटा आहे.

नाटकाच्या प्रयोगावर नाटकाच्या संहितेचे बरेचसे यश अवलंबून असते. काही नाटके फक्त वाचण्यासाठी असतात असे कितीही म्हटले, तरी त्यांना ' नाटक ' म्हणण्यापेक्षा इतर कोठले तरी नाव द्यावे असे वाटते.

कमलाकर सारंग यांचा मराठी प्रयोग व सत्यदेव दुबे यांचा हिंदी प्रयोग असे दोन्ही प्रयोग पाहायला मिळण्याचा योग आला. वरील विवेचन बव्हंशी हिंदी प्रयोगाचे आहे. त्यामुळे बेबीच्या भूमिकेतील नाट्य व तिचे तरल भावविश्व जाणवू शकले. परंतु मराठी प्रयोगातून नेमके हेच प्रेक्षकांच्या अवधानातून निसटते व क्रौर्याचा परिणाम जास्त होतो. दुबे यांच्या प्रयोगाला मध्यंतर नव्हते. त्यामुळे सुरुवातीपासून शेवटपर्यंत प्रयोगाची पकड ढिली झाली नाही. भक्ती बर्वे ही बेबीच्या भूमिकेशी अधिक समरस झाली होती. किंबहुना ' बेबी ' हे नाव तिला शोभून दिसले. सारंगांचा मराठी प्रयोग उत्तम बसवलेला होता. परंतु ब्लॅकआउटचा उपयोग जास्त वेळा केला व त्यामुळे मध्ये तुटकपणा आला. निळू फुले यांची भूमिका उत्कृष्ट होते. प्रेक्षकांची सहानुभूती मिळवतात हा भाग वेगळा. अरविंद देशपांडे आणि लालन सारंग यांच्या भूमिका चांगल्या झाल्या. परंतु ' सूर्यकांत फातरफेकर ' ह्या लेखकाच्या नावाचा उल्लेख बेबीच्या तरल नाजूक भावविश्वाची प्रतीती आणून देण्यास असमर्थ ठरला. उलट प्रेक्षकांना विनोदी वाटला. मराठी प्रयोगात बेबीच्या स्वप्निल जगाची ओळख होते ती, जेव्हा बेबीवर रंगीबेरंगी दिव्यांचा उजेड सोडला जातो व हिंदी नाटकात बेबीच्या एक्स्ट्रा भूमिका असलेल्या चित्रपट-भूमिकाच प्रत्यक्ष पडद्यावर दाखवल्या गेल्या तेव्हा. दोहोंचा परिणाम वेगळा झाला. प्रत्यक्ष चित्रपटदृश्ये अत्यंत कलात्मक परिणाम साधून गेली. एक्स्ट्राचे काम करणाऱ्या बेबीच्या ग्लॅमरस भूमिका आणि रूपेरी पडद्यावरचे मोहक रूप आणि यामागे तिची वास्तव जीवनातील व्यथा विरोधामुळे अधिक दाहक बनते व तिच्या दुहेरी जीवनातील ताण बेबीच्या व्यक्तिचित्रणात गहिरे रंग भरतात.

मराठी व्यावसायिक रंगभूमीच्या प्रेक्षकांना हे नाटक वेगळे वाटेल. हिंदी प्रयोगामुळे हे नाटक जेवढे मनाला भिडले तेवढे मराठी प्रयोगांनी भिडले नाही. व्यावसायिक रंगभूमी व *प्रायोगिक रंगभूमी* यांचे (अपील) आवाहन वेगवेगळे असते. त्यामुळे हा फरक घडू शकतो. □

नव्या विषयावरील न फुललेले नाटक

# फुलता कळी फुलेना

'रंगदीप' या स्थानिक हौशी कलाकारांच्या नाट्यसंस्थेनं या नाटकाचा पहिला प्रयोग नुकताच सादर केला. आकाशवाणीवरचे एक निवेदक श्री. प्रकाश सावरकर यांनी हे नाटक लिहिलं, दिग्दर्शित केलं आणि त्यातली प्रमुख भूमिकाही केली. अर्थात त्यांचं हे पहिलंच नाटक आहे, किंवा सर्वच कलाकार अव्यावसायिक आहेत, वगैरे तपशिलापेक्षा, माझ्या दृष्टीनं महत्त्वाचा बारकावा म्हणजे त्यांनी हाताळलेला काहीसा नवा आणि चांगला विषय. एका मनोरुग्ण स्त्रीची जीवनकहाणी, शारीरिक वाढ होत राहूनही मानसिक वाढ खुरटलेल्या एका मुलीची व्यथा त्यांनी या नाटकात चितारली आहे आणि तीही त्या व्यथेशी प्रामाणिक राहून. मनोविश्लेषणात्मक नाट्य–चित्रकृतीसंबंधी यापूर्वी मी या सदरात, 'छोटीसी बात', 'हसा फुलांनो हसा', 'हा खेळ सावल्यांचा' वगैरे कलाकृतीच्या संदर्भात वेळोवेळी लिहिलेलं आहे, आणि शारीरिक अस्तित्वापलीकडच्या मनोविश्वाचा शोध घेण्याच्या आधुनिक कलाप्रवृत्तीचं स्वागत केलेलं आहे. मानवी मनाच्या तळाचा वेध घेऊ पाहणारी कलाकृती ही शारीरिक अस्तित्वाच्या परिघाबाहेर पडू न शकणाऱ्या कलाकृतीपेक्षा कितीतरी जास्त खोल असते, असं मला वाटतं, आणि याच मुद्द्यावर मी 'फुलता कळी फुलेना'चं स्वागत करीन; मग त्याचं नाट्यमाध्यमातील दृश्य यश किती आहे, हा भाग अलाहिदा.

या दृश्य यशाला मात्र बऱ्याच मर्यादा पडल्या आहेत. काही कथावस्तूमुळे पडलेल्या, तर काही अर्थातच प्रेझेंटेशनच्या. ही कथा सुरू होते डॉ. रमेश (प्रकाश सावरकर) आणि त्यांची मुलगी डॉक्टर प्रीती यांच्यापासून. आणि फ्लॅशबॅक टेक्निकनं जाऊन थांबते ती रमेश आणि त्याला लहानपणी अपघातातून वाचताना स्वतःच शिकार ठरलेली त्याची बालमैत्रीण आणि नंतरची पत्नी ज्योती सावरकर यांच्या सुखदुःखाच्या भागीदारीपर्यंत. डॉक्टर झालेला रमेश, आपल्यामुळे वेडी–अर्धवट–मनोरुग्ण बनलेल्या या मैत्रिणीचा पत्नी म्हणून स्वीकार करतो तो तिला सुधारण्याच्या ईर्ष्येनं. पण त्याच्या शास्त्रालाही अखेर हार खावी लागते आणि प्रीतीला जन्म दिल्यानंतर, आपले वडील वारल्याची बातमी येताच तो धक्का असह्य होऊन रमेशची ही न फुललेल्या कळीसारखी पत्नी मिटून जाते. प्रभावी भावनात्मक संघर्षाची शक्यता असलेली ही कथा फुलवण्यामध्ये प्रकाश सावरकर यांना मात्र पुरेसं यश लाभलेलं नाही. एक तर त्यांच्या कथा प्रवाहातला विलक्षण संथपणा कंटाळवाणा ठरतो. कित्येकवेळा कथेतले तपशीलवजा भाग त्यांनी अनावश्यक elaborate केलेले आहेत. (रमेशचं लहानपण हे एक चांगलं उदाहरण). नाटकाच्या मुळच्याच संथ गतीमध्ये अशा तपशीलाचा अधिकच अडथळा येतो. रमेशच्या लग्नानंतरचे पति–पत्नीचे प्रसंग हा *अशा अनावश्यक elaboration* चा एक अभिरुचीशून्य नमुना, त्यातले काही संवाद तर vulgarity च्या पातळीला जाणारे. दुसरं असं की, नाटकाच्या सुरुवातीलाच भरपूर वेळ घालवूनही फ्लॅशबॅक पुरेसा establish करता आलेला नाही. तिसरा मोठा दोष दृश्यबदलासबंधीचा. बारीकसारीक तपशील मांडत जाण्याच्या हौसेपोटी नाटकात दृश्यांची संख्या वारेमाप वाढलेली आहे. कित्येकदा एकाच sequence मधल्या प्रसंगामध्येच उगीचच दृश्यबदलाचा खटाटोप केलेला आहे. परिणामी नाटकाला एक लय, सूर सापडल्यासारखा न वाटता प्रयोग खंडित–विस्किळित वाटतो. तीन तासांत तब्बल तीस वेळा अंधार करून दृश्य बदलणं हा कदाचित प्रायोगिकतेचा विक्रम असू शकेल, पण तो सुखावह मात्र निश्चितच नाही.

असं हे लेखन–दिग्दर्शनात, विशेषतः लेखनात'कच्चं पडलेलं नाटक, श्री. व सौ. सावरकर आणि सर्व सहकलाकार (बालकलाकारांचा खास उल्लेख करायलाच हवा!) यांच्या बंदिस्त टीमवर्कमुळे आणि काही प्रमाणात वैयक्तिक अभिनयकौशल्यामुळेही सावरलं गेलं आहे. विशेषतः ज्योती सावरकर यांच्या मुद्राभिनयाची दाद (जया भादुरीचा अनेकवारचा आभास वगळता) दिली पाहिजे. नाट्यलेखन–दिग्दर्शनाच्या प्रांतात प्रथम पदार्पण केलेले श्री. सावरकर यांच्या निष्ठापूर्वक केलेल्या प्रयत्नाबद्दल त्यांचंही अभिनंदन करून पुढील प्रयत्नासाठी शुभेच्छा देणं उचितच ठरेल.

—शिरीष सहस्रबुद्धे

हिंदी चित्रपट

# पुरानी पहचान

## जुनेंपुराणे उपेक्षित रहस्यचित्र

'पुरानी पहचान' या नावाचा एक चित्रपट पुण्यात सध्या चालू आहे, याचा थांगपत्तासुद्धा, सर्वसामान्यांचं सोडाच, पण सिनेरसिकांनाही क्वचित लागला असेल. कधीकाळी सुरू झालेलं आणि नाना कारणांमळे दीर्घकाळ रेंगाळलेलं हे रहस्यचित्र कधी पडदा पाहील की नाही अशी खात्री नसतानाच अखेर ते मुंबईआधी पुण्यात आणि प्रथमच मॅटिनीला प्रदर्शित झालं आहे. अर्थात संजीवकुमार, तनुजा, मदनपुरी, तरुण बोस यासारख्यांची नावं लावणारं हे चित्र, कृष्णधवल रंगात असल्यानं म्हणा; 'मेहबूबा'–'जानेमन' आणि 'शंकरदादा' यांच्या झपाट्यापुढे निष्प्रभ– दुर्लक्षित ठरलं आहे. त्याबद्दल फारसं काही लिहिलं–बोललं जाईलसं वाटत नाही.

सर्वसामान्य हिंदी रहस्यचित्रांपेक्षा हा चित्रपट काहीसा– फक्त काहीसाच– वेगळा वाटतो. एक तर रहस्यचित्रांचे जे कायमचे घटक– खून आणि भुताटकी– ते इथे जवळजवळ नाहीतच. भुताटकीचा आभास निर्माण करण्यासारख्या सिच्युएशन्स नव्हत्या असं नाही, पण बहुधा त्या टाळल्या आहेत. खून आहे, पण चित्रपटातली रहस्यमयता त्याच्याभोवती केंद्रित झालेली नाही. महत्त्व दिलं गेलं आहे, ते सतत भीतीच्या दडपणाखाली राहिल्यानं उद्भवणाऱ्या गंभीर मानसिक आजारपणाला. स्वाभाविकपणेच त्यापाठोपाठ मनोविश्लेषणाचा प्रयत्न येतोच आणि चित्रपटाच्या अखेरीस मिळणारी अनपेक्षित कलाटणी वगळली, तर हीच माझ्या दृष्टीनं समाधानाची बाब आहे.

'पुरानी पहचान'ची कथा– पटकथा– संवाद लिहिले आहेत चरणदास शोख यांनी. कथेच्या नाना धाग्यांची आटोपशीर जुळणी करून पहिल्यापासूनच रहस्याचं जाळं विणत आणायची कामगिरी त्यांनी चांगली बजावली आहे. संध्या (तनुजा) या कॉलेजयुवतीला

स्वप्नात आणि प्रत्यक्षातही एक विद्रूप, हिडीस चेहऱ्याची स्त्री सतत, दिसत– भेडसावत असते. 'ती आपला खून करणार,' या भयापोटी संध्याला जगणं अशक्य होतं. उपचाराच्या निमित्तानं चित्रकार कम मनोविकारतज्ज्ञ डॉ. प्रभात (सजीवकुमार) तिच्या आयुष्यात येतो आणि तिला तिच्या भयगंडातून वर काढताना तिचा जीवनसाथीही बनतो. तथापि आपल्या वाढदिवशीच संध्या 'त्या' स्त्रीचा संतापानं बेभान होऊन खून करते. गुंतागुंत वाढते; संध्याला वेड लागल्याचं आणि ताणामुळे तिनं आत्महत्या केल्याचंही जाहीर होतं. तथापि योग्य वेळी सर्व कोडी उलगडतात, संध्या जिवंतच असल्याचं आणि मुळापासून सर्व कारस्थान तिच्या 'अंकल' (तरुण बोस)चंच असल्याचं निष्पन्न होतं. तिच्या इस्टेटीवर डोळा ठेवून, तिला वाटेतून दूर करायचा त्याचा इरादा असतो. शेवट अर्थातच गोड. इतर निरगाठी आणि त्यांची सोडवणूक सांगत बसण्यात गंमत नाही.

दिग्दर्शक केवल मिश्र यांनी चित्र ठाकठीक बेतलंय, एवढंच. रहस्यपटात बहुधा नेहमीच nuisance ठरणारी गाणी 'पुरानी पहचान'मध्ये आडमाप कोंबल्यामुळे चित्राची गती वारंवार कुंठीत होते. इंटरव्हलच्या आधीच चार गाणी आहेत. यामुळे रहस्याची तीव्रता भयानकतेचा परिणाम पातळ झाला आहे. गाणी आहेत मात्र चांगली सुरेल. बरीचशी पूर्वीपासूनच ऐकण्यात आलेली. संगीतकार भूषण आणि गीतकार नक्श लायलपुरी यांनी एक चांगला team Performance दिलाय. तीच गोष्ट संजीवकुमार–तनुजा या जुन्याच जमलेल्या जोडीची. फार दिवसांनी या pair ला पुन्हा एकत्र पहायचा एक चांगला योग. मुख्य म्हणजे चित्रपटाचं बरंचसं चित्रण बऱ्याच आधी झालेलं असल्यानं दोघंही आपल्या जुन्या मस्त 'फॉर्म'मध्ये आहेत !

तेव्हा खरं तर ही फक्त संजीव–तनुजांचीच पुरानी पहचान ! ◻

---

# शंकरदादा

## जुन्याच बाटलीत जुनीच....!

शंकरदादा हा नवा चित्रपट तसं म्हटलं तर जरूर पाहावा असा आहे–म्हणजे तुम्ही 'चोरी मेरा काम' 'व्हिक्टोरिया नं २०३' 'धर्मा' आणि या जातकुळीतले अलीकडचे काही चित्रपट पाहिले नसतील तरच. ते पाहिले असतीलच तर 'शंकरदादा' पाहताना पुनःप्रत्ययाचा आनंद वगैरे मिळेल–सरळ शब्दात तेच तेच पाहून वैताग येईल. बऱ्याचशा हिंदी चित्रपटांत, बाटली किंवा आतलं पेय यातलं एखादं तरी नवीन देण्याची काळजी घेतात. निदान नवीन असल्यासारखं दाखवतात. शंकरदादानं तोही विधिनिषेध शिल्लक ठेवलेला नाही. : Public memory is very short' हे लक्षात घेऊनच की काय 'धर्मा'चे निर्माते एस्. के. कपूर यांनी जुन्याच बाटलीत जुनीच दारू भरून 'शंकरदादा' या नव्या लेबलखाली ती जुन्याच प्रेक्षकांच्या गळ्यात मारायचा–किंवा गळ्याखाली उतरवायचा–पडेल प्रयत्न केलेला आहे. सुबुद्ध प्रेक्षकांना ही शिळी मिसळ रुचेलसं वाटत नाही.

'शंकरदादा'ची कहाणी त्याच्या घराणातल्या कुठल्याही मूळपुरुषाला शोभेल अशीच आहे. जुन्या भावांची लहानपणी नेहमी ताटातूटच कशी होते, (जुळं होण्याचा उद्देश हा एवढाच असतो की काय ;) आणि त्यातला एक नेमका चोर–डाकू–ठक कसा बनतो किंवा दुसरा एखादा फक्त पोलिसअधिकारीच का होतो, ही मला कधी न सुटलेली सनातन कोडी आहेत. असो. शंकरदादाच्या निर्मात्या-दिग्दर्शकांनी असली कोडी सोडवण्यात बिलकुल डोकं घातलेलं नाही. त्यांची बरीचशी अक्कलहुषारी भरपूर 'स्टार्स'ना एकत्र गुंफता येईल अशी कहाणी रचण्यातच खर्ची पडलेली आहे. अशोककुमार, प्राण शशीकपूर (डबलरोल, अर्थातच) नीतूसिंह, बिंदू आणि अन्वर हुसेन यासारखी स्टारावळ वेचवेचून जमवल्यानतर कथाही ओघानंच ठिकठिकाणाहून वेचावी लागली आहे. पो. इन्स्पे. अमरसिंग (प्राण) याच्यावर अतिशुद्ध चारित्र्यामुळेच आलेला खून, भ्रष्टाचाराचा आरोप, त्याच्या तुरुंगवासामुळे त्याच्या कुटुंबियांची झालेली वाताहत आणि शंकर (शशिकपूर) बाबूदादा+(अन्वर हुसेन) विरुद्ध इन्स्पे. राम (शशिकपूर) यांच्या बऱ्याच ठोकाठोकीनंतर शेवटी कौटुंबिक मारामारीद्वारे होणारं पुनर्मीलन, असा या कथेचा ओळखीतला तोंडावळा.

प्राण हा 'धर्मा'चा केंद्रबिंदू होता. त्या चित्राच्या यशामुळे हुरळूनच बहुधा एस्. के. कपूरसाहेबांनी तोच फॉर्म्युला शंकरदादामध्ये मागील अकावरून पुढे चालू केला आहे. चित्रपट स्वतःभोवती फिरत ठेवण्यासाठी प्राणला यात काय काय म्हणून करायला लागावं ? देवआनंदच्या करामती फिक्या पडतील असे गुण त्याने उधळलेत. याच चित्रपटात याच मुद्द्यावरनं शशी–प्राणचं जोरदार वाजलं आणि शशीनं प्राणबरोबर काम करण्याचं सोडलंय, असंही ऐकिवात आहे. निरनिराळी सोंगं काढणं आणि वेषांतर करणं याचा नुसता धुमाकूळ प्राणसाबनी घातला असला तरी अभिनय मात्र जुन्याच दोन–तीन भूमिकांतला 'रिपीट्' केला आहे. त्यात नवीन काही नाही. अशोककुमार आणि नीतू यांना अत्यंत दुय्यम, ठोकळेबाज, फालतू भूमिकांमध्ये (पो. कमिशनर, आणि रामची प्रेयसी, अर्थात मजबुरीमुळे अन्वर हुसेनच्या जाळ्यात सापडलेली !) वाया दवडलं आहे. शशीकपूरनं अशा चित्रपटात, अशा डबलरोलमध्ये करायचं असत तसच आणि तेवढंच काम केलेलं आहे. बिंदूची कामगिरी त्यातल्या त्यात बरी असली, तरी हल्ली ती पडद्यावर कोणत्याही वेषात आली तरी सी. आय्. डी. इन्स्पेक्टर असल्याची धास्ती वाटायला लागते.

संगीताची आघाडी, 'धर्मा' गाजवल्यानंतर इथेही पुन्हा सोनिक ओमी यांनीच सांभाळली आहे. मुजरा–कव्वालीचं त्यांचं वैशिष्ट्य त्यांनी कायम राखलं आहे एवढंच. एक बरं मुजरानृत्याचं गाणं स्त्रीवेषातल्या शशीवर घेतलं आहे. इतका कुरूप आणि किळसवाणा नाच फारच क्वचित पाहायला मिळतो. अर्थात शंकरदादासारख्या सात घोंगड्यांच्या ठिगळांनी शिवलेल्या गोधडीकडून जास्त अपेक्षा ती काय करायची ?

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ४।९।७६ ते १०।९।७६

**मेष : यशस्वी घोडदौड**

आठवडा मागच्यापेक्षा अधिक यशस्वी आहे दुसरा गुरू, पांचवा रवी आणि सातवा मंगळ हे तुमच्या कर्तृत्वाला नवा बहर आणणार आहेत. आगामी काळात घडणाऱ्या घटनांची चाहूल यावेळी लागेल. राजकारणात मोठे बदल होऊन तुम्हाला महत्त्वाचे स्थान मिळेल. नोकरीधंद्याची स्थिती इतकी छान सुधारेल की तुम्हाला स्थैर्य लाभल्याचे समाधान मिळेल. नोकरीत अपेक्षापूर्ती होण्याचा मार्ग खुला होईल. अनेक दिवस उराशी बाळगलेली एखादी महत्त्वाकांक्षा सफल होऊन तुमची प्रतिष्ठा वाढेल. व्यवस्थापनात तुमचे स्थान वाढेल. फायद्याच्या क्षेत्रात तुमच्या पदरात बरेच काही पडेल. बचत होईल. शुभ दिनांक ४–७.

**महिलांना :** पैशाची काळजी आता तुम्हाला मुळीच उरलेली नाही. अनपेक्षित लाभही होऊ शकेल.

**विद्यार्थ्यांना :** शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वाचा बदल करता येईल. आशा पाजळतील.

**वृषभ : नोकरीत प्रमोशन**

सध्या तुम्हाला गुरूचे एवढे मोठे पाठबळ आहे की, ते तुमचे सामर्थ्य व आत्मविश्वास वाढवायला कारण ठरले आहे. भविष्यकाळात तुम्हाला ज्या काही योजना आखावयाच्या असतील त्याची चाहूल यावेळी लागेल. पाचवा मंगळ ही तुमच्या कर्तृत्वाला मिळालेली पावतीच होय. बढती मिळून खास अशा एखाद्या कामावर तुमची नेमणूक झाली तर आश्चर्य मानू नका. बेकारास आता निराश होण्याचे कारण नाही. उद्योगधंद्यात नवे पर्व सुरू होईल. काही कामे पूर्ण होतील. तोटा भरून निघेल. योजनाबद्ध काम केल्यास बरेच काही पदरात पडेल. शुभ दिनांक ५–६.

**महिलांना :** नोकरीत प्रमोशन मिळेल. धंद्यातील अनिश्चितता संपेल.

**विद्यार्थ्यांना :** शेती व वैद्यक यांच्या खास अभ्यासाची संधी मिळेल.

**मिथुन : विचाराने वागा**

बारावा गुरू माणसाला अविचाराकडे नेतो, त्याला भावनेच्या आहारी नेतो. तुम्हाला सध्या त्याच दिव्यातून जावे लागत आहे, याची मला कल्पना आहे, पण सिंह राशीत रवी आहे व तो तुम्हाला काही कमी पडू देणार नाही. कोंडी फोडील. गुण दाखवायला संधी मिळेल. कर्तबगारी व कार्यक्षमता वाढेल. नोकरीधंद्याची एकूण परिस्थिती समाधानकारक राहील. वरिष्ठांच्या मनात तुम्ही सहानुभूती निर्माण करू शकाल. ते तुम्हाला तुम्ही जे मागाल ते देण्याचा विचार करतील. नोकरीत निश्चितपणा येईल. शुभ दिनांक ५–६

**महिलांना :** स्थावरासंबंधीचा विचार करू शकाल. पैसा कमी पडणार नाही. अपेक्षा पुऱ्या होतील.

**विद्यार्थ्यांना :** स्वावलंबाचा विचार करावा लागेल. नव्या संधी उपलब्ध होतील.

**कर्क : उद्योग वाढेल**

तुम्ही स्वतःला सर्व शहाणे समजू नका. इतरांना सहकार्य करा व विश्वास मिळवा. तसे वागलात तर हा आठवडा उद्योगक्षेत्रात तुम्हाला उपकारक व प्रगतिकारक ठरणार आहे. तुमचा कोणताही धंदाव्यवसाय असू द्या, त्याच्या उभारणीसाठी भांडवल मिळेल. यासाठी मदत मिळू शकेल. नोकरदारांची स्वप्ने साकार होतील. अपेक्षा–साफल्याचा अभूतपूर्व अनुभव येईल. चालू नोकरीत पुढे पाऊल पडेल, तर बेकारांना नवी नोकरी मिळेल. आर्थिक समस्या सुटण्यासारखी परिस्थिती निर्माण होईल. शुभ दिनांक ४–६

**महिलांना :** तिसरा मंगळ नोकरीत चांगला आहे. प्रभाव पडेल.

**विद्यार्थ्यांना :** आळस संपून कार्यक्षमता निर्माण होईल. स्वप्ने साकार होतील.

**सिंह : डावपेचांची यश**

सिंहराशीच्या व्यक्तीचा मुळातच पिंड आहे राजकारण व सार्वजनिक कार्य. तुम्ही जर या दोन क्षेत्रांत असाल, तर तुमचे सर्व प्रकारचे डावपेच यशस्वी होऊन अपेक्षापूर्तीचा आनंद मिळेल. वरिष्ठांच्या मनात तुमच्याविषयी जर कोणी गैरसमज निर्माण करून दिला असेल तर तो दूर करण्यात तुम्ही यशस्वी व्हाल, नोकरीत उपेक्षा संपेल. तुमच्याकडून विशिष्ट कामे होणार नाहीत, असा पक्का ग्रह वरिष्ठांचा होऊन ते तुमच्या फायद्याचे ठरणार आहे. पगारवाढीचा विचार वरिष्ठांपुढे तुम्ही मांडू शकाल. शुभ दिनांक ५–७

**महिलांना :** मोठा सन्मान होईल. आर्थिक बाजू उत्तम प्रकारे सुधारेल.

**विद्यार्थ्यांना :** नेतृत्वात पुढे याल. अनेक प्रकारे बौद्धिक यश मिळेल.

**कन्या : कोंडीतून सुटका**

पहिला मंगळ व अकरावा शनी असे दोन तुल्यबळ ग्रह खरे तर तुमच्या पाठीशी आहेत. पण रवी बारावा आहे तो काही



तरी अडचणी निर्माण करील. नोकरी नकोशी वाटेपर्यंत तुमच्या मनाचा निर्धार होऊ पहात होता. पण आता त्यात बरीच सुधारणा होईल. वरिष्ठांसमोर तुमच्या अडचणी मांडण्यांत तुम्हाला यश येईल. गैरसमजाचे धुके वितळत असलेले तुम्हाला दिसेल. आर्थिक बाजू अजून काही काळ जरी परिपूर्ण होणार नसली, तरी काळजी बरीच कमी होईल. शुभ दिनांक ५–७

**महिलांना :** आरोग्य सुधारून संसारात नवे पर्व सुरू होईल. आर्थिक बाजू सुधारून प्रसन्नता येईल.

**विद्यार्थ्यांना :** महत्त्वाकांक्षा उंचावेल. नवे काही तरी करण्याची प्रेरणा मिळेल.

**तूळ : अपेक्षित यश**

बारावा मंगळ आहे. रवी अकरावा आहे, शनी तर तुमच्यावर प्रगतीच्या चवऱ्या ढाळण्यासाठी आतूर झाला आहे. यावेळी जुन्या आठवणीत धुंद न होता पुढे पाऊल टाकणे श्रेयस्कर असते. रेसमध्ये घबाड मिळू शकेल. अर्थात मूळ कुंडलीत असे सामर्थ्यवान ग्रह असले तरच. तरी पण प्रयत्न करा. नोकरीत बदलीची व त्यामुळे प्रमोशन मिळण्याची शक्यता आहे. मात्र ही बदली प्रथम थोडी त्रासदायक असली; तरी नाकारू नका. जमीनविषयक तंटे तूर्त स्थगितच ठेवा. व्यापारउदीम जैसे थे चालेल. पैशाचे व इतर व्यवहार कमी जास्त प्रमाणात यशस्वी होतील. हाताखालील नोकरवर्ग असेल, तर तो मात्र थोडा त्रास देईल. शुभ दिनांक ६–८

**महिलांना :** यातायात पडली, तरी काम होईल. नवीन नोकरी मिळेल. जुनी पक्कीही होईल.

**विद्यार्थ्यांना :** खर्चावर बंधन ठेवणे आवश्यक आहे. विनाकारण खर्च टाळा.

**वृश्चिक : प्रतिष्ठा मिळेल.**

तुमचे भविष्य खरे म्हणजे मंगळाच्या हाती असते. हा मंगळ तुम्हाला यावेळी मोठाच आधार ठरला आहे. तो तुमच्या राशीचा स्वामी आहे. त्यामुळे यावेळी सर्वच क्षेत्रे प्रभावित होतील. जिथे हात घालाल तिथे पैशाचे सोने घेऊन याल. जमिनीच्या खरेदीविक्रीचा व्यवहार कमालीचा यशस्वी फायदेशीर होईल. कापड, मशिनरी उद्योग, स्टेशनरी, दूध, खते हा व्यवसाय फायद्यात येईल. नफा मिळेल. उद्योग सुधारण्यासाठी भांडवल मिळू शकेल. कर्जाची वा इतर मार्गाने पैशाची सोय होऊ शकेल. लॉटरी व रेसमध्ये पैसा मिळेल. सार्वजनिक प्रतिष्ठा मिळेल. शुभ दिनांक ६–८

**महिलांना :** नोकरीत प्रमोशन मिळेल. इतर उद्योगांत प्राप्तीची चाहूल लागेल.

**विद्यार्थ्यांना :** अडचणींवर मात करण्याचे सामर्थ्य लाभेल. पैशाची मदत मिळेल.

**धनू : अपयश टळले**

भाग्यस्थानी स्वगृही रवी आहे. मंगळ दहावा आहे. पण शनी आठवा आहे. साधारण रोजच्या व्यवहारात अपयश नाही. धंदा-व्यवसाय सुधारेल. हाती पैसा येईल. गुंतवणूक होईल. बचत होईल. नोकरीत अजून सारे काही 'आलबेल' असे नसले, तरी पण कुणाची पर्वा करू नका. गुप्त कारवाया करणारे थंडावतील. त्यांना हात चोळीत बसावे लागेल. आर्थिक बाजू बरीच स्थिर होईल. 'देणेकरी-घेणेकरी' त्रास कमी होईल. पत्रव्यवहार करायला हरकत नाही. विशेषतः परदेशी प्रयाण करण्यास हा काळ उत्तम आहे. लेखनव्यवसाय सुधारेल. साचलेली कामे मार्गस्थ होतील. अनपेक्षित घटना आश्चर्य निर्माण करतील. त्या प्रतिकूल असतील. शुभ दिनांक ५–७.

**महिलांना :** लॉटरीचे तिकीट अवश्य घ्यावे. नोकरीत मोठे हितकारक असे घडेल. लाभ होईल.

**विद्यार्थ्यांना :** यश जवळ येत असल्याची खात्री पटेल. अपेक्षा, आशाआकांक्षा सफल होतील.

**मकर : आळस वाढेल**

तुमच्या राशीची माणसे कर्तबगार असतात. पण गेले काही दिवस चंद्रासमोरील शनीवरून रवि-मंगळासारखे ग्रह भ्रमण करीत असल्यामुळे तुम्ही किंकर्तव्यमूढ बनला आहात. त्यात अजून तरी सुधारणा होणे अवघडच आहे. मूळ कुंडलीत मंगळ जर उत्तम असेल तर भाग्यस्थानी सध्या असलेला मंगळ तुम्हाला बरेच बळ देऊ शकेल. तुम्ही आळस सोडून आजूबाजूला नजर टाकली, तर तुमच्या प्रगतीची नवी दालने उघडी असलेली तुम्हाला दिसतील. धंद्यासाठी भांडवल मिळेल. शेतीचा व इंजिनीयरिंग व्यवसाय सुधारेल. नोकरीत वरिष्ठांबरोबर मतभेद वाढवू नका. समंजसपणा जास्त उपयोगी पडेल. शुभ दिनांक ६–७.

**महिलांना :** तुमच्या कार्यक्षमतेला वाव मिळेल. नवे काम करू शकाल जे काम हाती घ्याल त्यात यश पदरात पडेल.

**विद्यार्थ्यांना :** हा आठवडा अनुकूल आहे. प्रोत्साहन मिळून महत्त्वाकांक्षा पालवतील.

**कुंभ : अकल्पित लाभ**

तुम्ही जरी निराश होऊन बसला आहात तरी कुंभ राशीची माणसे जगाच्या पाठीवर कर्तबगार म्हणून नावाजली जातात, हे लक्षात ठेवा. चढउतार हे असतातच. रवी-मंगळाचे राश्यांतर घडले की, आगामी काळात आपल्या बाबतीत अकल्पित–अनपेक्षित असे बरेच काही अनुकूल घडणार आहे, याची खात्री बाळगा. हा आठवडा अनेक बाबतीत पुढे पाऊल टाकायला लावणारा आहे. राजकारण, अर्थकारण, समाजकारण यात तुमची हजेरी पहिल्या नंबरवर असेल व अनेकाचे डोळे तुमच्याकडे विशेष अपेक्षेने पाहणार आहेत. नोकरीत विरोधकांच्या कारवाया थंडावतील. वरिष्ठांच्या मनातील संशय दूर होतील. शुभ दिनांक ६–८.

**महिलांना :** स्वतंत्र व्यवसाय उभारण्यास मदत व पैसा मिळेल. नोकरीत बरीच अनुकूलता राहील.

**विद्यार्थ्यांना :** अपेक्षापूर्तीचा पर्वकाळ सुरू होत आहे, त्याचा लाभ उठवा.

**मीन : धीरे धीरे प्रगती**

सध्या तरी एकट्या शनीच्याच हाती तुमच्या यशाचे धागेदोरे आहेत. कारण रवी-मंगळ त्याला काही फारसे करू देत नाहीत. तिसरा गुरू असूननसून सारखाच असा प्रकार आहे. आगामी काही दिवसांत रवी-मंगळ बदलले की, तुमच्या यशाची दारे खुली होतील, आहे त्या परिस्थितीत देखील प्रगती हळूहळू होईलच. नोकरीत हा काळ चांगला आहे. काही तरी मनासारखे घडेल. पगारवाढ, बढती पदरात पडेल. लेखनाला उत्साह वाढून तुमचे मन प्रफुल्लित होऊ लागेल. लेखकांना मागणी येईल. आळस कमी होईल. मनाने बलवान झाल्यासारखे वाटू लागेल. पैशाची कमतरता भासणार नाही. आरोग्य सुधारेल. शुभ दिनांक ६–९.

**महिलांना :** हा काळ संबंध सुधारून प्रेम व सहानुभूती वाढवणारा आहे. उद्योगात सुधारणा होईल.

**विद्यार्थ्यांना :** आळस जाईल. नवे तेज, उत्साह प्राप्त होईल. □